(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[२०२२ ] ५ एस . सी . आर. ९७०

प्रभा त्यागी

वि.

कमलेश देवी

( फौजदारी अपील क्र. ५११/२०२२)

१२ मे, २०२२

**[ एम . आर . शहा आणि बी . व्ही . नागरत्ना , न्या. न्या. ]**

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम , २००५ *:*

कलम १२, १७, १९, २२ - कौटुंबिक हिंसाचार – पीडित व्यक्ती–पत्नीचे आरोप - लग्नानंतर एका महिन्याच्या आत कार अपघातात पतीचा मृत्यू - लग्नानंतर वर्षभराच्या आत मुलीचा जन्म - पतीच्या मृत्यूनंतर पीडित व्यक्तीचा तिच्या सासू आणि तिच्या सासरच्या कुटुंबाकडून जाच आणि छळ केला गेला आणि तिला आपले सासरचे घर सोडण्यास भाग पाडले गेले – *तिने* स्वतःचा आणि आपल्या मुलाचा उदरनिर्वाह करण्यासाठी काम करण्यास सुरवात केली – *तिचे स्त्रीधन परत देण्यासाठी उत्तरवादींना* नोटीस जारी परंतु प्रतिसाद मिळाला नाही – त्यानंतर

पीडित व्यक्तीने संरक्षण आदेश, निवासाबाबत आदेश आणि नुकसान भरपाई आदेश तसेच आर्थिक मदत मिळावी यासाठी दंडाधिकाऱ्यांकडे कलम १२ अन्वये अर्ज दाखल केला – *पीडित व्यक्तीचा अपमान आणि बदनामी केल्याबद्दल आर्थिक नुकसानभरपाई म्हणून पीडित व्यक्तीला रु . १० , ००० /- इतकी रक्कम देण्याचे निर्देश देत दंडाधिकाऱ्यांनी अर्ज अंशतः मंजूर केला* : मारुती ( ऑल्टो ) कार वगळता, यादीमध्ये नमूद केलेल्या स्त्रीधनाच्या वस्तू पीडित व्यक्तीला देण्यात याव्यात *;* आणि पीडित व्यक्तीला आणि तिच्या मुलीला तिच्या पतीच्या मालमत्तेचा उपभोग घेण्यास उत्तरवादी अडथळा आणणार नाहीत - प्रथम अपीलीय न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा आदेश रद्द केला - उच्च न्यायालयाने तो कायम केला - शाश्वतता - असा निर्णय देण्यात आला की : टिकण्याजोगा नाही - संपरिक्षा न्यायालयाचा आदेश पूर्ववत करण्यात आला.

कलम १२ , १८-२० व २२ – डीव्ही अधिनियमांतर्गत आदेश पारित करण्यापूर्वी दंडाधिकाऱ्यांनी संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याने दाखल केलेल्या कौटुंबिक घटना अहवाल विचारात घेणे बंधनकारक असल्यास - असा निर्णय देण्यात आला की *:* डीव्ही अधिनियमांतर्गत कोणताही आदेश पारित करण्यापूर्वी दंडाधिकाऱ्यांनी संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याने दाखल केलेल्या कौटुंबिक घटना अहवाल विचारात घेणे कलम १२ अन्वये बंधनकारक नाही - कौटुंबिक घटनेचा अहवाल नसतानाही, दंडाधिकाऱ्यास डीव्ही कायद्यातील तरतुदींनुसार एकतर्फी किंवा अंतरिम तसेच अंतिम आदेश पारित

करण्याचा अधिकार आहे - पीडित व्यक्ती स्वत : किंवा वकिलाद्वारे थेट अधिकारक्षेत्रातील दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज करू शकते - जरी कलम १२ मध्ये 'येईल' असा शब्दप्रयोग वापरण्यात आला असला, तरी तो तो केवळ अशा प्रकरणांपुरता मर्यादित आहे जेथे संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदाता कोणताही कौटुंबिक घटना अहवाल दाखल करतो.

कलम १२ व १७ - पीडित व्यक्तीने केलेले कौटुंबिक हिंसाचाराचे आरोप - डीव्ही कायदयांतर्गत दिलासा - हिंसाचाराच्या वेळी ज्यांच्यावर आरोप के ले आहेत त्या व्यक्तींसोबत राहणे बंधनकारक असल्यास – असा निर्णय देण्यात आला की : जर पीडित व्यक्ती रक्तसंबंधाद्वारे, विवाहाद्वारे किंवा विवाहसदृश नातेसंबंधादवारे, दत्तक संबंधाद्वारे किंवा कुटुंबातील सदस्य संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहत असेल, कौटुंबिक हिंसाचाराच्या वेळी ज्यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत त्यांच्याबरोबर प्रत्यक्ष वास्तव्य करणे अनिवार्य नाही - जर एखाद्या महिलेला कलम १७ अन्वये सामाईक घरात राहण्याचा अधिकार असेल आणि जेव्हा अशी स्त्री पीडित व्यक्ती बनते, तेव्हा सामाईक घरात राहण्याच्या अधिकाराच्या अंमलबजावणीसह डीव्ही कायद्यातील तरतुदींनुसार ती दिलासा मागू शकते.

कलम १२ - पीडित व्यक्तीने डीव्ही कायद्यांतर्गत मागितलेला दिलासा - पीडित व्यक्ती आणि ज्या व्यक्तीविरोधात दिलासा मागण्यात आला आहे

त्यांच्यामधील आवश्यक नातेसंबंध – असा निर्णय देण्यात आला की : पीडित व्यक्ती आणि ज्या व्यक्तीविरोधात दिलासा मागण्यात आला आहे त्यांच्यामध्ये कौटुंबिक नातेसंबंध अस्तित्वात असणे आवश्यक आहे - परंतु, पीडित व्यक्तीने अर्ज दाखल करतेवेळेस कौटुंबिक नातेसंबंध अस्तित्वात असणे आवश्यक नाही - कलम १२ अन्वये अर्ज दाखल करताना पीडित व्यक्ती जरी उत्तरवादीसोबत् कौटुंबिक नातेसंबंधात सामाईक घरात राहत नसली, परंतु कोणत्याही वेळी राहिली असेल किंवा राहण्याचा तिला अधिकार होता आणि तो कौटुंबिक हिंसाचारास सामोरे जावे लागले असेल किंवा कौटुंबिक नातेसंबंधामुळे नंतर तिला कौटुंबिक हिंसाचारास सामोरे जावे लागले, तर तिला अधिनियमाच्या कलम १२ नावये अर्ज दाखल करण्याचा अधिकार आहे.

डी . व्ही . कायद्याचा उद्देश व हेतू - स्पष्ट करण्यात आला.

संविधी निर्वचन संविधीची अर्थउकल : मुख्य तरतुदीतील परंतुक - सर्वसाधारण तत्वांची रचना आणि अर्थउकल - स्पष्ट करण्यात आली.

शब्द आणि वाक्प्रयोग :

'पीडित व्यक्ती' शब्दप्रयोग - कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम , २००५ च्या कलम २(क) च्या संदर्भात अर्थ.

'कौटुंबिक नातेसंबंध' शब्दप्रयोग - कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम , २००५ च्या कलम २(च) च्या संदर्भात अर्थ.

'सामाईक घर' शब्दप्रयोग - कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम , २००५ च्या कलम २(ध) च्या संदर्भात अर्थ.

'कुटुंबीय' शब्दप्रयोग - कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम , २००५ च्या संदर्भात अर्थ.

**अपील मंजूर करताना न्यायालयाने असा निर्णय दिला की :**

**१.१ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ च्या कलम १२ नुसार, दंडाधिकाऱ्याला डीव्ही कायद्यांतर्गत कोणताही आदेश देण्यापूर्वी संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याने दाखल केलेल्या कौटुंबिक घटना अहवाल विचारात घेणे बंधनकारक नाही. हे स्पष्ट केले जाते की, कौटुंबिक घटना अहवाल नसतानासुद्धा, डीव्ही कायद्यातील तरतुदींनुसार एकतर्फी किंवा अंतरिम तसेच अंतिम आदेश देण्याचा अधिकार दंडाधिकाऱ्याला आहे. [परि, ५२] [१०३१ – जी-एच; १०३२-ए]**

**१.२ पीडित व्यक्ती, जेव्हा रक्ततसंबंधाद्वारे, विवाहाद्वारे किंवा विवाहसदृश नातेसंबंधाद्वारे, दत्तक संबंधादवारे किंवा संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या कुटुंबाचे सदस्य म्हणून एकत्र राहत असतील, तेव्हा कौटुंबिक हिंसाचाराच्या वेळेस ज्या व्यक्तींविरूद्ध आरोप करण्यात आले आहेत, त्या व्यक्तींबरोबर प्रत्यक्षात राहणे बंधनकारक नाही. डी.व्ही. कायद्याच्या कलम १७ अन्वये एखाद्या महिलेला सामायिक घरात राहण्याचा अधिकार असेल आणि अशी स्त्री पीडित**

व्यक्ती किंवा कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडली असेल, तर ती सामायिक घरात राहण्याच्या अधिकाराच्या अंमलबजावणीसह डी. व्ही. कायद्यातील तरतुदींनुसार दिलासा मागू शकते. [परि. ५२] [१०३२-बी-डी]

१.३ पीडित व्यक्ती आणि कौटुंबिक हिंसाचाराचा आरोप लक्षात घेता, ज्याच्याविरुद्ध दिलासा मागण्यात आला आहे त्या व्यक्तीमध्ये कौटुंबिक नातेसंबंध अस्तित्वात असावेत. परंतु, पीडित व्यक्तीने अर्ज दाखल करते वेळेस कौटुंबिक नातेसंबंध अस्तित्वात असावेत असे नाही. दुसऱ्या शब्दांत, डीव्ही कायद्याच्या कलम १२ अंतर्गत अर्ज दाखल करताना पीडित व्यक्ती सामायिक घरात उत्तरवादीशी कौटुंबिक नातेसंबंधात राहत नसली तरीही, परंतु कोणत्याही वेळी तशी राहिली असेल किंवा राहण्याचा तिला हक्क होता आणि ती कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडली असेल किंवा नंतर कौटुंबिक नातेसंबंधांमुळे तिला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागले असेल, तर तिला डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ अन्वये अर्ज दाखल करण्याचा अधिकार आहे. [परि. ५२] [१०३२ - इ - एफ]

२. डीव्ही कायदा हा नागरी संहितेचा एक अंश आहे जो भारतातील प्रत्येक महिलेला तिच्या धार्मिक संलग्नता आणि / किंवा सामाजिक पार्श्वभूमीचा विचार न करता, संविधानाने दिलेल्या तिच्या अधिकारांचे अधिक प्रभावी संरक्षण करण्यासाठी आणि कौटुंबिक नातेसंबंधात होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराला बळी

**पडलेल्या महिलांचे संरक्षण करण्यासाठी लागू आहे. त्यामुळे हिंदु कायद्यात समजल्याप्रमाणे 'संयुक्त कुटुंब' या शब्दाचा अर्थ होऊ शकत नाही. त्यामुळे 'कुटुंबातील सदस्य संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहतात' या शब्दप्रयोगाचा अर्थ कुटुंब म्हणून एकत्र राहणारे सदस्य असा होतो. अशा अर्थाने, पालक म्हणून काळजी घेतलेल्या मुली/ मुले यांनाही सामायिक घरात राहण्याचा अधिकार आहे आणि त्यांना डीव्ही कायद्याच्या कलम १७ च्या पोट- कलम (१ ) अन्वये हा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. जेव्हा अशी मुलगी किंवा महिला पीडित व्यक्ती बनते, तेव्हा कलम १७ च्या पोट-कलम (२) चे संरक्षण लागू होते. [परि. ३६] [१०११-सी-इ]**

श्रीमती भारती नाईक वि. श्री रवी रामनाथ हलरंकर आणि अन्य एक **२०१० एससीसी ऑनलाइन बॉम्बे २४३**; वंदना वि. टी. श्रीकांत आणि कृष्णामाचारी **२००७ एससीसी ऑनलाइन मद्रास ५५३ - संदर्भित.**

**३. 'पीडित व्यक्ती आणि ज्याच्याविरोधात दिलाशाची मागणी करण्यात आली आहे, त्या व्यक्तीमध्ये कौटुंबिक नातेसंबंध अस्तित्वात असावेत का', या विचारार्थ उपस्थित करण्यात आलेल्या पुढील प्रश्नाच्या संदर्भात 'कौटुंबिक नातेसंबंध' हा एक विस्तृत शब्दप्रयोग आहे आणि याचा अर्थ रक्तसंबंधाने, विवाहाद्वारे ; किंवा विवाहसदृश नातेसंबंधाद्वारे ; दत्तक संबंधाद्वारे ; संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या कुटुंबाचे सदस्य म्हणून सामाईक घरात एकत्र राहत**

असतील किंवा कोणत्याही वेळी एकत्र राहिले असतील अशा दोन व्यक्तींमधील नातेसंबंध असा आहे. 'रक्तसंबंध', 'विवाह' आणि 'दत्तक' या सर्वसाधारण कायद्यात तसेच पक्षकारांना लागू असलेल्या संबंधित वैयक्तिक कायद्यात त्या चांगल्या प्रकारे समजलेल्या संकल्पना आहेत. तथापि, हे लक्षात घेणे समर्पक आहे की 'विवाह' या अभिव्यक्तीमध्ये विवाहसदृश नात्याचाही समावेश होतो. दुसरं म्हणजे 'दत्तक' या शब्दात संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या कुटुंबातील सदस्यांचाही विचार केला जातो. [परि. ४२] [१०१४ -इ -जी]

डी. वेलू सामी वि. डी. पचाईम्मल (२०१०) १० एससीसी ४६९ : [२०१०] १३ एससीआर ७०६; इंद्रा सर्मा (२०१३) १५ एससीसी ७५५ : [२०१३] १४ एससीआर १०१९ - संदर्भित.

४.२ 'कुटुंबातील सदस्य संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहतात' हा शब्दप्रयोग केवळ रक्तसंबंध, विवाहाशी किंवा दत्तक घेण्याशी संबंधित नाही. वर म्हटल्याप्रमाणे 'संयुक्त कुटुंब' या शब्दाचा अर्थ हिंदू कायद्यात समजल्याप्रमाणे संयुक्त कुटुंब असा होत नाही. याचा अर्थ कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या व्यक्ती असतील. यात केवळ रक्तसंबंधादवारे, विवाहाद्वारे किंवा दत्तक संबंधाद्वारे एकत्र राहणाऱ्या कुटुंबातील सदस्यांचाच समावेश नाही, तर ज्या व्यक्ती एकत्र किंवा संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहत आहेत जसे की, दत्तक मुले जी इतर सदस्यांसोबत राहतात जे रक्तसंबंधादवारे, विवाहाद्वारे किंवा दत्तक संबंधाद्वारे

नात्यात आहेत. त्यामुळे जेव्हा कोणतीही स्त्री कौटुंबिक नातेसंबंधात असेल, तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाला असेल आणि ती पीडित व्यक्ती बनते, तेव्हा तिला डी. व्ही. कायद्यांतर्गत उपायांचा लाभ घेण्याचा अधिकार आहे. [परि. ४३] [२०१७- सी-इ]

४.३ डी. व्ही. कायद्यात नमूद केलेले नातेसंबंध पुढीलप्रमाणे आहेत ल :

(अ) रक्तसंबंधाने असलेले नातेसंबंध हे आयुष्यभराचे नाते असते.

(ब) जोवर न्यायालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे विभक्त होण्याचा आदेश दिला नाही तोवर विवाह हे देखील आयुष्यभराचे नाते आहे.

(i) जर न्यायालयाने न्यायिक विभक्त होण्याचा आदेश दिला तर त्यामुळे विवाह संपुष्टात येत नाही आणि म्हणूनच पती-पत्नी प्रत्यक्षात एकत्र राहत नसले तरी त्यांच्यात कौटुंबिक नातेसंबंध सुरू राहतात.

(ii) घटस्फोट झाल्यास विवाह टिकणार नाही, पण लग्नादरम्यान किंवा घटस्फोटाचा हुकूमनामा पारित झाल्यानंतरही, परंतु कौटुंबिक नातेसंबंधांच्या कालावधीशी संबंधित असलेल्या कालावधीत, जर एखाद्या स्त्रीला (पत्नीला) कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागत असेल, तर या डी. व्ही. कायद्यातील तरतुदी अशा घटस्फोटित महिलेच्या मदतीलाही येतील.

(iii) म्हणूनच 'कौटुंबिक नातेसंबंध' या शब्दाची व्याख्या विस्तृत पद्धतीने करण्यात आली आहे, ज्याचा अर्थ विवाहाद्वारे नात्यात असताना सामायिक घरात एकत्र राहणाऱ्या किंवा कोणत्याही वेळी एकत्र राहिलेल्या दोन व्यक्तींमधील नातेसंबंध असा होतो. 'राहणे' किंवा ' राहिलेले' या शब्दाचा अर्थही आपण कलम १७ च्या उपकलम (१) मधील राहण्याच्या हक्कासंदर्भात लावला आहे., उदाहरणार्थ पतीच्या मृत्यूमुळे एखादी महिला विधवा झाली असेल तर कौटुंबिक संबंध तोडले गेले असले तरीही, सामायिक घरात राहण्याचा अधिकारामुळे तिला डीव्ही कायद्यांतर्गत उपाय मागण्याचा अधिकार आहे.

(iv) म्हणून, वैवाहिक संबंध संपुष्टात आले आणि पीडित स्त्री आणि ज्याच्या विरोधात दिलाशाची मागणी करण्यात आली आहे तो उत्तरवादी यांच्यात कौटुंबिक नातेसंबंध अस्तित्वात नसले तरीसुद्धा कौटुंबिक हिंसाचाराची कृत्ये कौटुंबिक नातेसंबंधांच्या कालावधीशी संबंधित आहेत, अशा परिस्थितीतही कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या पीडित महिलेला डी. व्ही. कायद्यांतर्गत उपाय योजना आहेत.

(क) विवाहसदृश नातेसंबंधांच्या बाबतीतही, ज्या काळात स्त्रीला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागले आणि अशा प्रकारे पीडित व्यक्ती संबंध संपुष्टात आल्यानंतर उपायाची मागणी करू शकते, त्यासाठी एकमेव पूर्वअट अशी आहे की कौटुंबिक हिंसाचाराचा आरोप विवाहसदृश नातेसंबंध टिकलेल्या कालावधीशी संबंधित असणे आवश्यक आहे.

(ड) त्याचप्रमाणे, जेव्हा एखाद्या मुलीचे संगोपन कुटुंबातील सदस्यांनी वर सांगितल्याप्रमाणे संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहून केले असेल किंवा ती सामायिक घरात एकत्र राहत असेल किंवा कोणत्याही वेळी सामायिक घरात राहिली असेल किंवा संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणारा सदस्य म्हणून तिला सामाईक घरात राहण्याचा हक्क असेल आणि कोणत्याही प्रकारे हद्दपार झाली असेल किंवा कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडली असेल, तर डी.व्ही. कायदयाप्रमाणे उपाय योजना आहेत. [परि. ४३] [१०१७ - एफ – एच; १०१८ -ए -एच]

४.४ पीडित व्यक्ती आणि ज्याच्याविरोधात दिलासा मागण्यात आला आहे ती व्यक्ती यांच्यातील कौटुंबिक नातेसंबंध टिकले असल्याबद्दल उपस्थित केलेल्या प्रश्नाचा व्यापक आणि विस्तृत पद्धतीने अर्थ लावला गेला पाहिजे, जेणेकरून केवळ वर्तमानातील कौटुंबिक नातेसंबंधच नव्हे तर भूतकाळातील कौटुंबिक नातेसंबंधदेखील समाविष्ट होतील. त्यामुळे संसदेने जाणीवपूर्वक 'कौटुंबिक नातेसंबंध' या शब्दाचा अर्थ केवळ सामायिक घरातच एकत्र राहणाऱ्या दोन व्यक्तींमधील नातेसंबंध नव्हे, तर सामायिक घरात 'कोणत्याही वेळी एकत्र राहणाऱ्या' दोन व्यक्तींमधील नातेसंबंध असा केला आहे. [परि. ४३] [१०१९ – ए-बी]

४.५ अपीलकर्त्याचा विवाह उत्तरवादीचा मुलगा कुलदीप त्यागी याच्याशी दिनांक १८ जून, २००५ रोजी झाला आणि त्यानंतर लगेचच दिनांक १५ जुलै,

२००५ रोजी कार अपघातात त्याचा मृत्यू झाला. अपीलकर्त्याच्या म्हणण्यानुसार, उत्तरवादी आणि तिच्या कुटुंबातील सदस्यांनी अपीलकर्त्यास त्रास देण्यास सुरुवात केली आणि तिला सासरचे घर सोडण्यास भाग पाडले. स्वत:चा उदरनिर्वाह करण्यासाठी तिने डेहराडून येथे शिक्षिका म्हणून काम करण्यास सुरुवात केली. असे की, तिच्या लग्नाच्या वेळी स्त्रीधन देण्यात आले होते आणि ते उत्तरवादी आणि तिच्या कुटुंबियांनी वापरले होते आणि स्त्रीधनाच्या वस्तू परत करण्याची मागणी करणाऱ्या दिनांक २२ नोव्हेंबर २००६ रोजीच्या कायदेशीर नोटीशीला उत्तरवादी आणि तिच्या कुटुंबीयांकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. डीव्ही कायद्याच्या कलम १२ अन्वये दंडाधिकाऱ्यांसमोर अर्ज दाखल करण्याच्या तारखेपर्यंत जरी अपीलकर्ती प्रत्यक्षात सामायिक घरात राहत नव्हती ; तरीही ती पतीसोबत कौटुंबिक नातेसंबंधात राहिली होती आणि पुढे तिला सून म्हणून सामायिक घरात राहण्याचा अधिकार होता. उत्तरवादी - सासू आणि तिच्या कुटुंबियांनी केलेल्या जाचामुळे आणि मानसिक छळामुळे अपीलकर्ती-पीडित व्यक्तीला सामायिक घर सोडावे लागले. तिला ते घर सोडून स्वत:चा उदरनिर्वाह करावा लागला. अशा प्रकारे, पीडित व्यक्ती म्हणून, अपीलकर्तीला सामायिक घरातून काढून टाकले जाऊ शकत नाही कारण तसे करण्याचे कोणतेही वैध कारण नव्हते. आपल्या पतीचा अपघातात मृत्यू होईपर्यंत तिच्याशी कौटुंबिक नातेसंबंध असल्याने आणि त्याच्यासोबत एकत्र राहत असल्याने अपीलकर्तीला सामायिक घरात राहण्याचा अधिकार असल्याने, पतीचा रस्ते अपघातात मृत्यू

झाल्यानंतरसुद्धा तिला सामायिक घरात राहण्याचा अधिकार होता. पीडित व्यक्तीचे तिच्या लग्नामुळे कौटुंबिक नातेसंबंध कायम राहिले आणि सून असल्याने तिला सामायिक घरात राहण्याचा अधिकार होता. [परि. ४४] [१०१९- सी-जी]

५.१ कलम २ च्या खंड (ङ) मध्ये कौटुंबिक घटना अहवाल याचा अर्थ पीडित व्यक्तीकडून कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार मिळाल्यानंतर विहित नमुन्यात तयार केलेला अहवाल असा आहे. कलम १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, डी. व्ही. कायद्याच्या कलम १० च्या पोट-कलम (१) अन्वये सेवा प्रदात्यासह पीडित व्यक्ती किंवा संरक्षण अधिकारी किंवा पीडित व्यक्तीच्या वतीने इतर कोणतीही व्यक्ती दंडाधिकाऱ्याकडे डीव्ही कायद्यांतर्गत एका किंवा अधिक अनुतोशांकरिता अर्ज सादर करू शकते. कलम १२ च्या पोट- कलम (१) च्या परंतुकात असे नमूद करण्यात आले आहे की, अशा अर्जावर कोणताही आदेश काढण्यापूर्वी, दंडाधिकारी, त्याला संरक्षण अधिकाऱ्याकडून किंवा सेवा प्रदात्याकडून प्राप्त झालेल्या कोणत्याही कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनेचा अहवाल विचारात घेईल. कलम २ च्या खंड (ध) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे संरक्षण अधिकारी याचा अर्थ राज्य शासनाकडून कलम ८ च्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असा आहे. कलम ८ च्या पोट-कलम (२) मध्ये म्हटले आहे की, संरक्षण अधिकारी या, शक्यतोवर महिला असतील आणि त्यांच्याकडे विहित करण्यात येतील अशा अर्हता आणि अनुभव असेल. [परि. ४६] [१०२०-बी-डी]

५.२ वरील तरतुदींचे एकत्रित वाचन केल्यावर हे स्पष्ट होते की, पीडित व्यक्ती स्वत: किंवा पीडित व्यक्तीच्या वतीने इतर कोणतीही व्यक्ती दंडाधिकाऱ्यांकडे डीव्ही कायद्यांतर्गत एका किंवा अधिक अनुतोषाकरिता अर्ज सादर करू शकते. परंतु परंतुकात असे नमूद केले आहे की, जेव्हा एखाद्या कौटुंबिक घटनेचा अहवाल संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याकडून दंडाधिकाऱ्यांना प्राप्त होते, त्या प्रकरणी तो विचारात घेतला जाईल. म्हणून, जेव्हा पीडित व्यक्ती, संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याच्या मदतीने नव्हे, तर स्वत: किंवा वकिलाच्या मदतीने अर्ज दाखल करते, तेव्हा अशा परिस्थितीत संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याच्या भूमिकेचा विचार केला जात नाही. साहजिकच, संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याकडून दंडाधिकाऱ्यांना कौटुंबिक घटनेचा अहवाल प्राप्त होणार नाही. परंतुकाचा हेतू असा नाही की, कौटुंबिक घटना अहवालाअभावी, दंडाधिकारी डी. व्ही. कायद्यांतर्गत कोणताही आदेश देऊ शकत नाहीत, विशेषत: जेव्हा पीडित व्यक्तीने स्वत: किंवा कायदेशीर सल्लागारामार्फत दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल केला असेल. जरी, परंतुकामध्ये 'घेईल ' हा शब्द वापरण्यात आला असला तरी, तो केवळ अशा प्रकरणांपुरता मर्यादित आहे जिथे संरक्षण अधिकारी कोणताही कौटुंबिक घटना अहवाल दाखल करतो किंवा यथास्थिती सेवा प्रदाता असा अहवाल दाखल करतो. जेव्हा संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदाता कौटुंबिक घटना अहवाल दाखल करतो, तेव्हा अशा प्रकरणी दंडाधिकाऱ्याला त्याला प्राप्त झालेला असा अहवाल विचारात घेणे

आवश्यक आहे. परंतु जर पीडित व्यक्तीच्या वतीने असा अहवाल दाखल करण्यात आला नसेल तर तो अशा कोणत्याही अहवालाचा विचार करण्यास बांधील नाही. त्यामुळे संरक्षण अधिकारी किंवा यथास्थिती सेवा प्रदात्याकडून दंडाधिकाऱ्यांना प्राप्त झालेल्या कौटुंबिक घटना अहवालाच्या संदर्भात 'घेईल' हा शब्द वाचणे आवश्यक आहे, ज्या प्रकरणी दंडाधिकाऱ्यांना अहवाल विचारात घेणे बंधनकारक आहे. परंतु, जर असा कोणताही अहवाल दंडाधिकाऱ्यांना प्राप्त झाला नसेल तर दंडाधिकाऱ्यांनी अर्जावर कोणताही आदेश देण्यापूर्वी साहजिकच अशा कोणत्याही कौटुंबिक घटना अहवालाचा विचार करू नये. हे अशा प्रकरणात असू शकते जेव्हा पीडित व्यक्ती स्वत: दंडाधिकाऱ्यांकडे जाते किंवा डी. व्ही. कायद्यांतर्गत एक किंवा अधिक दिलासा मागण्यासाठी अर्ज सादर करण्यासाठी एखाद्या वकिलाची सेवा घेते किंवा वैध स्वीकारार्ह कारण / प्रयोजनासाठी संरक्षण अधिकारी किंवा यथास्थिती सेवा प्रदात्याने कौटुंबिक घटना अहवाल दाखल केला नाही. [परि. ४७] [१०२० - डी. एच ; १०२१-ए-डी]

५.३ अपीलकर्तीने दाखल केलेला अर्ज कौटुंबिक घटना अहवालासह नव्हता आणि म्हणूनच डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ च्या पोट-कलम (१ ) च्या तरतुदीनुसार दंडाधिकाऱ्याला अपीलकर्तीच्या बाजूने आदेश आणि निर्देश जारी करण्याचा अधिकार नव्हता असा निर्णय देण्यामध्ये उच्च न्यायालय योग्य नव्हते. [परि. ४८] [१०२१ -डी -इ]

५.४ संरक्षण अधिकाऱ्याकडून किंवा सेवा प्रदात्याकडून कौटुंबिक घटना अहवाल प्राप्त झाला तर पीडित व्यक्तीने दाखल केलेल्या अर्जावर कोणताही आदेश पारित करण्यापूर्वी, दंडाधिकाऱ्याने सदर अहवालाची नोंद घेणे बंधनकारक आहे, पण जर संरक्षण अधिकाऱ्याकडून किंवा सेवा प्रदात्याकडून दंडाधिकाऱ्यांना कोणतीही तक्रार किंवा कौटुंबिक हिंसाचाराचा अर्ज प्राप्त झाला नाही, तर असा अहवाल विचारात घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. डीव्ही कायद्यानुसार पीडित व्यक्तीने केवळ संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्यामार्फत दंडाधिकाऱ्यांसमोर अर्ज करणे बंधनकारक नाही. पीडित व्यक्ती स्वत: किंवा वकिलाची सेवा घेऊन थेट न्यायदंडाधिकाऱ्यांकडे अर्ज करू शकते. अशा परिस्थितीत, संरक्षण अधिकाऱ्याकडून किंवा सेवा प्रदात्याकडून कौटुंबिक घटना अहवाल दाखल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. अशा परिस्थितीत, डी.व्ही.कायद्यातील तरतुदींनुसार, पीडित व्यक्तींना दिलासा देणारा कोणताही अंतरिम किंवा अंतिम आदेश देण्याचा अधिकार दंडाधिकाऱ्यांना नाही, असे म्हणता येणार नाही. पीडित व्यक्तीने दाखल केलेल्या तक्रारीची किंवा अर्जाची दखल दंडाधिकारी घेऊ शकतात आणि नियम ५ अन्वये कौटुंबिक घटना अहवाल नसतानाही डीव्ही कायद्याच्या कलम १२ अन्वये उत्तरवादीला नोटीस बजावू शकतात. अशा प्रकारे, पीडित व्यक्तीच्या वतीने संरक्षण अधिकाऱ्यामार्फत किंवा सेवा प्रदात्यामार्फत तक्रार दाखल न केल्यास, नियम ५ अन्वये कौटुंबिक घटनेचा अहवाल नसताना, डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ अन्वये तक्रारीची दखल घेण्याचे अधिकार दंडाधिकाऱ्यांना आहेत.

**पीडित व्यक्तीला तात्काळ दिलासा द्यावा लागेल हे लक्षात घेऊन असे हेतूपूर्ण विवेचन करणे आवश्यक आहे आणि म्हणूनच या तरतुदीचा अशा पद्धतीने अर्थ लावला जाऊ शकत नाही, जी डीव्ही कायद्याच्या उद्देशाच्या विरुद्ध असेल, ज्यामुळे कलम १२ चा हेतू आणि उद्देश हिरावून घेतला जातो. [परि. ४९] [१०२५-जी; १०२६ – ए-इ]**

नयनकुमार वि. कर्नाटक राज्य **आयएलआर २००९ कर्नाटक ४२९५;** अभिराम गोगोई वि. रश्मी रेखा गोगोई **(२०११) ४ गुवाहाटी लॉ अहवाल २७६;** मो. बसीत वि. आसाम राज्य आणि इतर **(२०१२) १ गुवाहाटी लॉ अहवाल ७४७;** राहुल सुरमा वि. हिमाचल प्रदेश **(२०१२) एससीसी ऑनलाइन एचपी २५७४;** ए विद्या सागर वि. आंध्र प्रदेश राज्य **२०१४ एससीसी ऑनलाइन हैदराबाद ७१५;** रवी कुमार बाजपेयी वि. रेणु अवस्थी बाजपेयी **आयएलआर (२०१६) एमपी ३०२;** शंभू प्रसाद सिंग वि. मंजरी **१९० (२०१२) डीएलटी ६४७;** राकेश चौधरी वि. वंदना चौधरी **२०१९ एससीसी ऑनलाइन जे अँड के ५१२;** विजय मारुती गायकवाड वि. सविता विजय गायकवाड **२०१८ (१) एचएलआर २९५;** सूरज शर्मा वि. भारती शर्मा **२०१६ एससीसी ऑनलाइन छ १८२५ - मान्य.**

रमा सिंग वि. माया सिंग **(२०१२) ४ एमपीएलजे ६१२;** रवी दत्त वि. किरण दत्त आणि अन्य एक **२०८ (२०१४) डिएलटी ६१ - अमान्य.**

५.५ मुख्य तरतुदीच्या संदर्भातील परंतुकाच्या विवेचनावर नियंत्रण ठेवणारी तत्त्वे अशी आहेत की, परंतुकाचे सर्वसाधारण कार्य म्हणजे तरतुदीबाहेर एखादया गोष्टीला अपवाद करणे किंवा त्यामध्ये लागू केलेली एखादी गोष्ट पात्र ठरविणे, परंतु जे परंतुकासाठी तरतुदीच्या कक्षेत असेल. एक सामान्य नियम म्हणून, कायद्यात जे आहे त्यास पात्र ठरविण्यासाठी किंवा अपवाद निर्माण करण्यासाठी कायद्यात एखादे परंतुक अंतर्भूत केले जाते आणि सामान्यतः परंतुकाचा अर्थ सामान्य नियम सांगण्यासाठी केला जात नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, परंतुक हे अपवादाची तरतूद करून मुख्य कायदयाच्या सर्वसाधारणतेस पात्र ठरते आणि मुख्य कायद्यातून तो जसा होता तसा भाग काढून टाकतो, जो तरतुदीसाठी, परंतु परंतुकासाठी तो मुख्य तरतुदीत समाविष्ट होतो. तसेच, परंतुकाचा अर्थ तरतूद रद्दबातल करणे किंवा कायद्याने दिलेला अधिकार पूर्णपणे हिरावून घेणे असा लावता येऊ शकत नाही. पुढे, काही नियम असे आहेत की, पहिली गोष्ट म्हणजे, परंतुकाचा अर्थ असा होऊ नये की एखादी गोष्ट ध्वनित अर्थाने वगळणे किंवा अंतर्भूत करणे, म्हणजेच योग्य रचना केल्यावर जेव्हा मुख्य तरतूद स्पष्ट असते, तेव्हा परंतुक तिचा विस्तार करू शकत नाही किंवा तिला मर्यादित करू शकत नाही. दुसरं म्हणजे, ज्या तरतुदीशी परंतुक जोडले गेले आहे, त्या संदर्भात त्याचा अर्थ समजावून घेणे आवश्यक आहे, म्हणजेच सामान्यतः एखादे परंतुक हे ज्या तरतुदीला ते परंतुक आहे, त्यापलीकडे जात नाही. अन्य तरतुदीला नव्हे तर, ज्या मुख्य तरतुदीला ते परंतुक म्हणून लागू

करण्यात आले आहे, त्या तरतुदीला ते अपवाद आखून देते. परंतु, जर एखाद्या कायद्यातील परंतुक एखाद्या कलमाचा भाग बनत नसेल, तर ते स्वत:च एक स्वतंत्र कलम म्हणून लागू केले गेले असेल, तर अपवाद म्हणून किंवा पात्र होण्यासाठी, परंतुक कोणत्या कलमासाठी करण्यात आले आहे ते निश्चित करणे आवश्यक ठरते. कधीकधी, मुख्य कलमाच्या रचनेसाठी मार्गदर्शक म्हणून परंतुकाचा वापर केला जातो. तिसरे म्हणजे, जेव्हा कलमात शब्दांची दोन संभाव्य रचना आढळते, तेव्हा मुख्य कलमाचा अर्थ लावण्यासाठी परंतुकाचा विचार केला जाऊ शकतो. मात्र, जेव्हा मुख्य तरतूद स्पष्ट असते, तेव्हा परंतुकाद्वारे तिला कमकुवत करता येऊ शकत नाही. अशा प्रकारे, जेथे मुख्य कलम स्पष्ट नसते, तेथे मुख्य तरतुदीचा अर्थ आणि व्याप्ती निश्चित करण्यासाठी परंतुकाचा विचार करता येऊ शकतो. एखाद्या परंतुकाचा असा अर्थ काढू नये की, जेणे करून ते निरर्थक ठरेल. काही प्रकरणांमध्ये, "वगळण्याचे कायदेविषयक साधन पूर्ण भागातून केवळ एक भाग वगळण्यासाठी स्वीकारले जाते, जे वगळण्यासाठी त्याचा एक भाग म्हणून राहते ", आणि वगळण्याच्या शब्दांना काही अर्थ आहे असे मानले जाते आणि ते केवळ अधिशेष म्हणून सहजपणे ओळखले जात नाहीत. परिणामी, मुख्य कायदा आणि परंतुक निरर्थक किंवा परिणामशून्य होऊ नयेत अशा प्रकारे परंतुकाचा अर्थ लावला पाहिजे, असे नमूद करण्यात आले आहे. हे विशेषतः तेव्हा असते, जिथे परंतुकाचा उद्देश कधीकधी केवळ खूप सावधगिरीद्वारे असतो, विशेषत: जेव्हा कायद्याचे कार्यात्मक शब्द अतिशय स्पष्ट

**असतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, अशा प्रकरणात परंतुकाचा उद्देश कोणतीही शंका दूर करणे असा असतो. अशी ही उदाहरणे आहेत जेथे एखादे परंतुक हे, केवळ अपवाद किंवा आधी नमूद केलेल्या गोष्टींना पात्र म्हणून नव्हे तर, स्वतंत्र कायद्याच्या स्वरूपात असते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, जर मूळ कायदा परंतुकाच्या स्वरूपात शब्दबद्ध केला असेल, तर ते आधी शब्दबद्ध केलेल्या किंवा आधी सांगितलेल्या गोष्टींपेक्षा भिन्न परिस्थितींबद्दल एक स्वतंत्र वैधानिक तरतूद असेल. कधीकधी, एखादे परंतुक म्हणजे विशेष प्रकरणांत सर्वसाधारण कायद्यापेक्षा विशेष फरक करणे आणि त्यासाठी विशेषतः तरतूद करणे होय. [परि. ५०] [१०२६-इ-एच; १०२७- ए -एच ; १०२८ -ए-बी]**

ईश्वरलाल ठाकोरलाल अल्मौला वि. मोतीभाई नागजीभाई **एआयआर १९६६ एससी ४५९ : [१९६६] एससीआर ३६७** ; कविराज पंडित दुर्गा दत्त शर्मा वि. नवरत्न फार्मास्युटीकल लॅबोरेटरीज **एआयआर १९६५ एससी ९८० : [१९६५] एससीआर ७३७** ; केदारनाथ ज्यूट मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि. वि. वाणिज्यिक कर अधिकारी आणि इतर **एआयआर १९६६ एससी १२ : [१९६५] एससीआर ६२६**; दत्तात्रय गोविंद महाजन आणि इतर वि. महाराष्ट्र राज्य आणि अन्य एक **एआयआर १९७७ एससी**

**९१५ : [१९७७] २ एससीआर ७९०;** एस. सुंदरम पिल्लई, वगैरे वि. व्ही. आर. पट्टबिरामन **एआयआर १९८५ एससी ५८२: [१९८५] २ एससीआर ६४३;** एम. पेंटिया वि. मुददल विरमलाप्पा **एआयआर १९६१ एससी ११०७: [१९६१] एससीआर २९५;** अधीक्षक आणि विधी परामर्शी, पश्चिम बंगाल वि. अबानी मैती **एआयआर १९७९ एससी १०२९ : [१९७९] ३ एससीआर ४७२ - संदर्भित.**

न्यायमूर्ती जी. पी. सिंग, 'प्रिन्सिपल्स ऑफ स्टॅटयूटरी इंटरप्रीटेशन' १५० वी आवृत्ती **- संदर्भित.**

**५.६ तात्कालिक प्रकरणात, जेव्हा परंतुक हे मुख्य तरतुदीच्या संदर्भात वाचण्यात येते, ज्याची सुरुवात 'डी. व्ही. अधिनियमान्वये एका किंवा अधिक अनुतोषची मागणी करण्याकरिता पीडित व्यक्ती किंवा संरक्षण अधिकारी किंवा पीडित व्यक्तीच्या वतीने इतर कोणतीही व्यक्ती, यांना दंडाधिकाऱ्याकडे अर्ज सादर करता येईल.' या शब्दांनी होते आणि त्यातून स्पष्टपणे असे सूचित होते की पीडित व्यक्ती स्वत: किंवा तिच्या वकिलाद्वारे दंडाधिकाऱ्यांकडे डी. व्ही. अधिनियमान्वये कोणत्याही दिलाशाची मागणी करू शकते. अशा परिस्थितीत कौटुंबिक घटनेचा अहवाल दाखल करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतुकामधील 'घेईल' हा शब्द संदर्भानुसार वाचला पाहिजे म्हणजेच, जेथे संरक्षण अधिकारी**

किंवा सेवा प्रदात्यामार्फत पीडित व्यक्तीच्या वतीने दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज करण्यात आला असेल, तेथे संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदाता यांनी कोणताही कौटुंबिक घटना अहवाल दाखल केल्यास, तो विचारात घेणे दंडाधिकाऱ्यांना बंधनकारक आहे. संरक्षण अधिकाऱ्याने अहवाल दाखल करणे ही, पीडित व्यक्तीने जरी स्वत:च दाखल केलेल्या किंवा तिच्या वकिलामार्फत दाखल केलेल्या तक्रारीवर दंडाधिकाऱ्यांनी कार्यवाही करण्यासाठी पूर्वअट आहे, असा जर संसदेचा हेतू असता, तर तसे व्यक्त करण्यात आले असते. परंतु कलम १२ चे पोट- कलम (१) हे परंतुकासह एकत्रित वाचले असता, तसा हेतू दिसून येत नाही. अशा प्रकारे, डी.व्ही. अधिनियमाच्या कलम १२ अन्वये असलेल्या मुबलक अधिकाराची त्यानुसार अर्थउकल करण्यात येते आणि संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याच्या मदतीशिवाय पीडित व्यक्तीने दाखल केलेल्या अर्जावर उत्तरवादीला नोटीस बजावण्यासाठी पूर्व अट आणि त्यामुळे कौटुंबिक घटना अहवालाचा अभाव या बाबी उद्भवत नाहीत. जर विपरीत अर्थ लावायचा असेल तर कलम १२ च्या पोट- कलम (१) मधील सुरुवातीचे शब्द परिणामशून्य ठरतील आणि प्रत्येक पीडित व्यक्तीला प्रथम संरक्षण अधिकारी किंवा यथास्थिती सेवा प्रदात्याशी संपर्क साधावा लागेल आणि कौटुंबिक घटनेचा अहवाल तयार करून त्यानंतर डी. व्ही. कायद्यांतर्गत दिलासा मिळावा म्हणून दंडाधिकाऱ्यांकडे जावे लागेल, जो संसदेचा हेतू नाही. [परि. ५१] [१०३० – जी-एच; १०३१ ए-इ]

**६. उच्च न्यायालयाने आणि सत्र न्यायालयाने पारित केलेला न्यायनिर्णय रद्द बातल ठरवण्यात येत आहेत आणि विशेष न्यायदंडाधिकाऱ्यांनी पारित केलेल्या आदेश कायम करण्यात येत आहे. [परि. ५३] [१०३२-जी-एच]**

सतीश चंदर आहूजा वि. स्नेहा आहूजा (२०२१) १ एससीसी ४१४ ; जुविरया अब्दुल मजीद पटनी वि. आतिफ इक्बाल मन्सूरी आणि अन्य एक (२०१४) १० एससीसी ७३६ : [ २०१४ ] १० एससीआर ४७९; व्ही . डी. भानोत वि. सविता भानोत (२०१२) ३ एससीसी १८३ : [२०१२] १ एससीआर ८६७ ; कृष्णा भट्टाचारजी वि. सारथी चौधरी आणि अन्य एक (२०१६ ) २ एससीसी ७०५ : [२०१५] १४ एससीआर ६५ ; सरस्वती वि. बाबू (२०१४) ३ एससीसी ७१२ : [२०१३] १२ एससीआर ९१४ ; रश्मी कुमार वि. महेश कुमार भादा ( १९९७ ) २ एससीसी ३९७ : [ १९९६ ] १० एससीआर ३४७ ; अजय कुमार वि. लता उर्फ शरुती आणि इतर ( २०१९ ) १५ एससीसी ३५२ : [२०१९] ६ एससीआर २८३ ; सतीश चंदर आहूजा वि. स्नेहा आहूजा (२०२१) १ एससीसी ४१४ ; एस . आर . बत्रा वि. तरुणा बत्रा ( २००७ ) ३ एससीसी १६९ : [ २००६ ]

१० एससीआर १२०६ ; हरभजन सिंग वि. प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया एआयआर २००२ एससी १३५१ : [२००२] २ एससीआर - संदर्भित.

## निर्णयविधि संदर्भ

| | | |
|---|---|---|
| **(२०२१)१ एससीसी ४१४** | **संदर्भित** | **परि. १६ (iii)** |
| **(२०१४)१० एससीसी ४७९** | **संदर्भित** | **परि. २१ (अ)** |
| **(२०१२)१ एससीआर ८६७** | **संदर्भित** | **परि. २१ (अ)** |
| **(२०१५)१४ एससीआर ६५** | **संदर्भित** | **परि. २१ (ब)** |
| **[२०१३] १२ एससीआर ९१४** | **संदर्भित** | **परि. २१ (ब)** |
| **[१९९६] १० पुरवणी एससीआर ३४७** | **संदर्भित** | **परि. २१ (ब)** |
| **[२०१९] ६ एससीआर २८३** | **संदर्भित** | **परि. २१ (क )** |
| **[२०२१] १ एससीसी ४१४** | **संदर्भित** | **परि. २१ (ड)** |
| **[२००६] १० पुरवणी एससीआर १२०६** | **संदर्भित** | **परि. २१ (ड)** |
| **[२००२] २ एससीआर ३६९** | **संदर्भित** | **परि. २६** |
| **[२०१०] १३ एससीआर ७०६** | **संदर्भित** | **परि. ४२ (अ)** |
| **[२०१३] १४ एससीआर १०१९** | **संदर्भित** | **परि. ४२ (ब )** |
| **[१९६६] एससीआर ३६७** | **संदर्भित** | **परि. ४९ (ड) (i)** |
| **[१९६५] एससीआर ७३७** | **संदर्भित** | **परि. ४९ (ड) (ii)** |
| **[१९६५] एससीआर ६२६** | **संदर्भित** | **परि. ४९ (ड) (iii)** |
| **[१९७७] २ एससीआर ७९०** | **संदर्भित** | **परि. ४९ (ड) (iv)** |

| | | |
|---|---|---|
| **[१९८५] २ एससीआर ६४३** | **संदर्भित** | **परि. ४९ (ड) (v)** |
| **[१९६१] एससीआर २९५** | **संदर्भित** | **परि. ४९ (फ) (i)** |
| **[१९७९] ३ एससीआर ४७२** | **संदर्भित** | **परि. ४९ (फ ) (ii)** |

फौजदारी अपीलिय अधिकारिता : फौजदारी अपील क्र. ५११/२०२२.

फौजदारी पुनरीक्षण क्र. १८६/२०१४ मध्ये नैनीताल येथील उत्तराखंड उच्च न्यायालयाच्या दिनांक २३.०७.२०१९ च्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्यातर्फे डॉ. विनोद कुमार तिवारी, गौरव अग्रवाल, अधिवक्ते.

उत्तरवादींतर्फे के. के. श्रीवास्तव, कुमार राजीव, एस. के. वर्मा, अधिवक्ते

न्यायालयाचा निर्णय **नागरत्ना, न्या.** यांनी दिला.

पीडित व्यक्ती, जी येथे अपीलकर्ती असून, जिने विशेष न्यायदंडाधिकारी - १, डेहराडून यांच्या न्यायालयात किरकोळ खटला क्र. ७८/२००७ दाखल केला होता, तिने नैनीताल येथील उत्तराखंड उच्च न्यायालयाने फौजदारी पुनरीक्षण क्र. १८६/२०१४ मध्ये पारित केलेल्या दिनांक २३ जुलै २०१९ च्या न्यायनिर्णयास आव्हान दिले आहे, ज्याद्वारे डेहराडूनच्या पाचवे अतिरिक्त सत्र न्यायाधीश, डेहराडून, यांनी फौजदारी अपील क्र. ५३/२०११ मध्ये दिनांक ११ जुलै २०१४ रोजी विशेष न्याय दंडाधिकारी यांनी पारित केलेला आदेश रद्दबातल केला होता, तो कायम केला होता.

२. सोयीसाठी, येथे पक्षकारांना संपरीक्षा न्यायालयासमोरील त्यांच्या पद आणि दर्जानुसार संदर्भित केले जाईल.

**तथ्यात्मक पार्श्वभूमी:**

३. पीडित व्यक्तीच्या मते, दिवंगत विष्णुदत्त त्यागी यांचा मुलगा कुलदीप त्यागी (मयत) याच्याशी तिचा विवाह दिनांक १८ जून २००५ रोजी उत्तराखंडच्या हरिद्वार जिल्ह्यात हिंदू रीतीरिवाजांनुसार झाला होता आणि या विवाहाच्या अनुषंगाने पीडित व्यक्तीच्या कुटुंबियांनी तिचा मृत पतीच्या कुटुंबीयांना हुंडा आणि आणि पीडित व्यक्तीला स्त्रीधन दिले होते. . लग्नानंतर लगेचच काही काळ पीडित व्यक्ती उत्तरवादीच्या वडिलोपार्जित घरात, आपल्या ससासू-उत्तरवादी क्र. १, दोन दीर आणि तिच्या पतीच्या मोठ्या भावाची पत्नी आणि सहा नणंदा यांच्यासोबत राहत होती. त्यानंतर पीडित महिला आपल्या पती आणि उत्तरवादी यांच्यासह झाबरेडा गावात राहू लागली. असे की, पीडित व्यक्तीचे पती कुलदीप त्यागी यांचे १५ जुलै २००५ रोजी कार अपघातात निधन झाले आणि पतीच्या तेराव्या नंतर पीडित महिलेला सुरुवातीला दिल्ली येथे तिच्या वडिलांच्या घरी राहण्यास भाग पाडण्यात आले. असे की, पतीच्या मृत्यूपूर्वी पीडित महिलेने बाळाला जन्म दिला होता.

४. असे की, ३० मार्च, २००६ रोजी पीडित व्यक्तीने मुलीला जन्म दिला आणि पतीच्या मृत्यूनंतर तिच्या सासरच्या कुटुंबाने तिच्याशी केलेल्या

गैरवर्तन आणि छळामुळे ती आपल्या मुलीसह डेहराडून, उत्तराखंड येथे गेली, जिथे तिने स्वतःचा आणि आपल्या बाळाचा उदरनिर्वाह करण्यासाठी शिक्षक म्हणून काम करण्यास सुरवात केली. असे की, लग्नाच्या वेळी तिला दिलेले स्त्रीधन तिला कधीच उपभोगू दिले नव्हते आणि सासरच्या घरातून बाहेर पडल्यानंतरही स्त्रीधनाचा वापर तिच्या सासरचे लोक, उत्तरवादी क्रमांक १ ते ६ करत होते. असे की, पीडित व्यक्तीने २२ नोव्हेंबर २००६ रोजी कायदेशीर नोटीस पाठवून स्त्रीधनाच्या वस्तू परत करण्याची विनंती केली होती, मात्र त्याला प्रतिसाद मिळाला नाही.

५. असे की, पीडित व्यक्तीच्या वडिलांनी लग्नाच्या वेळी तिला मारुती (ऑल्टो) कार भेट म्हणून दिली होती आणि ती तिच्या मृत पतीच्या नावावर नोंदणीकृत होती. पतीला झालेल्या अपघातामुळे त्यांचा मृत्यू झाल्याने संबंधित कारचेही नुकसान झाले होते. पीडितेच्या सासूने गाडीच्या नुकसानीच्या दाव्याची कार्यवाही करणाऱ्या नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडे अर्ज सादर केला होता आणि त्यात ती मृताची आई असून ती मृताची एकमेव कायदेशीर वारसदार आहे आणि त्यामुळे कोणतीही नुकसानभरपाई तिच्या नावे देण्यात येईल असे नमूद केले होते.

६. झाबरेडा गावात एक जमीन आहे, ज्यावर पीडित व्यक्तीच्या मृत पतीचा अधिकार आणि मालकी हक्क होता. असे की, उत्तरवादी क्रमांक १- सासूने इतर उत्तरवादींच्या चिथावणीमुळे संबंधित मालमत्तेच्या महसुली नोंदीत

पीडित व्यक्तीचे नाव नोंदविण्यास आक्षेप घेतला. पीडित व्यक्तीने जन्माला घातलेले मूल कुलदीप त्यागी यांची मुलगी नाही, असे नमूद करून उत्तरवादी क्र. १ हिने आक्षेप घेतला. अशा आक्षेपामुळे तहसीलदार न्यायालयाने या मालमत्तेबाबत जैसे थे स्थिती राखण्याचा आदेश दिला.

७. असे की, पतीच्या मालमत्तेवर हक्क सांगण्याचा प्रयत्न केल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी उत्तरवादींनी पीडित व्यक्तीला अनेकदा दिली. असे की, गरोदर असताना जीवघेण्या अपघातात पती गमावलेल्या पीडित व्यक्तीबद्दल कोणतीही सहानुभूती नसलेल्या उत्तरवादींनी तिचे मूल कुलदीप त्यागी यांची मुलगी असल्याचे नाकारून तिचा मानसिक छळ केला.

८. वरील तक्रारींसह पीडित व्यक्तीने कलम १२ अन्वये विशेष न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात धाव घेतली आणि कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ (संक्षिप्ततेसाठी डी. व्ही. अधिनियम') च्या विविध तरतुदींनुसार संरक्षण आदेश, निवासाबाबतचे आदेश आणि नुकसान भरपाईचे आदेश देण्याची मागणी केली. तसेच डीव्ही अधिनियमाच्या कलम २२ अन्वये आर्थिक सवलती मिळाव्यात, अशी प्रार्थनाही करण्यात आली.

९. पीडित व्यक्तीने दाखल केलेल्या वरील अर्जाला उत्तर देताना उत्तरवादींनी संयुक्त लेखी निवेदन दाखल केले की, दिनांक १८ जून २००५ रोजी

पीडित व्यक्तीचा कुलदीप त्यागी यांच्याशी हरिद्वार येथे एका साध्या समारंभात विवाह पार पडला. असे की, समारंभाच्या वेळी कोणताही हुंडा किंवा स्त्रीधनाच्या वस्तू उत्तरवादींना सुपूर्द करण्यात आल्या नव्हत्या आणि त्यामुळे त्या उत्तरवादींनी पीडित व्यक्तीला परत करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. असे की, पीडित व्यक्तीला विवाहाच्या तारखेपासून अठ्ठावीस दिवसांच्या कालावधीत मृत व्यक्तीमार्फत मूल होऊ शकले नसते आणि त्यामुळे तसा दावा केवळ खोटाच नव्हे तर अनैसर्गिक होता.

१०. असे की, उत्तरवादींनी पीडित व्यक्तीवर कोणत्याही प्रकारे अत्याचार केला नाही. लग्नानंतरच्या कालावधीत ती आपल्या पतीच्या वडिलोपार्जित घरी राहत होती, हे तिचे विधान चुकीचे होते कारण लग्नानंतर ती फक्त एका रात्री साठी उत्तरवादींकडे राहिली होती.

११. मारुती (ऑल्टो) कारबाबत असे म्हटले होते की, ही कार पीडित व्यक्तीला देण्यात आलेल्या स्त्रीधनाचा भाग नव्हती , तर कुलदीप त्यागी यांनी उत्तरवादी क्र. १ कडून या कामासाठी पैसे उधार घेऊन खरेदी केली होती.

असे की, पीडित व्यक्तीने खोटी माहिती सादर करून कुलदीप त्यागी यांच्या मालकीच्या जमिनीच्या संदर्भात त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून आपले नाव नोंदवले होते. असे की, ३१ मार्च, २००६ रोजीच्या सदर अर्जात त्यांनी कुलदीप त्यागी यांना मूलबाळ किंवा वारस नसल्याचे नमूद केले होते. असे

की, उत्तरवादी क्र. १ ने तहसीलदारांसमोर योग्य वस्तुस्थिती मांडून जैसे थे स्थिती राखण्याचा आदेश मिळविला होता.

उत्तरवादींनी कौटुंबिक हिंसाचाराचे कोणतेही कृत्य केले नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्या पार्श्वभूमीवर पीडित व्यक्ती-पीडितेने दाखल केलेला अर्ज फेटाळण्यात यावा, अशी विनंती उत्तरवादींनी संपरीक्षा न्यायालयासमोर केली.

१२. विशेष न्यायदंडाधिकारी- १, डेहराडून यांनी १२ मे २०११ च्या न्यायनिर्णयाद्वारे पीडित व्यक्तीने दाखल केलेला अर्ज अंशतः मंजूर केला आणि उत्तरवादींना पीडित व्यक्तीचा अपमान आणि बदनामी केल्याबद्दल १०,०००/- रुपये आर्थिक नुकसान भरपाई म्हणून देण्याचे निर्देश दिले. मारुती (ऑल्टो) कार वगळता अर्जासोबत जोडलेल्या यादीमध्ये स्त्रीधनाच्या वस्तू पीडित व्यक्तीला तिच्या डेहराडून येथील निवासस्थानी उपलब्ध करून देण्यात येणार होत्या. दिवंगत कुलदीप त्यागी यांच्या मालमत्तेचा उपभोग घेण्यापासून पीडित व्यक्ती आणि तिच्या मुलीला उत्तरवादींनी अडथळा आणू नये, असे निर्देशही देण्यात आले होते.

संपरीक्षा न्यायालयाचे ठळक निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :

i) पीडित व्यक्तीला अठ्ठावीस दिवसांच्या आत गर्भधारणा होणे अनैसर्गिक आहे, या उत्तरवादींच्या युक्तिवादाबाबत संपरीक्षा न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, अशी वस्तुस्थिती असण्याची

पूर्ण शक्यता होती. असा निष्कर्ष काढताना, संपरीक्षा न्यायालयाने उत्तरवादींच्या या युक्तिवादाचा आधार घेतला की, पीडित व्यक्ती २० जून २००५ रोजी आपले वडिलोपार्जित घर सोडून पतीसोबत स्वतंत्रपणे राहण्यासाठी गेली. या युक्तिवादाच्या अनुषंगाने संपरीक्षा न्यायालयाने असे नमूद केले की, पीडित व्यक्ती मृत्यूच्या दिवसापर्यंत तिच्या पतीसोबत राहत होती आणि त्यामुळे तिच्या गरोदरपणाबाबत काहीही अनैसर्गिक नव्हते आणि म्हणूनच मुलगी कुलदीप त्यागीची नसल्याचा उत्तरवादींचा युक्तिवाद निराधार होता.

ii) कुलदीप त्यागीला पीडित व्यक्तीशिवाय इतर कोणीही वारसदार नव्हते असे पीडित व्यक्तीने तहसीलदार समोर दाखल केलेल्या अर्जात चुकीचे नमूद केले होते कारण तिला अशा जबाबाची काहीही कल्पना नव्हती, या बाबीवरून कोणताही प्रतिकूल निष्कर्ष काढता येऊ शकत नव्हता.

iii) पीडित व्यक्तीच्या मुलीच्या पितृत्वाशी संबंधित आरोपामुळे तिचे भावनिक नुकसान झाले असण्याची शक्यता होती, ज्यामुळे तिच्या शिक्षक म्हणून व्यवसायावरही परिणाम झाला होता. त्या अनुषंगाने पीडित व्यक्ती डी. व्ही. अधिनियमाच्या कलम १ (ड) (३) अन्वये कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले.

पीडित व्यक्तीला झालेल्या भावनिक नुकसानीबद्दल रु.१००००/- इतकी प्रतीकात्मक रक्कम भरपाई म्हणून देण्यात आली.

iv) उत्तरवादींनी वारंवार टोमणे मारल्यामुळे आणि शिवीगाळ केल्यामुळे पतीच्या मृत्यूनंतर तेरा दिवसांनी पीडित व्यक्तीने आपले सासरचे घर सोडले. असे की, ही वस्तुस्थिती खोडून काढण्यासाठी उत्तरवादींकडून कोणतीही उलटतपासणी झाली नाही. त्यामुळे पीडित व्यक्तीने स्वत:च्या इच्छेने नव्हे, तर उत्तरवादींच्या वर्तणुकीमुळे सासरचे घर सोडले असल्याचे सिद्ध झाले.

iv) असे की, कुलदीप त्यागी यांचे निधन झाल्यानंतर पीडित व्यक्तीने दुसरं लग्न केलं नाही. त्यामुळे ती उत्तरवादींच्या कुटुंबाची सून राहिली आणि आपल्या मृत पतीच्या मालमत्तेवर तिचा हक्क होता. डी.व्ही. कायद्याच्या कलम १९ अन्वये पतीच्या घरी जाण्याच्या स्वातंत्र्यासह स्वतंत्र निवासासाठी दिलासा देण्यात आला, कारण पीडितेचे सासरचे घर हे पीडितेच्या सासूच्या एकमेव मालकीचे होते, हे दर्शविणारे कोणतेही पुरावे नव्हते. असे की, तिच्या मृत पतीने त्याच्या हयातीत ज्या सुविधा उपभोगल्या तशाच सोयी-सुविधा तिलासुद्धा मिळण्यास ती पात्र असेल. पीडितेच्या पतीच्या मालमत्तेवर पीडितेच्या हक्कांवर गदा आणण्यास उत्तरवादींना मनाई करण्यात आली. परंतु, हे स्पष्ट करण्यात

आले की, पीडितेचे नाव महसुली नोंदीत नोंदविण्यासंदर्भात कोणतेही आदेश देण्याचा अधिकार दंडाधिकाऱ्यांना नव्हता.

vi) असे की, विवाहाच्या वेळी स्त्रीधन दिले नव्हते हे सिद्ध करणारे कोणतेही पुरावे उत्तरवादींनी सादर केले नव्हते. त्यामुळे दंडाधिकाऱ्यांकडे दाखल केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या यादीमध्ये नमूद केलेल्या स्त्रीधनाच्या सर्व वस्तू पीडितेला परत करण्याचे निर्देश देण्यात आले.

१३. व्यथित होऊन, उत्तरवादी क्र. १ पीडित व्यक्तीची सासू हिने पाचवे अतिरिक्त सत्र न्यायाधीश, डेहराडून यांच्या न्यायालयात फौजदारी अपील क्र. ५३/२०११ दाखल केले. दिनांक ११ जुलै, २०१४ रोजीच्या न्यायनिर्णयाद्वारे प्रथम अपीलिय न्यायालयाने संपरीक्षा न्यायालयाचा दिनांक १२ मे, २०११ रोजीचा न्यायनिर्णय रद्दबातल ठरविला.

प्रथम अपिलीय न्यायालयाचे संबंधित निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत:

*i*) असे की, पीडित व्यक्ती झाबरेडा येथे असलेल्या उत्तरवादींच्या सामायिक घरात कधीच राहत नव्हती, परंतु आपल्या पतीसह रुरकी येथे राहत होती. असे की, पीडित व्यक्ती रुरकी येथे घर चालवत होती आणि

कामानिमित्त दररोज झाबरेडा येथे जात होती, परंतु ती उत्तरवादींसोबत कधीही घरात राहिली नव्हती.

ii) पीडित व्यक्ती उत्तरवादींसोबत झाबरेडा येथे कधीच राहत नसल्यामुळे तिच्या कुटुंबीयांनी स्त्रीधनाच्या वस्तू झाबरेडा येथील उत्तरवादींपर्यंत पोचवले असण्याची शक्यता नव्हती. असे की, स्त्रीधनाचा ताबा उत्तरवादींकडे नव्हता. त्यामुळे प्रत्यक्षात कधीच त्यांच्या ताब्यात नसलेले स्त्रीधन उत्तरवादीनी हलविण्याचा किंवा वापरण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही.

iii) असे की, पतीच्या मृत्यूनंतर ती तेरा दिवस उत्तरवादींसोबत झाबरेडा येथे राहत होती, हे सिद्ध करण्यासाठी पीडित महिलेने कोणताही पुरावा सादर केला नव्हता. असे की, पतीच्या मृत्यूनंतरही ती रुरकी येथेच राहत होती. असे की, पीडित व्यक्ती कधीतरी उत्तरवादींसोबत राहिली हे दर्शविणारा कोणताही पुरावा नसल्यामुळे, उत्तरवादींविरुद्ध कौटुंबिक हिंसाचाराचा कोणताही गुन्हा सिद्ध होत नव्हता. असे की, मृत पती आणि उत्तरवादींच्या संयुक्त मालकीच्या मालमत्तेच्या कायदेशीर विभागणीनंतर तिला विशिष्ट वाटा मिळेपर्यंत पीडित व्यक्ती निवासाच्या आदेशाच्या दृष्टीने कोणताही दिलासा मिळण्यास पात्र नव्हती.

iv) असे की, उत्तरवादींना स्त्रीधन देण्याबाबत कोणताही पुरावा नसल्यामुळे, पीडित व्यक्तीला स्त्रीधनाच्या वस्तूंचा ताबा परत देण्याबाबत कोणतेही आदेश देता येत नाहीत.

१४. प्रथम अपीलीय न्यायालयाच्या न्यायनिर्णयामुळे व्यथित होऊन, पीडित व्यक्तीने डेहराडून येथील उत्तराखंड उच्च न्यायालयात फौजदारी पुनरीक्षण याचिका दाखल केली. दिनांक २३ जुलै, २०१९ रोजीच्या न्यायनिर्णयाद्वारे फौजदारी पुनरीक्षण याचिका फेटाळण्यात आली आणि पाचवे अतिरिक्त सत्र न्यायाधीश, डेहराडून यांचा न्यायनिर्णय कायम करण्यात आला.

आक्षेपित न्यायनिर्णयात उच्च न्यायालयाने खालील निष्कर्ष नोंदवले :

i) असे की, डीव्ही अधिनियमाच्या कलम १२ (१) मधील तरतुदींनुसार संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याने दंडाधिकाऱ्यांसमोर कौटुंबिक घटनेचा अहवाल दाखल करणे आवश्यक आहे आणि अशा अहवालाच्या आधारे दंडाधिकारी डीव्ही कायद्यांतर्गत गुन्ह्याची दखल घेऊ शकतील. असे की, प्रस्तुत प्रकरणात, पीडित व्यक्तीने कौटुंबिक हिंसाचाराचा आरोप करणारा केवळ अर्ज दाखल केला होता आणि त्यासोबत अहवाल नसल्याने डीव्ही कायद्याच्या कलम १२ (१) मधील अटींची पूर्तता झाली नव्हती.

ii) असे की, डी.व्ही. अधिनियमात प्रतिपादन केल्यानुसार उत्तरवादींनी हिंसाचार केला होता हे सिद्ध करण्यासाठी पीडित व्यक्ती उत्तरवादींसोबत घरात राहत असणे आणि पक्षकारांमध्ये कौटुंबिक नातेसंबंध असणे आवश्यक आहे. असे की, पीडित व्यक्ती तिच्या विवाहाच्या दिवसापासून उत्तरवादींपासून वेगळी राहत होती. असे की, पीडित व्यक्ती आणि उत्तरवादी यांच्यात कौटुंबिक संबंध नसल्यामुळे डीव्ही कायद्यातील तरतुदींनुसार कोणताही दिलासा देता येत नाही.

iii) असे की, स्त्रीधनाच्या सर्व वस्तू, ज्या या संदर्भात सादर करण्यात आलेल्या बिलांनुसार रुरकीमध्ये खरेदी करण्यात आल्या होत्या, त्या झाबरेडा येथे उत्तरवादींना देण्यात आल्या होत्या ही बाब स्वीकारता येऊ शकत नव्हती.

प्रथम अपीलिय न्यायालयाच्या आणि उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयांना पीडित अपीलकर्तीने या न्यायालयात आव्हान दिले आहे.

**निवेदने :**

15. अपीलकर्ती-पीडित व्यक्तीच्या वतीने विद्वान न्यायमित्र श्री गौरव अग्रवाल आणि उत्तरवादीच्या वतीने विद्वान वकील श्री के. के. श्रीवास्तव यांचे म्हणणे आम्ही ऐकले आहे. आम्ही अभिलेखावरील सामग्रीचे अवलोकन केले आहे.

१६. विद्वान न्यायमित्र श्री गौरव अग्रवाल यांचे निवेदन खालीलप्रमाणे आहे.

(i) प्रारंभी त्यांनी असा युक्तिवाद केला की, पीडित व्यक्ती उत्तरवादींसोबत एका घरात राहत नव्हती आणि पक्षकारांत कोणतेही कौटुंबिक संबंध नव्हते या प्राथमिक कारणास्तव विशेष न्यायदंडाधिकारी-१, डेहराडून यांच्या न्यायालयाचा दिनांक १२ मे, २०११ रोजीचा न्यायनिर्णय रद्द बातल ठरवून उच्च न्यायालय आणि प्रथम अपीलीय न्यायालयाने चूक केली होती. आणि म्हणून डीव्ही कायद्यातील तरतुदींनुसार कोणताही दिलासा दिला जाऊ शकत नाही. वरील युक्तिवाद स्पष्ट करताना, अपीलकर्ती-पीडित व्यक्तीतर्फे न्यायमित्रांनी डीव्ही कायद्याच्या कलम २ (च) आणि २ (ध) चा संदर्भ देऊन असा युक्तिवाद केला की, डी.व्ही. कायद्यातील तरतुदी आकर्षित करण्यासाठी पीडित व्यक्ती ही, डीव्ही कायद्यांतर्गत परिभाषित केलेल्या 'कौटुंबिक नातेसंबंधात' असणे आवश्यक आहे. जर अशी व्यक्ती, ज्या व्यक्तींवर कौटुंबिक हिंसाचाराचे आरोप झाले आहेत, त्यांच्यासोबत सामाईक घरात राहत असेल किंवा कोणत्याही वेळेस त्यांच्यासोबत एकत्र राहिली असेल, तर डीव्ही कायद्यातील तरतुदी लागू होतील. असे की, प्रस्तुत प्रकरणात, दिनांक १५ जुलै २००५ रोजी पतीच्या मृत्यूनंतर पीडित महिला उल्हेडा येथील उत्तरवादींच्या कौटुंबिक घरी राहत होती व तेरा दिवस तेथे वास्तव्यास होती. असे की, पीडित व्यक्तीचे मानसिक शोषण करणाऱ्या प्रतिवादींच्या वर्तनामुळे असे वास्तव्य चालू राहू शकले नाही, ज्यामुळे तिला सामायिक घर सोडावे लागले. असे की, पीडित व्यक्तीने सामायिक कुटुंबात पुन्हा प्रवेश करण्याच्या केलेल्या प्रयत्नांना उत्तरवादींनी अडथळा आणला. पतीचा मृत्यू आणि पतीच्या मृत्यूनंतर तिला

सामायिक घरात प्रवेश आणि निवास नाकारला गेला, या बाबींमुळे तिच्या वैवाहिक जीवनाच्या अल्प कालावधीचा विचार करता, पक्षकार ज्या कालावधीत सामाईक घरात राहिली तो कालावधी विचारात घेतला जाऊ नये आणि त्याचा परिणाम डी. व्ही. अधिनियमांतर्गत संरक्षण नाकारण्यात होता कामा नये.

(ii) पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, पीडित व्यक्तीच्या पतीच्या मृत्यूमुळे कौटुंबिक नातेसंबंध संपुष्टात येणार नाहीत, असे की, अपीलकर्ती-पीडित व्यक्तीच्या विवाहामुळे तिचे उत्तरवादींशी नाते सुरू राहील. असे की, उत्तरवादींचे वर्तन हा पीडित व्यक्तीला उत्तरवादींशी कौटुंबिक संबंध ठेवण्यापासून असमर्थ करणारा एकमेव घटक होता. तरीही, ती डीव्ही कायद्यांतर्गत संरक्षणाचा दावा करण्यास पात्र असेल, डी. व्ही. कायद्याच्या कलम २ (ध) मध्ये तरतूद केलेल्या 'कौटुंबिक नातेसंबंध' या व्याख्येमध्ये केवळ सध्या सामायिक घरात एकत्र राहणाऱ्या दोन व्यक्तींमधील नातेसंबंधांचा समावेश नाही, तर सामायिक घरात कोणत्याही टप्प्यावर एकत्र राहणाऱ्या व्यक्तींचासुद्धा समावेश आहे. असे की, पतीच्या मृत्यूनंतरचा अल्प कालावधी, ज्या दरम्यान पीडित व्यक्तीने उत्तरवादींसोबत सामाईक घरात राहत होती, तो कालावधी पीडित व्यक्ती आणि उत्तरवादी 'कौटुंबिक नातेसंबंधात' होते या साठी पात्र ठरेल.

(iii) असे सादर करण्यात आले होते की, हिंसेच्या वेळी, ज्या व्यक्तींवर हिंसाचार केल्याचे आरोप आहेत, त्यावेळेस पीडित व्यक्तीने त्या व्यक्तींसोबत राहणे बंधनकारक नाही. या संदर्भात सतीश चंदर आहुजा वि. स्नेहा आहुजा - [(२०२१)

१ एससीसी ४१४] या प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयाचा संदर्भ देण्यात आला , ज्यात डी.व्ही. कायद्याच्या कलम २ (ध) मध्ये नमूद केलेल्या 'राहत असतील किंवा कोणत्याही वेळी एकत्र राहिले असतील' या शब्दप्रयोगाची अर्थउकल अशी केली आहे की, डीव्ही कायद्यांतर्गत अर्ज दाखल करताना पीडित व्यक्तीने उत्तरवादींसोबत एकत्र राहिलेले घर किंवा नजीकच्या भूतकाळात पीडित व्यक्तीला ज्यातून वगळण्यात आले होते असे घर. या निर्णयाच्या अनुषंगाने, अशी विनंती करण्यात आली होती की, ज्या वेळी कौटुंबिक हिंसाचाराची कथित कृत्ये केली तेव्हा उत्तरवादी पीडित व्यक्तीसोबत राहत असले पाहिजेत अशी आवश्यकता नाही कारण तशा प्रकारची कोणतीही वैधानिक आवश्यकता नाही. असे की, पीडित व्यक्ती कधीतरी कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केलेल्या व्यक्तींसोबत घरात एकत्र राहिली होती, या सावधानपत्राच्या अधीन राहून, मग अशा व्यक्तींनी, ज्या वेळेस पक्षकार घरात एकत्र राहत होते त्या काळात किंवा अशा कालावधीनंतरसुद्धा, कौटुंबिक हिंसाचाराचे केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे पीडित व्यक्तीला डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ अन्वये सक्षम न्यायालयात जाण्याचा अधिकार प्राप्त होईल.

(iv) अशी विनंती करण्यात आली होती की, डी. व्ही. कायद्यातील तरतुदींचा अशा प्रकारे अर्थ लावावा, जेणेकरून डी.व्ही.कायद्यांतर्गत महिलांना देण्यात येणारे संरक्षण त्यांना सर्वांत व्यापक प्रमाणात उपलब्ध होईल. असे की, पीडित व्यक्ती सामाईक घरात राहत असताना, तिच्यावर केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या

प्रकरणांपर्यंतच कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणांची व्याप्ती मर्यादित करण्यामुळे कायद्याचे उद्दिष्ट पुरेसे साध्य होणार नाही.

(v) विद्वान न्यायमित्र श्री. गौरव अग्रवाल यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, कौटुंबिक घटनेचा अहवाल संरक्षण अधिकाऱ्याने दंडाधिकाऱ्यांसमोर दाखल करणे बंधनकारक आहे आणि अशा अहवालाच्या आधारेच दंडाधिकारी कौटुंबिक हिंसाचाराची दखल घेऊ शकतात, असा निर्वाळा देऊन उच्च न्यायालयाने चूक केली होती. अपीलकर्ती-पीडित व्यक्तीच्या विद्वान न्यायमित्रांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत नियम, २००६ (संक्षिप्ततेसाठी 'डी. व्ही. नियम') च्या नियम ५ चा संदर्भ दिला, ज्यात अशी तरतूद आहे की, कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार प्राप्त झाल्यानंतर संरक्षण अधिकाऱ्याला कौटुंबिक घटनेचा अहवाल तयार करणे आणि तो दंडाधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे आणि अहवालाच्या प्रती, ज्या क्षेत्रात कथित कौटुंबिक हिंसचाराची कृत्ये घडली, त्या क्षेत्राचे अधिकारक्षेत्र असलेल्या पोलिस ठाण्याच्या प्रभारी पोलिस अधिकाऱ्याकडे पाठविणे आवश्यक आहे. या नियमाचा विचार करता, असा युक्तिवाद करण्यात आला की, जेव्हा पीडित व्यक्तीने संरक्षण अधिकाऱ्याकडे तक्रार केली असेल, त्याच प्रकरणांमध्ये कौटुंबिक घटना अहवाल तयार करण्याची आवश्यकता उद्भवते. असे की, डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ अन्वये सादर केलेल्या अर्जावर सुनावणी करणाऱ्या दंडाधिकाऱ्यांना कौटुंबिक

घटनेचा अहवाल मागविण्यासाठी कोणत्याही वैधानिक तरतुदीची आवश्यकता नाही. असे की, कलम १२ अन्वये कौटुंबिक घटनेचा अहवाल सादर न करताही अर्ज निकाली काढता येईल. असे की, कलम १२ ची एकच अट आहे, ती म्हणजे, एखाद्या संरक्षण अधिकाऱ्याकडे तक्रार केल्यास आणि अशा अधिकाऱ्याने अहवाल सादर केल्यास, दंडाधिकारी तो विचारात घेतील. असे की, ज्या प्रकरणांमध्ये संरक्षण अधिकाऱ्याने तक्रार केली नाही, अशा प्रकरणांमध्ये विशिष्टरीत्या कौटुंबिक घटना अहवाल मागविण्याचे आणि तो विचारात घेण्याचे कोणतेही कारण उद्भवत नाही.

(vi) या संदर्भात डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ चा संदर्भ देण्यात आला, ज्यामुळे पीडित व्यक्ती किंवा संरक्षण अधिकारी डीव्ही कायद्यांतर्गत दिलासा मिळण्यासाठी दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करू शकतात. ज्या प्रकरणांमध्ये पीडित व्यक्ती स्वतंत्रपणे दंडाधिकाऱ्यांसमोर अर्ज करते, अशा प्रकरणांमध्ये दंडाधिकाऱ्यांना कौटुंबिक घटना अहवालावर विचार करण्याची किंवा तो मागविण्याची आवश्यकता नाही, असे सांगण्यात आले. तथापि, ज्या प्रकरणांमध्ये संरक्षण अधिकाऱ्याने अर्ज केला असेल, तर त्यासोबत कौटुंबिक घटना अहवाल असणे अनिवार्य असेल आणि जेव्हा असा अहवाल सादर केला जातो, तेव्हा दंडाधिकाऱ्यांनी तो विचारात घेणे आवश्यक आहे.

(vii) कौटुंबिक घटना अहवाला अभावी, दंडाधिकारी डीव्ही कायद्याच्या कलम १८ ते २० आणि कलम २२ अन्वये कार्यवाही करू शकणार नाहीत किंवा दिलासा

देऊ शकणार नाहीत, असा वैधानिक हेतू असू शकत नाही, असे सांगण्यात आले. असे की, अशा विवेचनामुळे डी.व्ही. अधिनियमाचा हेतू पराजित होईल कारण ते अहवालाअभावी दंडाधिकाऱ्यांना आदेश पारित करण्यास प्रतिरोध करेल.

(viii) असा युक्तिवाद करण्यात आला की, डी.व्ही. अधिनियम लागू करण्याच्या उद्देशासंदर्भात उच्च न्यायालय आणि प्रथम अपीलीय न्यायालय या प्रकरणाकडे खऱ्या आणि योग्य दृष्टीने पाहण्यात अपयशी ठरले होते. वरील पार्श्वभूमीवर, अशी विनंती करण्यात आली की, उच्च न्यायालय व प्रथम अपीलीय न्यायालयाचे न्यायनिर्णय रद्द करून न्यायचौकशी न्यायालयाचा न्यायनिर्णय पूर्ववत करण्यात यावा.

१७. याउलट, उत्तरवादीच्या विद्वान वकिलांनी उच्च न्यायालय आणि प्रथम अपीलीय न्यायालयाच्या आक्षेपित न्यायनिर्णयांचे समर्थन केले आणि असा युक्तिवाद केला की वरील न्यायनिर्णय न्याय्य आहेत आणि म्हणूनच, खालीलप्रमाणे सादर करून त्यात या न्यायालयाच्या हस्तक्षेपाची आवश्यकता नाही :

(i) पीडित व्यक्ती ही उत्तरवादीसोबत कौटुंबिक नातेसंबंधात होती ही बाब नाकारण्यात आली. असे सादर करण्यात आले की, कुलदीप त्यागी यांच्याशी विवाह झाल्यानंतर पीडित व्यक्ती झाबरेडा येथे उत्तरवादींसोबत नव्हे, तर हरिद्वारच्या रुरकी जिल्ह्यात राहत होती. असे की, दंडाधिकाऱ्यांकडे डीव्ही कायद्यान्वये दाखल केलेल्या अर्जात, तसेच मृत पतीच्या मालमत्तेशी संबंधित

महसुली नोंदींमध्ये तिचे नाव बदलण्यासाठी महसूल प्राधिकाऱ्यांकडे सादर केलेल्या अर्जात तिचे निवासस्थान रुरकी म्हणून नोंदविण्यात आले होते. असे की, कुलदीप त्यागी यांच्या मृत्यूनंतरसुद्धा पीडित व्यक्ती उत्तरवादींसोबत राहत नव्हती. असे की, पीडित व्यक्ती शिक्षिका म्हणून काम करत होती आणि तिच्या पतीच्या मृत्यूनंतर ती नोकरीतून सुट्टी घेऊन तेरा दिवस झाबरेडा येथे वास्तव्यास होती, असे सिद्ध करणारा कोणताही पुरावा नव्हता.

असा युक्तिवाद करण्यात आला की, वरील वस्तुस्थिती लक्षात घेता, पक्षकारांमध्ये 'कौटुंबिक नातेसंबंध' अस्तित्वात होते, ज्याच्या आधारे डीव्ही कायद्यांतर्गत दिलासा मिळण्याचा दावा करता येऊ शकत होता, असे मानता येणार नाही. असे की, डी.व्ही. कायद्याच्या अगदी नावानुसार, डीव्ही कायद्यांतर्गत आरोप केलेला कोणताही हिंसाचार नेहमीच 'कौटुंबिक नातेसंबंधां' शी संबंधित असला पाहिजे आणि म्हणूनच, कौटुंबिक नातेसंबंधांचे अस्तित्व ही डीव्ही कायद्याच्या कलम १२ चा वापर करण्यासाठी आणि डी. व्ही. कायद्याच्या कलम १८ ते २० आणि कलम २२ अन्वये योजलेला दिलासा मंजूर करण्यासाठी पूर्वअट असेल.

(ii) असे सादर करण्यात आले की, दंडाधिकाऱ्यांसमोर केलेल्या अर्जात पीडित व्यक्तीने नमूद केलेली वस्तुस्थिती चुकीची असून त्यात घटनांची बनावट आवृत्ती नमूद करण्यात आली आहे.

(iii) त्यानंतर असा युक्तिवाद करण्यात आला की, पीडित व्यक्तीच्या कुटुंबाने स्त्रीधनाच्या वस्तूंचा ताबा उत्तरवादींना दिल्याचे सिद्ध करण्यात ती अपयशी ठरली आहे. असे की, खरेदी केलेल्या वस्तूंच्या पावत्यांवरून हे दिसून येईल की त्या वस्तू रुरकीमध्ये खरेदी केल्या गेल्या होत्या आणि म्हणूनच, त्या वस्तू उत्तरवादीना झाबरेडा येथील त्यांच्या निवासस्थानी देण्यात आल्या होत्या हे खरं तर अशक्य आहे. त्यामुळे स्त्रीधन पीडित व्यक्तीच्या सासरच्या लोकांच्या ताब्यात होते, असा कोणताही अंदाज बांधता येऊ शकत नव्हता, असा आग्रह धरण्यात आला.

(iv) पुढे अशी विनंती करण्यात आली की, कौटुंबिक घटना अहवालाच्या अभावी, दंडाधिकारी या प्रकरणाची दखल घेऊ शकले नसते. असे की, कलम १२ (१) नुसार, कार्यवाही सुरू करण्यासाठी, डी. व्ही. कायद्यांतर्गत सादर केलेला कौटुंबिक घटना अहवाल विचारात घेणे दंडाधिकाऱ्यांचे अनिवार्य कर्तव्य आहे आणि तो विचारात घेतल्यानंतरच, पीडित व्यक्तीला त्याचा लाभ देण्यासाठी डी. व्ही. अधिनियमाच्या कलम १८ ते २० आणि कलम २२ मधील मुख्य तरतुदी लागू करता येतील. या युक्तिवादाच्या समर्थनार्थ श्री. के. के. श्रीवास्तव यांनी कलम १२ (१) च्या परिभाषेचा संदर्भ देत असा युक्तिवाद केला की, , या परंतुकात वापरण्यात आलेले वाक्य 'कौटुंबिक घटना अहवाल विचारात घेईल' ज्यामुळे असे सूचित होते की दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल करण्यापूर्वी तक्रारदाराने संरक्षण अधिकाऱ्यासमोर तक्रार केली किंवा नाही याची पर्वा न करता, कौटुंबिक घटना अहवाल विचारात घेण्याची आवश्यकता अनिवार्य आहे. असे की,

कौटुंबिक घटनेच्या अहवाल विचारात न घेणे प्रकरणाच्या मुळाशी आघात करेल आणि अशा अनियमिततेमुळे दंडाधिकाऱ्यांचा निर्णय शून्यतेचा ठरेल.

(v) अखेरीस असा युक्तिवाद करण्यात आला की, डी. व्ही. अधिनियमांतर्गत केलेली कार्यवाही चुकीच्या हेतूने, चुकीच्या पद्धतीने करण्यात आली होती आणि उत्तरवादीना आणि विशेषतः उत्तरवादी क्र. १, जी पीडित व्यक्तीची ८० वर्षांपेक्षा अधिक वयाची सासू होती, त्यांना त्रास देण्याच्या एकमेव उद्देशाने सुरू करण्यात आली होती. असे की, उच्च न्यायालय आणि प्रथम अपीलिय न्यायालयाने दंडाधिकाऱ्यांचा निर्णय योग्यरीत्या रद्दबातल ठरवला आणि असा निर्णय दिला की, पीडित व्यक्तीला डी.व्ही. कायद्यांतर्गत कोणताही दिलासा देता येणार नाही. असे की, उच्च न्यायालय आणि प्रथम अपीलिय न्यायालयाचे न्यायनिर्णय प्रस्तुत प्रकरणातील तथ्यांना लागू असलेल्या कायद्याच्या खऱ्या आणि योग्य मूल्यमापनावर आधारित आहेत आणि त्यात या न्यायालयाद्वारे हस्तक्षेप केला जाऊ शकत नाही.

१८. संबंधित पक्षकारांच्या विद्वान वकिलांनी त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ या न्यायालयाच्या आणि विविध उच्च न्यायालयांच्या काही न्यायनिर्णयांवर भिस्त ठेवली आहे. त्याचा संदर्भ नंतर दिला जाईल.

**विचारार्थ मुद्दे :**

१९. संबंधित पक्षकारांच्या विद्वान न्यायमित्र / वकील यांचे म्हणणे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या आदेशाद्वारे उपस्थित करण्यात आलेले खालील मुद्दे विचारार्थ होते :

"(i) डी. व्ही. अधिनियमाच्या कलम १८ ते २० व २२ मधील मुख्य तरतुदी लागू करण्यासाठी सदर कायद्यांतर्गत कार्यवाही सुरू करण्यापूर्वी कौटुंबिक घटना अहवाल विचारात घेणे करणे बंधनकारक आहे का?

(ii) हिंसाचाराच्या वेळी, ज्यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत, त्या व्यक्तींसोबत पीडित व्यक्तीने राहणे बंधनकारक आहे का?

(iii) पीडित व्यक्ती आणि ज्याच्याविरोधात दिलासा मागण्यात आला आहे त्या व्यक्तीमध्ये कौटुंबिक नातेसंबंध असावेत का?"

**कायदेशीर चौकट :**

२०. सुलभ व तात्काळ संदर्भासाठी, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियमाच्या खालील तरतुदींमधील उतारा खालीलप्रमाणे आहे :

"**२. व्याख्या.** - या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(क) "पीडित व्यक्ती" याचा अर्थ, जिचा उत्तरवादीबरोबर कौटुंबिक नातेसंबंध असेल किंवा राहील असेल अशी आणि उत्तरवादीकडून

जिच्या बाबतीत कोणतीही कौटुंबिक हिंसाचाराची कृती करण्यात आली आहे असा आरोप करणारी कोणतीही महिला, असा आहे '

xxx

(ङ ) “कौटुंबिक घटना अहवाल" याचा अर्थ, पीडित व्यक्तीकडून कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार मिळाल्यानंतर विहित नमुन्यात तयार केलेला अहवाल, असा आहे;

(च) "कौटुंबिक नातेसंबंध" याचा अर्थ, जेव्हा दोन व्यक्ती रक्तसंबंधाने, विवाहाद्वारे किंवा विवाहसदृश नातेसंबंधाद्वारे, दत्तक संबंधाद्वारे सामाईक घरात एकत्र राहत असतील किंवा कोणत्याही वेळी एकत्र राहिले असतील, किंवा संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या कुटुंबाचे सदस्य असतील अशा दोन व्यक्तींमधील नातेसंबंध, असा आहे ;

xxx

(ध) "सामाईक घर" याचा अर्थ जेथे पीडित व्यक्ती, कौटुंबिक नातेसंबंधात एकटीच किंवा उत्तरवादीबरोबर राहत असेल किंवा कोणत्याही टप्प्यात राहिली असेल असे घर, असा आहे आणि त्यात पीडित व्यक्ती आणि उत्तरवादी यांची संयुक्तरीत्या मालकी किंवा भाडेदारी तत्वावर असलेले किंवा ज्याच्या संबंधात पीडित व्यक्तीचा किंवा उत्तरवादीचा किंवा त्या दोहोंचा संयुक्तपणे किंवा एकट्याने

कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध किंवा समान अधिकार असेल अशा त्या दोघांपैकी कोणाही एकाची मालकी किंवा भाडेदारी तत्वावर असलेल्या घराचा समावेश असेल आणि त्यामध्ये, उत्तरवादी ज्याचा सदस्य आहे अशा संयुक्त कुटुंबाच्या मालकीचे असेल अशा घराचा, त्या सामाईक घरामध्ये उत्तरवादीचा किंवा पीडित व्यक्तीचा कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा हितसंबंध असो अगर नसो, समावेश असेल."

"३. कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या. - या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, उत्तरवादीचे कोणतेही कृत्य, अकृती किंवा कृती किंवा आचरण ही, जर त्यामुळे -

(क) पीडित व्यक्तीचे आरोग्य, सुरक्षितता, जीवित, अवयव किंवा मानसिक वा शारीरिक स्वास्थ्य यांना हानी किंवा क्षती किंवा धोका पोहोचत असेल किंवा तसे करण्याकडे त्याचा कल असेल आणि त्यामध्ये शारीरिक दुर्व्यवहार, लैंगिक दुर्व्यवहार, शाब्दिक व भावनिक दुर्व्यवहार घडवून आणण्याचा समावेश होत असेल ; किंवा

(ख) कोणताही हुंडा किंवा इतर मालमत्ता किंवा किमती दस्तऐवज यांच्या कोणत्याही बेकायदेशीर मागणीची पूर्तता करण्यासाठी पीडित व्यक्तीवर किंवा तिच्याशी संबंधित इतर कोणत्याही व्यक्तीवर जबरदस्ती करण्याच्या दृष्टीने पीडित व्यक्तीचा छळ, हानी होत असेल, तिला क्षती किंवा धोका पोहचत असेल ; किंवा

(ग) ज्याचे पर्यवसान, खंड (क) किंवा खंड (ख) मध्ये उल्लेखित कोणत्याही आचरणाद्वारे पीडित व्यक्तीस किंवा तिच्याशी संबंधित कोणत्याही व्यक्तीस धमकावण्यामध्ये होत असेल; किंवा

(घ) पीडित व्यक्तीस अन्य प्रकारे शारीरिक किंवा मानसिक अशा कोणत्याही प्रकारची क्षती किंवा हानी पोहचत असेल ;

तर, ते आचरण कौटुंबिक हिंसाचार ठरेल.

**स्पष्टीकरण एक.** - या कलमाच्या प्रयोजनार्थ, -

(एक) “शारीरिक दुर्व्यवहार" याचा अर्थ, पीडित व्यक्तीस शारीरिक यातना, हानी पोहोचविण्यास, किंवा जीवित, अवयव किंवा आरोग्य यांना धोका पोहोचविण्यास किंवा आरोग्य किंवा विकास यांना हानी पोहोचविण्यास कारणीभूत ठरेल अशा स्वरूपाचे कोणतेही कृत्य किंवा आचरण, असा आहे आणि त्यामध्ये हमला, अपराधिक धाकदपटशा किंवा अपराधिक बळजबरी यांचा समावेश होतो ;

(दोन) “ लैंगिक दुर्व्यवहार" यामध्ये ज्यामुळे स्त्रीच्या प्रतिष्ठेचा अवमान होतो, अवहेलना होते किंवा कमीपणा येतो वा अन्य प्रकारे, तिचा मानभंग होतो असे लैंगिक स्वरूपाचे कोणतेही आचरण, याचा समावेश होतो ;

(तीन) “शाब्दिक आणि भावनिक दुर्व्यवहार" यामध्ये -

(क) अवमान, कुचेष्टा, अवहेलना, अपशब्द वापरणे आणि विशेषतः मूल होत नसल्याच्या किंवा मुलगा नसल्याच्या कारणावरून अपमान किंवा कुचेष्टा करणे ; आणि

(ख) पीडित व्यक्तीचे हितसंबंध असलेल्या व्यक्तीस, शारीरिक पीडा पोहचवण्याची वारंवार धमकी देणे,

यांचा समावेश होतो ;

(चार) “आर्थिक दुर्व्यवहार " यामध्ये -

(क) पीडित व्यक्ती, कोणत्याही कायदयान्वये किंवा रूढीनुसार ज्यास हक्कदार असेल अशा, मग ती न्यायालयाच्या आदेशानुसार किंवा अन्यथा देय असो किंवा कसे किंवा पीडित व्यक्तीस, गरजेपोटी तसेच पीडित व्यक्ती व असल्यास तिची मुले यांच्या घरगुती गरजांसाठी, परंतु त्या गरजांपुरतीच मर्यादित नव्हे तर, आवश्यक असेल अशी सर्व किंवा कोणतीही आर्थिक किंवा वित्तीय साधनसंपत्ती, स्त्रीधन, पीडित व्यक्तीची संयुक्तपणे किंवा स्वतंत्रपणे मालकी असणारी मालमत्ता, सामाईक घरांच्या संबंधातील भाड्याचे प्रदान आणि निर्वाह खर्च यांपासून वंचित करणे ;

(ख) घरसंसारातील चीजवस्तूंची विल्हेवाट, स्थावर किंवा जंगम मत्ता, मौल्यवान चीजवस्तू, शेअर्स, रोखे, बंधपत्रे व अन्य तत्सम बाबी किंवा पीडित व्यक्तीचा ज्यामध्ये हितसंबंध आहे किंवा कौटुंबिक

नातेसंबंधामुळे ज्याचा वापर करण्यास ती हक्कदार आहे किंवा पीडित व्यक्तीला किंवा तिच्या मुलांना ज्याची वाजवी गरज आहे अशी अन्य मालमत्ता किंवा तिचे स्त्रीधन किंवा पीडित व्यक्तीने संयुक्तपणे वा स्वतंत्रपणे धारण केलेली अन्य कोणतीही मालमत्ता यांचे कोणतेही अन्यसंक्रामण करणे ; आणि

(ग) पीड़ित व्यक्ती कौटुंबिक नातेसंबंधामुळे ज्याचा वापर करण्यास किंवा लाभ घेण्यास हक्कदार आहे अशी साधनसंपत्ती किंवा सुविधा, तसेच सामयिक घरातील प्रवेशाचा हक्क, कायम उपलब्ध असण्यास मनाई करणे किंवा निर्बंध घालणे,

यांचा समावेश होतो.

**स्पष्टीकरण दोन.** - उत्तरवादीचे कोणतेही कृत्य, अकृती, कृती किंवा आचरण हे या कलमान्वये "कौटुंबिक हिंसाचार" या सदरात मोडते किंवा कसे हे निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी, या बाबीतील एकूण वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेतली जाईल."

xxx

"**१२. दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करणे.** - (१) या अधिनियमान्वये एक किंवा अधिक अनुतोषांची मागणी करण्याकरिता पीडित व्यक्ती किंवा संरक्षण अधिकारी किंवा पीडित व्यक्तीच्या वतीने इतर कोणतीही व्यक्ती, यांना दंडाधिकाऱ्याकडे अर्ज सदर करता येईल ;

परंतु असे की, अशा अर्जावर कोणताही आदेश काढण्यापूर्वी, दंडाधिकारी, त्याला संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याकडून प्राप्त झालेल्या कोणत्याही कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनेचा अहवाल विचारात घेईल.

(२) पोट-कलम (१) खाली मागणी केलेल्या अनुतोषात, उत्तरवादीकडून केल्या गेलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या कृतीमुळे झालेल्या इजांच्या नुकसानभरपाईसाठी किंवा नुकसानीसाठी दावा दाखल करण्याच्या त्या व्यक्तीच्या हक्कास बाध न येऊ देता, नुकसानभरपाईच्या किंवा नुकसानीच्या प्रदानाचा आदेश देण्याबाबतच्या अनुतोषाचा समावेश होऊ शकेल :

परंतु असे की, पीडित व्यक्तीच्या बाजूने कोणत्याही न्यायालयाद्वारे, नुकसानभरपाई किंवा नुकसानी म्हणून, कोणत्याही रकमेसाठी हुकूमनामा काढला असल्यास, या अधिनियमान्वये दंडाधिकाऱ्याने केलेल्या आदेशाला अनुसरून दिलेली किंवा देय असलेली अशी कोणतीही रक्कम असल्यास ती, अशा हुकूमनाम्यानुसार देय असलेल्या रकमेतून वजा केली जाईल आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ यांमध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, तो हुकूमनामा, अशा

वजावटीनंतर कोणतीही रक्कम शिल्लक असल्यास त्यासाठी अंमलबजावणीयोग्य असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेला प्रत्येक अर्ज हा, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल आणि त्यामध्ये असे तपशील समाविष्ट केलेले असतील किंवा तो त्याच्याशी शक्य तितके साधर्म्य असणारा असेल.

(४) दंडाधिकारी, न्यायालयाला अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून सर्वसाधारणपणे तीन दिवसांच्या पलीकडचा नसेल असा दिनांक, सुनावणीचा पहिलं दिनांक म्हणून निश्चित करील.

(५) पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेला प्रत्येक अर्ज, त्याच्या पहिल्या सुनावणीच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत निकाली काढण्यासाठी, दंडाधिकारी, प्रयत्नांची शिकस्त करील.

xxx

“**१७. सामाईक घरात राहण्याचा हक्क. -** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक महिलेला सामाईक घरात राहण्याचा हक्क असेल - मग त्यामध्ये तिचा कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा लाभकारी हितसंबंध असो वा नसो.

(२) उत्तरवादीकडून, कोणत्याही पीडित व्यक्तीला, कायद्याने घालून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार असेल त्याव्यतिरिक्त, सामाईक घरामधून किंवा त्याच्या कोणत्याही भागामधून बेदखल केले जाणार नही किंवा काढून टाकले जाणार नाही.

xxx

"**२३. अंतरिम व एकतर्फी आदेश देण्याचा अधिकार. -** (१) दंडाधिकारी, या अधिनियमाखालील, त्याच्यापुढील कोणत्याही कार्यवाहीमध्ये त्याला न्याय्य व योग्य वाटेल असा अंतरिम आदेश देऊ शकेल.

(२) उत्तरवादी कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य करीत आहे किंवा त्याने ते केले आहे किंवा उत्तरवादीकडून कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य घडणे संभाव्य आहे असे अर्जावरून सकृतदर्शनी स्पष्ट होत असल्याबाबत दंडाधिकाऱ्याची खात्री झाली असेल तर, त्याला पीडित व्यक्तीने, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात केलेल्या शपथपत्राच्या आधारावर, कलम १८, कलम १९, कलम २० कलम २१ किंवा यथास्थिती, कलम २२ अन्वये उत्तरवादीविरुद्ध एकतर्फी आदेश देता येईल."

२१. पुढील कार्यवाही करण्यापूर्वी, या न्यायालयाच्या खालील संबंधित न्यायनिर्णयांचा संदर्भ देणे उपयुक्त ठरेल, ज्यात या न्यायालयाने डी. व्ही. कायद्यातील विविध तरतुदींची अर्थउकल केली आहे :

अ) **जुवेरिया अब्दुल माजिद पटनी वि. आतिफ इक्बाल मन्सूरी आणि अन्य एक - [(२०१४) १० एससीसी ७३६]** या प्रकरणात डी. व्ही. कायद्याच्या कलम २ (क ) अन्वये पीडित व्यक्तीच्या व्याख्येची अर्थउकल करताना या न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, कौटुंबिक नातेसंबंधात असलेल्या महिलेव्यतिरिक्त,कौटुंबिक नातेसंबंध ठेवलेल्या कोणत्याही महिलेच्या बाबतीत उत्तरवादीकडून कौटुंबिक हिंसाचाराची कृती करण्यात आली आहे असा आरोप करणाऱ्या महिलेचा पीडित व्यक्तीच्या अर्थात समावेश होतो. शिवाय, डी. व्ही. कायद्याच्या कलम २ (च) मध्ये असे म्हटले आहे की, पीडित व्यक्ती (यातील विधवा), जी कोणत्याही वेळी पतीसोबत सामायिक घरात एकत्र राहिली असेल, ती कौटुंबिक नातेसंबंधांच्या अर्थाच्या कक्षेत येते. तसेच, डीव्ही कायद्याच्या कलम २ (ध) नुसार पीडित व्यक्ती एखाद्या घरात उत्तरवादीसोबत कोणत्याही टप्प्यावर कौटुंबिक नातेसंबंधात राहिली असेल तर, ती सामायिक घरात हक्काचा दावा करू शकते.

डी.व्ही. कायद्यातील संबंधित तरतुदींचे विश्लेषण केल्यानंतर या न्यायालयाने **व्ही.डी. भानोत वि. सविता भानोत [(२०१२) ३ एससीसी १८३]** चा संदर्भ देत असा निर्णय दिला की, डी. व्ही. कायदा लागू होण्यापूर्वीच कलम १८,

१९ आणि २० अन्वये आदेश पारित करताना पक्षकारांचे वर्तन विचारात घेतले जाऊ शकते. ज्या पत्नीने पूर्वी घर सामायिक केले होते परंतु नंतर ती पतीसोबत राहत नव्हती, ती कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडल्यास कलम १२ अन्वये याचिका दाखल करू शकते. पुढे असे निरीक्षण नोंदविण्यात आले की, जेव्हा कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केले जाते, तेव्हा घटस्फोटाच्या नंतरच्या हुकूमनाम्यामुळे, त्याने केलेल्या गुन्ह्याच्या किंवा पीडित व्यक्तीला ज्या लाभाचा हक्क आहे तो नाकारण्याच्या दायित्वामधून त्याची मुक्तता होणार नाही.

ब) **कृष्णा भट्टाचार्य वि. सारथी चौधरी आणि अन्य एक - [(२०१६) २ एससीसी ७०५]** या प्रकरणात या न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, न्यायालयीन विभक्तीकरणाच्या हुकूमनाम्यानंतर दोन वर्षांनी स्त्रीधनाच्या पुनर्प्राप्तीचा दावा ग्राह्य आहे. न्यायालयाने असा निर्णय दिला की, न्यायालयीन विभक्तीकरणामुळे डी. व्ही. कायद्याच्या कलम २(क) सह कलम १२ अन्वये पत्नीचा दर्जा पीडित व्यक्ती म्हणून बदलत नाही आणि डीव्ही कायद्याच्या कलम २ (च ) अंतर्गत कौटुंबिक नातेसंबंध संपुष्टात येत नाहीत. पुढे असा निर्णय देण्यात आला की, न्यायालयीन विभक्त होणे म्हणजे केवळ पती-पत्नीच्या नात्याचे विभक्तीकरण आहे आणि घटस्फोटाप्रमाणे नाते पूर्णपणे तुटणे नाही. शिवाय डीव्ही कायद्याच्या कलम १२ अन्वये पत्नीने दाखल केलेल्या अर्जास मुदतमर्यादा नाही.

सदर प्रकरणात या न्यायालयाने **सरस्वती विरुद्ध बाबू - [(२०१४) ३ एससीसी ७१२]** या प्रकरणाचा उल्लेख केला.

पुढे दीपक मिश्रा न्या. (जे तत्कालीन न्यायमूर्ती होते) यांनी दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाच्या वतीने बोलताना असा निर्णय दिला की, डी. व्ही. कायद्याच्या कलम २ (च) अन्वये कौटुंबिक नातेसंबंधांची व्याख्या खूप व्यापक आहे आणि सदर तरतुदीनुसार पत्नी न्यायालयीनदृष्ट्या विभक्त झाली तरी तिला या तरतुदीनुसार संरक्षण दिले जाईल आणि असे निरीक्षण नोंदविले की :

> “१८. न्यायालयीन विलगीकरणाच्या हुकूमनाम्यामुळे अपीलकर्ती 'पीडित व्यक्ती' राहिली नाही का हा मुख्य मुद्दा लक्षात घेणे आवश्यक आहे. एकदा घटस्फोटाचा हुकूमनामा संमत झाला की पक्षकारांचा दर्जा वेगळा होतो, पण जेव्हा न्यायालयीन विभक्तीकरणाचा हुकूमनामा असतो तेव्हा तसे होत नाही. जीत सिंग आणि इतर वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (१९९३) १ एससीसी ३२५ या प्रकरणातील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने, जरी वेगळ्या संदर्भात असले तरी, न्यायिक विभक्तीकरणाच्या संकल्पनेकडे लक्ष वेधले आणि असा निर्णय दिला की, न्यायालयीन विभक्तीकरणामुळे हक्क आणि जबाबदाऱ्या निर्माण होतात. न्यायालयीन विभक्तीकरणाचा हुकूमनामा किंवा आदेश पक्षकारांना वेगळे राहण्याची परवानगी देतो. एका पक्षकाराला दुसऱ्या पक्षकाराच्या सहवासात राहण्याचे बंधन

राहणार नाही. विवाहामुळे निर्माण होणारे परस्पर हक्क आणि जबाबदाऱ्या स्थगित केल्या जातात. परंतु, या हुकूमनाम्यामुळे विवाह तुटत नाही किंवा विच्छेदित होत नाही. त्यातून सामंजस्याची आणि समायोजनाची संधी मिळते. ठराविक कालावधीनंतर न्यायालयीन विभक्त होणे हा घटस्फोटाचा आधार ठरू शकतो, परंतु अशा उपायची आवश्यकता नसते आणि पक्षकारांना त्या उपायाचा आधार घेणे बंधनकारक नसते आणि पक्षकार आयुष्यभर पत्नी आणि पती म्हणून आपला दर्जा टिकवून राहू शकतात."

**रश्मी कुमार वि. महेश कुमार भादा - [(१९९७) २ एससीसी ३९७]** या प्रकरणाचा संदर्भ देताना, या न्यायालयाने असा निर्णय दिला की, पत्नीने स्त्रीधन मालमत्ता किंवा मालमत्तेवरील सत्ता (मालकी) तिच्या पतीला किंवा कुटुंबातील इतर कोणत्याही सदस्याला सोपवली होती या बाबीच्या पुराव्याआधारे, स्त्रीधन मालमत्ता ही पत्नीची फक्त एकटीची मालमत्ता आहे. ही मालमत्ता पतीला किंवा कुटुंबातील इतर सदस्याला देण्यात आली होती हे सिद्ध करण्यासाठी पुढे कोणताही विशेष करार प्रस्थापित करण्याची आवश्यकता नाही.

मुदत मर्यादेचा आणि/किंवा 'निरंतर गुन्हा'/ 'कृतीचे निरंतर कारण' या मुद्द्याचा विचार करताना या न्यायालयाने असा निर्णय दिला की :

"३२. कायद्याच्या वरील विधानाचा विचार करता, पती किंवा कुटुंबातील इतर कोणत्याही सदस्याने स्त्रीधन राखणे हा सततचा गुन्हा

आहे की नाही हे आम्हांला पाहावे लागेल. स्त्री धनाच्या प्राप्तीसाठी पत्नी दावा दाखल करू शकते यात वाद असू शकत नाही पण त्यामुळे विश्वासघाताची फौजदारी तक्रार दाखल करण्यास तिला मनाई होत नाही.......... स्त्रीधनापासून वंचित ठेवण्याच्या तारखेपासून 'सतत गुन्हा' ही संकल्पना लागू होते, कारण स्त्रीधनावर पती किंवा कुटुंबातील इतर कोणत्याही सदस्याचा अधिकार असू शकत नाही आणि ते रक्षक राहतात. सन २००५ च्या अधिनियमासाठी, ती सन २००५ च्या अधिनियमांतर्गत संरक्षण अधिकाऱ्याकडे एक किंवा त्यापेक्षा अधिक दिलाशांसाठी अर्ज सादर करू शकते."

क) **अजय कुमार विरुद्ध लता ऊर्फ शरुती आणि इतर - [(२०१९) १५ एससीसी ३५२]** या प्रकरणातील या न्यायालयाच्या विवेचनाचाही आपण उल्लेख करू शकतो, ज्यात त्यातील उत्तरवादीच्या पतीचा मृत्यू झाला होता आणि मृत पतीच्या भावाकडून पोटगीचा दावा करण्यात आला होता. न्यायालयाने असा निर्णय दिला की, सकृतदर्शनी उत्तरवादी आणि तिचा मृत पती एकाच घरात राहत असल्याने आणि त्यातील अपीलकर्ता (मृत व्यक्तीचा भाऊ) देखील त्याच घरात राहत असल्याने पोटगी देण्याचे प्रकरण सिद्ध झाले होते.

ड) पुढे **सतीश चंदर आहुजा विरुद्ध स्नेहा आहुजा - [(२०२१) १ एससीसी ४१४]** या प्रकरणात या न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने, ज्यात आमच्यापैकी एक (शहा, न्या.) सदस्य होते, त्यात डीव्ही कायद्याच्या कलम २ (ध ) मध्ये नमूद

केलेल्या 'राहत असेल किंवा कोणत्याही टप्प्यावर राहिली असेल' हे शब्द विचारात घेतले. **एस.आर. बत्रा विरुद्ध तरुणा बत्रा – [(२००७) ३ एससीसी १६९]** या प्रकरणात नमूद केलेल्या कायद्याची अचूकता विचारात घेताना, या न्यायालयाने असा निष्कर्ष काढला की सदर प्रकरणात डी. व्ही. कायद्याच्या कलम २ (ध) ची योग्य अर्थउकल करण्यात आली नव्हती आणि सदर न्यायनिर्णयात योग्य कायदा आखून देण्यात आला नव्हता आणि खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविण्यात आले :

> "६६. ...... कलम २ (ध) मध्ये 'जेथे पीडित व्यक्ती राहते' या शब्दांनंतर 'कोणत्याही टप्प्यावर राहिले आहेत' हा शब्दप्रयोग आढळतो. या न्यायालयाने परिच्छेद २६ मध्ये जी भीती व्यक्त केली आहे त्यापेक्षा वेगळ्या उद्दिष्टासाठी, 'पीडित व्यक्ती राहते' या शब्दांनंतर लगेचच 'कोणत्याही टप्प्यावर राहिले आहेत' हा शब्दप्रयोग वापरण्यात आला आहे. ज्या दिनांकास अर्ज दाखल करण्यात आला, तेव्हा तिला घरात राहण्यापासून वंचित करण्यात आले किंवा ती तात्पुरती अनुपस्थित होती या कारणास्तव सामाईक घरात राहण्याचा हक्क नाकारण्यापासून महिलांचे संरक्षण व्हावे यासाठी 'कोणत्याही टप्प्यावर राहिले आहेत' हा शब्दप्रयोग वापरण्यात आला आहे. 'कोणत्याही टप्प्यावर राहिले आहेत' हा शब्दप्रयोग वरील उद्देशाने वापरण्यात आला आहे आणि जिथे पीडित व्यक्ती पतीच्या

नातेवाइकांसोबत राहिली असेल, अशी सर्व घरे सामायिक घरे होतील, जो कायदेशीर हेतू नाही, त्या उद्देशाने वापरण्यात आलेला नाही. जे घर सध्या पीडित व्यक्तीचे निवासस्थान आहे, ते सामाईक घर मानले जाते.

........

६७. .......... या कायद्याची संपूर्ण योजना पीडित व्यक्तीला त्या सामायिक घराच्या संदर्भात तात्काळ दिलासा देण्यासाठी आहे, जिथे पीडित व्यक्ती राहते किंवा राहिली आहे. वर निरीक्षण नोंदविल्यानुसार, अर्जाच्या तारखेस किंवा संबंधित दंडाधिकारी कलम १९ अन्वये आदेश देण्याच्या तारखेला, पीडित व्यक्ती राहत नाही या कारणास्तव केवळ पीडित व्यक्तीला संरक्षण नाकारण्याच्या हेतूने 'कोणत्याही टप्प्यावर राहिली आहे' या शब्दप्रयोगाचा वापर केलेला नव्हता. अशा प्रकारे, एस. आर. बत्रा विरुद्ध तरुण बत्रा (उपरोल्लेखित) या खटल्यातील परिच्छेद २६ मध्ये या न्यायालयाने व्यक्त केलेली भीती खरी नव्हती आणि असा अर्थ मान्य केल्यास गोंधळ निर्माण होईल हे खरे आहे आणि वैधानिक हेतू असा कधीच नव्हता. अशा प्रकारे, विचारपूर्वक आमचे मत असे आहे की, कलम २ (ध) मध्ये नमूद केलेले सामायिक घर हे पीडित व्यक्तीचे सामायिक घर आहे जेथे ती अर्ज दाखल करताना राहत होती किंवा नजीकच्या भूतकाळात तिला घराच्या वापरातून वगळण्यात आले होते किंवा ती तात्पुरती अनुपस्थित आहे.

६८. 'कौटुंबिक नातेसंबंधात राहत असेल किंवा कोणत्याही टप्प्यात राहिली असेल' या शब्दांचा सामान्य आणि हेतूपूर्ण अर्थ घ्यावा लागेल. घरातील स्त्रीचे राहणे म्हणजे काही शाश्वतता असणारे राहणे असावे लागते. निरनिराळ्या ठिकाणी केवळ क्षणिक किंवा नैमित्तिक राहण्याने सामायिक घर होणार नाही. जागेला सामाईक घर मानण्याचा पक्षकारांचा हेतू होता की नाही हे शोधण्यासाठी पक्षकारांचा हेतू आणि घराच्या स्वरूपासह राहण्याचे स्वरूप समजणे आवश्यक आहे. वर म्हटल्याप्रमाणे सन २००५ चा कायदा स्त्रीच्या बाजूने जास्त अधिकार देण्यासाठी करण्यात आला होता. कुटुंबात होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलेच्या हक्कांचे अधिक प्रभावी संरक्षण व्हावे यासाठी हा सन २००५ चा कायदा करण्यात आला आहे. या कायद्याचा हेतू आणि उद्देश प्रभावी होईल अशा प्रकारे या कायद्याचा अर्थ लावावा लागेल.अधिनियम, २००५ च्या कलम २ (ध) सह कलम १७ आणि १९, सामायिक घरात राहण्याच्या हक्काच्या बाजूने महिलेला हक्क प्रदान करते, मग तिचे त्यात कोणतेही कायदेशीर हितसंबंध असो वा नसो.

६९. ...... पतीच्या मालकीचे असलेले किंवा भाड्याने घेतलेले घर म्हणजे सामाईक घर अशी कलम २ (ध) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सामाईक घराची व्याख्या नाही. या कायद्यांतर्गत 'उत्तरवादी' ची व्याख्या

आमच्या लक्षात आली आहे. कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत कार्यवाहीमध्ये उत्तरवादी हा पतीचा कोणताही नातेवाईक असू शकतो. जर सामायिक घर हे  कौटुंबिक नातेसंबंधात स्त्री राहत असलेल्या पतीच्या कोणत्याही नातेवाइकाचे असेल, तर कलम २ (ध)  मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता होते आणि संबंधित घर सामायिक घर बनेल.”

**विश्लेषण :**

२२. . डीव्ही कायद्याच्या कलम १२ मध्ये असे म्हटले आहे की, पीडित व्यक्ती किंवा संरक्षण अधिकारी किंवा पीडित व्यक्तीच्या वतीने इतर कोणतीही व्यक्ती दंडाधिकाऱ्याकडे डीव्ही कायद्यांतर्गत एक किंवा अधिक दिलाशांसाठी अर्ज सादर करू शकते. मात्र, अशा अर्जावर कोणताही आदेश देण्यापूर्वी  संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याकडून प्राप्त झालेला घरगुती घटनेचा अहवाल दंडाधिकारी विचारात घेतील, असे या तरतुदीत नमूद केले  आहे.  कलम २ (क) अन्वये परिभाषित केलेल्या 'पीडित व्यक्ती' या शब्दाचा अर्थ जिचा उत्तरवादीबरोबर कौटुंबिक नातेसंबंध असेल किंवा राहिला असेल अशी आणि उत्तरवादीकडून जिच्या बाबतीत कोणतीही कौटुंबिक हिंसाचाराची कृती करण्यात आली आहे असा आरोप करणारी कोणतीही महिला, असा आहे.  कलम २ (च) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे कौटुंबिक नातेसंबंध म्हणजे  जेव्हा दोन व्यक्ती रक्तसंबंधाने, विवाहाद्वारे किंवा विवाहसदृश नातेसंबंधाद्वारे, दत्तक संबंधाद्वारे

सामाईक घरात एकत्र राहत असतील किंवा कोणत्याही वेळी एकत्र राहिले असतील, किंवा संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या कुटुंबाचे सदस्य असतील अशा दोन व्यक्तींमधील नातेसंबंध, असा आहे. कौटुंबिक हिंसाचाराला कलम ३ मध्ये दिलेला अर्थ तोच आहे.

२३. कौटुंबिक नातेसंबंधाच्या संदर्भात कलम २ (ध) च्या व्याख्येनुसार 'सामाईक घर' या शब्दप्रयोगाचा अर्थ असा आहे की, जेथे पीडित व्यक्ती, कौटुंबिक नातेसंबंधात एकटीच किंवा उत्तरवादीबरोबर राहत असेल किंवा कोणत्याही टप्प्यात राहिली असेल असे घर, असा आहे आणि त्यात पीडित व्यक्ती आणि उत्तरवादी यांची संयुक्तरीत्या मालकी किंवा भाडेदारी तत्वावर असलेले किंवा ज्याच्या संबंधात पीडित व्यक्तीचा किंवा उत्तरवादीचा किंवा त्या दोहोंचा संयुक्तपणे किंवा एकट्याने कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध किंवा समान अधिकार असेल अशा त्या दोघांपैकी कोणाही एकाची मालकी किंवा भाडेदारी तत्वावर असलेल्या घराचा समावेश असेल आणि त्यामध्ये, उत्तरवादी ज्याचा सदस्य आहे अशा संयुक्त कुटुंबाच्या मालकीचे असेल अशा घराचा, त्या सामाईक घरामध्ये उत्तरवादीचा किंवा पीडित व्यक्तीचा कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा हितसंबंध असो अगर नसो, समावेश असेल. सामायिक घराची व्याख्या अशा प्रकारे सर्वसमावेशक आहे.

२४. कलम १७ सामाईक घरात राहण्याच्या हक्काबाबत आहे, तर कलम १९ मध्ये, सामाईक घरात कौटुंबिक हिंसाचार झाला आहे, याची खात्री झाल्यानंतर

कलम १२ च्या पोट-कलम (१) अन्वये केलेलला अर्ज निकाली काढताना दंडाधिकाऱ्यांद्वारे पारित केल्या जाऊ शकणाऱ्या निवासाबाबतच्या आदेशांचा उल्लेख आहे. अशा प्रकारे, कलम १९ निवासाबाबतच्या आदेशांशी संबंधित आहे, तर सामायिक घरात राहण्याचा हक्क डी. व्ही. कायद्याच्या कलम १७ मध्ये हाताळला गेला आहे. कलम १७ चे पोट- कलम (१), जो काहीही अंतर्भूत असले तरीही या वाक्खंडाने सुरू होतो, त्यामध्ये असे म्हटले आहे की, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक महिलेला सामाईक घरात राहण्याचा हक्क असेल मग त्यामध्ये तिचा कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा लाभकारी हितसंबंध असो वा नसो. पोट-कलम (२) मध्ये असे नमूद केले आहे की, उत्तरवादीकडून कोणत्याही पीडित व्यक्तीला, कायद्याने घालून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार असेल त्याव्यतिरिक्त, सामाईक घरामधून किंवा त्याच्या कोणत्याही भागामधून बेदखल केले जाणार नाही किंवा काढून टाकले जाणार नाही.

२५. कलम १९ अनेक निर्देश किंवा आदेशांशी संबंधित आहे, जे सामाईक घराच्या तुलनेत उत्तरवादीविरुद्ध पीडित व्यक्तीच्या बाजूने पारित केले जाऊ शकतात. कलम १७ घरगुती नातेसंबंधात असलेल्या प्रत्येक महिलेला सामायिक घरात राहण्याचा हक्क प्रदान करते, मग तिचा त्यात कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा लाभकारी हितसंबंध असो वा नसो. कौटुंबिक नातेसंबंधात प्रत्येक स्त्रीला सामायिक घरात राहण्याचा देण्यात आलेला अधिकार हा एक महत्त्वाचा आणि

अर्थपूर्ण अधिकार आहे. कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक स्त्रीला सामायिक घरात राहण्याच्या अधिकाराची ही पुष्टी आहे. कलम १७ च्या पोट- कलम (२) नुसार पीडित व्यक्तीला कायद्याने घालून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार असेल त्याव्यतिरिक्त, उत्तरवादीकडून सामायिक घरातून किंवा त्यातील कोणत्याही भागातून बेदखल करण्यापासून किंवा काढून टाकण्यापासून संरक्षण दिले आहे. कलम १७ चे पोट- कलम (१) आणि पोट- कलम (२) यांच्यामधील फरक सुद्धा लक्षात घ्यावा लागेल. पोट- कलम (२) हे कौटुंबिक हिंसाचाराच्या संदर्भात डीव्ही कायद्याच्या कलम २ (अ) मध्ये परिभाषित केलेल्या पीडित व्यक्तीशी संबंधित आहे, तर कलम १७ चे पोट- कलम (१) हा कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक महिलेला दिलेला हक्क आहे, मग ती पीडित व्यक्ती असो वा नसो. दुसऱ्या शब्दांत, कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक महिलेला उत्तरवादीकडून कौटुंबिक हिंसाचाराचे कोणतेही कृत्य केले नसतानाही सामायिक घरात राहण्याचा अधिकार आहे.

२६. कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक स्त्रीच्या सामायिक घरात राहण्याच्या हक्काचे मोल आणि महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे. आधीच नमूद केल्याप्रमाणे, 'सामायिक घर' या शब्दाची डीव्ही कायद्याच्या कलम २ (ध) मध्ये विस्तृत व्याख्या करण्यात आली आहे, परंतु कलम १७ मध्ये समाविष्ट असलेल्या 'कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक महिलेला सामायिक घरात राहण्याचा हक्क असेल, मग तिचा त्यात कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा लाभकारी हितसंबंध असो वा नसो', या अभिव्यक्ती विस्तृत अर्थ लावणे आवश्यक आहे. या संदर्भात,

**हरभजन सिंग विरुद्ध प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया - (एआयआर २००२ एससी १३५१)** या प्रकरणाचा आधार घेता  येईल, ज्यामध्ये क्रॉस ऑन "वैधानिक अर्थउकल" (तिसरी आवृत्ती, १९९५)  यावर खालीलप्रमाणे आधार घेतला गेला आहे :

> “अशा प्रकारे, 'सर्वसाधारण अर्थ' किंवा 'व्याकरणदृष्ट्या अर्थ' याचा अर्थ असा नाही की, न्यायाधीश एखाद्या कायद्यातील  शब्दांना त्यांच्या संदर्भापासून किंवा कायद्याच्या उद्देशापासून स्वतंत्रपणे अर्थ देतात, परंतु त्याऐवजी  ताबडतोब स्पष्ट आणि असंशोधन केलेल्या संदर्भ आणि उद्देश, ज्यात आणि ज्यासाठी ते वापरले जातात, त्यासंदर्भात योग्य असा अर्थ ते स्वीकारतात."

२७. डी.व्ही. कायद्याचा हेतू  आणि उद्देश कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रीचे संरक्षण करणे हा असला तरी, कलम १७ च्या पोट- कलम (१) चा मूळ उद्देश कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक स्त्रीला सामायिक घरात राहण्याचा अधिकार प्रदान करणे हा आहे. त्यामुळे सदर  तरतुदीची सुरुवात काहीही अंतर्भूत असले तरी या वाक्खंडाने  होते.

२८. सदर हक्काचे अधिक चांगल्या प्रकारे आकलन होण्यासाठी, भारतातील सामाजिक आणि कौटुंबिक संदर्भाशी त्याचा संबंध जोडणेही उपयुक्त ठरेल.

२९. आधीच नमूद केल्याप्रमाणे, कौटुंबिक  नातेसंबंध म्हणजे दोन

व्यक्तींमधील नातेसंबंध, जे सामाईक घरात एकत्र राहत असतील किंवा कोणत्याही वेळी एकत्र राहिले असतील. हे नातेसंबंध (१) रक्तसंबंधाने (२) विवाहाद्वारे किंवा (३) विवाहसदृश नातेसंबंधादवारे , (४) दत्तक संबंधाद्वारे किंवा (५) संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या कुटुंबाचे सदस्य असतील. 'कौटुंबिक नातेसंबंध' हा शब्द सर्वसमावेशक आहे. त्यामुळे वर म्हटल्याप्रमाणे कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक स्त्रीला सामायिक घरात राहण्याचा अधिकार आहे, मग तिचा त्यात काही हक्क, मालकी हक्क किंवा लाभकारी हितसंबंध असो वा नसो. अशा प्रकारे मुलगी, बहीण, पत्नी, आई, आजी-आजोबा किंवा आजोबा, सून, सासू किंवा कोणतीही स्त्रीला विवाहाच्या स्वरूपात, दत्तक मुलगी किंवा संयुक्त कुटुंबातील नातेसंबंधातील कोणत्याही सदस्याला सामायिक घरात राहण्याचा अधिकार आहे.

३०. परंतु, जेथे पीडित व्यक्ती एकट्याने किंवा उत्तरवादीसह कौटुंबिक नातेसंबंधात राहते किंवा राहिली असेल, अशा घराच्या संदर्भात जरी 'सामायिक घर' या शब्दाची व्याख्या केली जाते, तरी, कलम १७ च्या पोट- कलम (१) च्या संदर्भात, ही अभिव्यक्ती केवळ अशा घरापुरती मर्यादित असू शकत नाही जिथे पीडित व्यक्ती घरगुती नातेसंबंधात राहते किंवा कोणत्याही टप्प्यावर राहिली होती. दुसऱ्या शब्दांत, कौटुंबिक नातेसंबंधातील एखादी स्त्री, जी पीडित नाही, म्हणजे जिच्या बाबतीत उत्तरवादीने कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केले नाही, तिला सामायिक घरात राहण्याचा हक्क आहे. त्यामुळे कौटुंबिक नातेसंबंधातील आई,

मुलगी, बहीण, पत्नी, सासू-सून किंवा अशा प्रकारच्या इतर प्रवर्गातील स्त्रियांना, जरी त्यांचा कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा लाभकारी हितसंबंध नसला तरी, त्यांना सामायिक घरात राहण्याचा अधिकार आहे.

त्यामुळे वरील प्रवर्गातील महिलांना आणि अशा इतर प्रवर्गातील महिलांना कलम १७ च्या पोट-कलम (१) अन्वये राहण्याच्या हक्काची हमी देण्यात आली आहे आणि कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार नसतानाही तिला अशा घरातून बेदखल केले जाऊ शकत नाही, वगळले जाऊ शकत नाही किंवा काढून टाकले जाऊ शकत नाही. याउलट कलम १७ च्या उपकलम (२) मध्ये, अनिवार्यपणे स्त्री असलेली आणि जिला कौटुंबिक हिंसाचाराला छळाला सामोरे जावे लागते, त्या पीडित व्यक्तीइतकाच संकुचित अधिकार आहे,आणि तिला कायद्याद्वारे प्रस्थापित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीव्यतिरिक्त, उत्तरवादीकडून सामाईक घरातून किंवा त्यातील कोणत्याही भागातून बेदखल केले जाणार नाही किंवा काढून टाकले जाणार नाही. त्यामुळे 'सामायिक घरात राहण्याचा अधिकार' या शब्दाचा विस्तृत अर्थ लावावा लागेल, ज्यात सुनेची सासू आणि सामायिक घरात राहण्याचा अधिकार असलेल्या वर नमूद केलेल्या स्त्रियांच्या इतर श्रेणींचा समावेश आहे.

३१. शिवाय 'सामायिक घरात राहण्याचा अधिकार' हा शब्दप्रयोग प्रत्यक्ष वास्तव्यापुरता मर्यादित ठेवता येणार नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, सामायिक घरात प्रत्यक्ष वास्तव्य नसतानाही, घरगुती नातेसंबंधातील स्त्री त्यामध्ये

राहण्याचा अधिकार लागू करू शकते. . वरील अर्थउकल उदाहरणाद्वारे समजावून सांगता येते. जर एखाद्या महिलेने लग्न केले तर तिला तिच्या पतीच्या घरात राहण्याचा अधिकार प्राप्त होतो, जे नंतर डीव्ही कायद्याच्या अर्थानुसार सामायिक घर बनते. भारतात धंदेवाईक, व्यावसायिक किंवा नोकरीच्या बांधिलकीमुळे किंवा इतर खऱ्या कारणांमुळे पती-पत्नीने वेगवेगळ्या ठिकाणी राहण्याचा निर्णय घेतल्याव्यतिरिक्त, विवाहानंतर स्त्रीने पतीसोबत राहणे हा सामाजिक नियम आहे. घरगुती नातेसंबंधातील स्त्री वाजवी कारणास्तव जरी इतरत्र राहत असेल, तरी तिला सामायिक घरात राहण्याचा अधिकार आहे. तसेच कौटुंबिक नातेसंबंधात राहत असलेल्या किंवा राहिल्या असलेल्या स्त्रीला केवळ दुसऱ्या ठिकाणी स्थित असलेल्या आणि सामाईक घरसुद्धा असलेल्या. तिच्या पतीच्या घरातच राहण्याचा अधिकार नव्हे, तर अन्य ठिकाणी असलेल्या आणि तिच्या पतीचे कुटुंबीय राहत असलेल्या सामाईक घरात राहण्याचा सुद्धा अधिकार आहे.

३२. कौटुंबिक नातेसंबंधात असलेल्या स्त्रीला सामायिक घरात राहण्याचा अधिकार लागू करायचा असेल, तर ती त्यात अजिबात राहिली असो वा नसो, डीव्ही कायद्याच्या कलम १७ च्या पोट- कलम (1) अन्वये हा अधिकार लागू केला जाऊ शकतो. जर सामायिक घरात राहण्याच्या तिच्या अधिकारास उत्तरवादीने विरोध केला किंवा प्रतिबंधित केले तर, ती एक पीडित व्यक्ती बनते आणि जर ती आधीपासूनच सामायिक घरात राहत असेल किंवा ती प्रत्यक्षात त्यात राहत नसेल तर तिला त्यातून किंवा त्यातील कोणत्याही भागातून काढून टाकले जाऊ शकत

नाही. दुसऱ्या शब्दांत, 'सामायिक घरात राहण्याचा अधिकार' हा शब्द केवळ प्रत्यक्ष निवासस्थानापुरता मर्यादित नाही, कारण, वास्तविक वास्तव्याची पर्वा न करता, घरगुती नातेसंबंधातील स्त्री सामायिक घरात राहण्याचा अधिकार लागू करू शकते. त्यामुळे सामायिक घरात प्रत्यक्ष वास्तव्य केले नसले तरी तिला त्या घरातून काढून टाकले जाऊ शकत नाही, म्हणूनच कलम १७ च्या पोट-कलम (२) मध्ये 'सामायिक घरातून बेदखल केले जाणार नाही किंवा काढून टाकले जाणार नाही' हा शब्दप्रयोग जाणीवपूर्वक वापरण्यात आला आहे. याचा अर्थ असा की घरगुती नातेसंबंधातील स्त्री पीडित व्यक्ती असेल आणि ती खरोखरच सामायिक घरात राहत असेल, तर कायद्याने प्रस्थापित केलेल्या कार्यपद्धतीशिवाय तिला बेदखल केले जाऊ शकत नाही. त्याचप्रमाणे कौटुंबिक नातेसंबंधातील स्त्री जी पीडित व्यक्ती आहे, तिला कायद्याने प्रस्थापित केलेल्या कार्यपद्धतीशिवाय सामायिक घरात राहण्याच्या अधिकारापासून काढून टाकले जाता येऊ शकत नाही. त्यामुळे 'सामायिक घरात राहण्याचा अधिकार' या शब्दात केवळ प्रत्यक्ष वास्तव्यच नव्हे, तर सामायिक घरातील रचनात्मक वास्तव्य, म्हणजेच त्यामध्ये राहण्याचा अधिकार समाविष्ट असेल, ज्यातून कायद्याने प्रस्थापित केलेल्या कार्यपद्धतीशिवाय पीडित बेदखल करता येऊ शकत नाही. जर एखाद्या महिलेला सामायिक घरातून बेदखल करण्याचा किंवा काढण्याचा प्रयत्न केला, गेला तर ती पीडित व्यक्ती ठरेल आणि त्या परिस्थितीत कलम १७ चे पोट-कलम (२) लागू होईल.

३३. या विवेचनाच्या समर्थनार्थ आणखी एक उदाहरण लक्षात घेता येईल. लग्नानंतर एखादी महिला आपल्या पतीसोबत व्यावसायिक किंवा नोकरीच्या बांधिलकीमुळे परदेशात जाऊ शकते. अशा महिलेला तिच्या लग्नानंतर सामायिक घरात राहण्याची संधी मिळाली नसेल. जर कोणत्याही कारणास्तव अशी स्त्री पीडित व्यक्ती बनली आणि तिला परदेशातून परत येण्यास भाग पाडले गेले, तर तिच्या पतीला (उत्तरवादी) किंवा पीडित व्यक्तीला (पत्नी) सामायिक घरात काही हक्क, मालकी हक्क किंवा लाभकारी हितसंबंध असो वा नसो, तिला तिच्या पतीच्या सामायिक घरात राहण्याचा अधिकार आहे. अशा परिस्थितीत्, परदेशातून परतलेल्या आणि पीडित व्यक्ती असलेल्या महिलेचे सासू-सासरे कायद्याने प्रस्थापित केलेल्या कार्यपद्धतीशिवाय तिला सामायिक घरातून किंवा त्यातील कोणत्याही भागातून काढून टाकू शकत नाहीत.

दुसरी परिस्थिती अशी आहे की, लग्नानंतर लगेचच, पत्नी प्रत्यक्षात सामायिक घरात राहत होती, तर पती परदेशात गेला होता. जेव्हा अशा महिलेवर कौटुंबिक हिंसाचार होतो, तेव्हा कायद्याने प्रस्थापित केलेल्या कार्यपद्धतीशिवाय तिला सामायिक घरातून बेदखल केले जाऊ शकत नाही.

३४. अशी ही प्रकरणे असू शकतात जिथे लग्नानंतर लगेचच पती नोकरीच्या बांधिलकीमुळे दुसऱ्या शहरात जातो आणि त्याची पत्नी तिच्या आई-वडिलांच्या घरी राहते आणि तरीही कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडते. तिला तिच्या आई-वडिलांच्या घरात राहण्याचा अधिकार आहे कारण ती विवाहाद्वारे कौटुंबिक

नातेसंबंधात असेल. तसेच ज्या प्रकरणांमध्ये एखादी महिला लग्नानंतर लगेचच तिच्या आई-वडिलांच्या घरी राहते आणि कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडते आणि म्हणून ती पीडित व्यक्ती असते, तेव्हा तिला सुद्धा तिच्या पतीच्या, जे तिच्या सासरच्या कुटुंबाचे घर असू शकते, त्या सामायिक घरात राहण्याचासुद्धा अधिकार आहे. शिवाय, जर तिचा नवरा दुसऱ्या ठिकाणी राहत असेल तर पीडित व्यक्तीला तिच्या पतीसोबत तो राहत असलेल्या ठिकाणी, जे नंतर सामायिक घर बनेल किंवा यथास्थिती त्याच्या पालकांसमवेत राहण्याचा अधिकार आहे. कौटुंबिक नातेसंबंधात असलेल्या स्त्रीला, सामाईक घरात हक्क, मालकी हक्क किंवा लाभकारी हित संबंध असो वा नसो, त्यात घरात राहण्याच्या हक्काची अंमलबजावणी करण्यासाठी अशा अनेक स्थिती आणि परिस्थितींची मोठ्या संख्येने विविधता असू शकते. तसेच, कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक स्त्री पीडित व्यक्ती असो वा नसो, असा अधिकार लागू करू शकते.

३५. भारतीय सामाजिक परिप्रेक्ष्यात स्त्रीच्या सामायिक घरात राहण्याच्या अधिकाराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याची कारणे फार दूर नाहीत. भारतात बहुसंख्य स्त्रिया सुशिक्षित नाहीत आणि कमावतही नाहीत; किंवा त्या एकट्याने जगण्यासाठी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबीही नाहीत. ती केवळ भावनिक आधारासाठीच नव्हे तर वरील कारणांमुळे कौटुंबिक नातेसंबंधात राहण्यासाठी अवलंबून असू शकते. हे नाते रक्तसंबंधाने, विवाहाद्वारे किंवा विवाहसदृश नातेसंबंधाद्वारे, दत्तक संबंधाद्वारे किंवा संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या

कुटुंबाचा भाग म्हणून असू शकेल. भारतातील बहुसंख्य स्त्रियांकडे स्वतंत्र उत्पन्न किंवा आर्थिक क्षमता नसते आणि त्या वास्तव्यासाठी पूर्णपणे त्यांच्या पुरुष किंवा इतर स्त्री संबंधांवर अवलंबून असतात ज्यांचे तिच्याशी कौटुंबिक संबंध असू शकतात.

३६. आमच्या मते, डीव्ही कायदा हा नागरी संहितेचा एक अंश आहे जो भारतातील प्रत्येक महिलेला तिच्या धार्मिक संलग्नता आणि / किंवा सामाजिक पार्श्वभूमीचा विचार न करता, संविधानाने दिलेल्या तिच्या अधिकारांचे अधिक प्रभावी संरक्षण करण्यासाठी आणि कौटुंबिक नातेसंबंधात होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांचे संरक्षण करण्यासाठी लागू आहे. त्यामुळे हिंदु कायद्यात समजल्याप्रमाणे 'संयुक्त कुटुंब' या शब्दाचा अर्थ होऊ शकत नाही. त्यामुळे 'कुटुंबातील सदस्य संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहतात' या शब्दप्रयोगाचा अर्थ कुटुंब म्हणून एकत्र राहणारे सदस्य असा होतो. अशा अर्थाने, पालक म्हणून काळजी घेतलेल्या मुली/ मुले यांनाही सामायिक घरात राहण्याचा अधिकार आहे आणि त्यांना डीव्ही कायद्याच्या कलम १७ च्या पोट- कलम (१ ) अन्वये हा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. जेव्हा अशी मुलगी किंवा महिला पीडित व्यक्ती बनते, तेव्हा कलम १७ च्या पोट-कलम (२) चे संरक्षण लागू होते.

३७. 'कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक महिलेला सामायिक घरात राहण्याचा अधिकार असेल' या अभिव्यक्तीचा विस्तृत अर्थ लावण्यासाठी काही उदाहरणे नमुन्यादाखल वर दिली आहेत. तथापि, ही उदाहरणे परिपूर्ण नाहीत

आणि अनेक स्थिती आणि परिस्थिती असू शकतात आणि कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक स्त्री सामायिक घरात राहण्याच्या अधिकाराची अंमलबजावणी करू शकते, मग तिचा त्यात कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा लाभकारी हितसंबंध असो व नसो आणि डी. व्ही. कायद्याच्या कलम १९ अन्वये पारित केल्या जाऊ शकणाऱ्या आदेशांव्यतिरिक्त स्वतंत्र अधिकार म्हणून सदर तरतुदीनुसार कोणत्याही महिलेला हा अधिकार लागू केला जाऊ शकतो ; तसेच सामायिक घरात राहण्याचा अधिकार असलेल्या पीडित महिलेलासुद्धा डी. व्ही . कायद्याच्या कलम १७ च्या पोट- कलम (२) द्वारे संरक्षण दिले जाते.

३८. **श्रीमती भारती नाईक विरुद्ध श्री रवी रामनाथ हळर्णकर आणि अन्य - [२०१० एससीसी ऑनलाइन बॉम २४३]** या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा येथील न्यायालयाने असा निर्णय दिला होता की, डी.व्ही.कायद्यातील 'पीडित व्यक्ती' आणि 'उत्तरवादी' या व्याख्येत असणारे 'आहे' आणि 'राहीली आहे' हे शब्द सरळ आणि स्पष्ट आहेत. न्यायालयाने असा निर्णय दिला की, सदर शब्दांत पूर्वीच्या नात्याचासुद्धा समावेश आहे. संबंधित पक्षकारांमधील मागील नातेसंबंध किंवा अनुभव दर्शविण्यासाठी हे शब्द हेतूपूर्वक वापरण्यात आले आहेत. पुढे असे निरीक्षण नोंदविण्यात आले की, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलेचे संरक्षण करण्यासाठी सदर डी. व्ही. कायदा करण्यात आला आहे आणि अर्जाच्या तारखेस कौटुंबिक नातेसंबंध सुरू असल्याशिवाय डी. व्ही. अधिनियमाच्या तरतुदी लागू करता येऊ शकत नाहीत असा तरतुदींचा अर्थ लावून

कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध करता येणार नाही.

३९. मद्रास उच्च न्यायालयाने **वंधाना विरुद्ध टी. श्रीकांत आणि कृष्णमाचारी - [२००७ एससीसी ऑनलाइन मद्रास ५५३]** या प्रकरणात रामासुब्रमण्यम, न्या. यांनी लिहिलेल्या एका निकालात असे म्हटले होते की डीव्ही कायद्याच्या कलम २ (च), २ (ध) आणि १७ ला शक्य तितके व्यापक स्पष्टीकरण दयायला हवे. सर्वोच्च न्यायालयाने विविध घटना आणि परिस्थितींचे निरीक्षण केल्यानंतर असा निर्णय दिला की, अनेक स्त्रिया लग्नानंतर लगेचच सासरच्या घरात प्रवेश करू शकत नाहीत. त्यामुळे डी.व्ही.कायद्याच्या कलम २ (च) व २ (ध) चा निकोप व योग्य अर्थ असा असेल की 'राहत असतील ' किंवा 'कोणत्याही वेळी राहिले असतील' या शब्दांच्या कक्षेत वर अर्थउकल केल्याप्रमाणे 'राहण्याच्या हक्काचा ' समावेश असेल. वरील निकालातून खालीलप्रमाणे उद्धृत करणे उपयुक्त ठरेल:-

> “**२०.** आपल्यासारख्या समाजात अशा अनेक परिस्थिती आहेत, ज्यात लग्नानंतर लगेचच स्त्री आपल्या सासरच्या घरात प्रवेश करू शकत नाही. लग्नानंतर लगेचच मधुचंद्रासाठी निघालेलं जोडपं आणि मधुचंद्रानदरम्यानही ज्यांचे नातेसंबंध ताणले जातात आणि परिणामी पत्नी थेट आपल्या आई-वडिलांच्या घरी परत येते, ते कायद्याच्या कलम २ (च ) अंतर्गत कौटुंबिक नातेसंबंधांच्या व्याख्येच्या कसोटीवर, जर त्याचा काटेकोरपणे अर्थ लावला गेला तर, खरे उतरू शकत नाही.

अशा परिस्थितीत एखादी स्त्री कायदेशीररित्या वैध विवाहानंतर परिपूर्णता असूनसुद्धा 'सामायिक घरात' एकट्याने किंवा पतीसोबत राहत नसेल किंवा कोणत्याही वेळी राहिली नसेल. आपल्या समाजात काही पारंपारिक समजुतींमुळे आधारे लग्न झालेल्या स्त्रीला लग्न परिपूर्ण होण्यापूर्वीच तिच्या आई-वडिलांच्या घरी पाठवणे असामान्य नाही, उदाहरणार्थ, आदि महिन्याचा हस्तक्षेप. अशी स्त्री सामाईक घरात एकत्र राहिली नव्हती किंवा कोणत्याही वेळी राहिली नव्हती अशी अधिनियमाच्या कलम २(च) ची कठोर अर्थउकल केल्यामुळे, जर अशी स्त्री अधिनियमाच्या कलम १७ अन्वये लाभ मिळण्यास पात्र नसल्याचे मानले, तर अशा महिलांचा वैध विवाह असूनही त्यांना कोणताही उपाय राहणार नाही. याच प्रकारच्या असंख्य उदाहरणांचा विचार करता येईल, जेथे कार्यवाही सुरू करण्याच्या वेळेस महिला सामायिक घरात राहत नसेल किंवा एक दिवससुद्धा पतीसोबत एकत्र राहिली नसेल. या कायद्याच्या कलम २ (च), २ (ध ) आणि १७ चा संकुचित अर्थ लावल्यास, कोणत्याही उपायाविना अनेक महिला संकटात सापडतील. त्यामुळे माझ्या विचारपूर्वक मतानुसार कलम २ (च) आणि २ (ध) चा निकोप आणि योग्य अर्थ असा होईल की 'राहत असतील' किंवा 'कोणत्याही वेळी राहिले असतील' या शब्दांच्या कक्षेत 'राहण्याचा हक्क' समाविष्ट असेल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर,

कार्यवाही सुरू करण्याच्या वेळेस  किंवा भूतकाळातील बाब म्हणून, एखाद्या स्त्रीने सामायिक घरात शारीरिकरीत्या राहण्याची आपली  कृती प्रस्थापित करणे आवश्यक नाही. कायदेशीर मान्यता असलेले नातेसंबंध  असेल, तर त्या नातेसंबंधातील महिलेला सामायिक घरात राहण्याचा अधिकार मिळतो. त्यामुळे जरी कार्यवाही सुरू असताना ती सामायिक घरात राहत नसली किंवा पूर्वी कोणत्याही वेळी सामायिक कुटुंबात कधीही राहिली नसली तरी, ती कायद्याच्या कलम १७ अन्वये संरक्षणास पात्र असेल. या कायद्याच्या कलम १७ अन्वये तिचा संरक्षणाचा अधिकार हा  सामायिक घरात  राहण्याच्या तिच्या हक्कासह अस्तित्वात आहे आणि तिने सामायिक घरात आपली शारीरिक उपस्थिती दर्शविली आहे की नाही यावर अवलंबून नाही. वैध  आणि संबंधित दिनांकास अस्तित्वात असलेल्या  टिकलेल्या विवाहामुळे आपोआप पत्नीला कुटुंब चालविण्याच्या संयुक्त उपक्रमात समान भागीदार म्हणून सामायिक घरात राहण्याचा अधिकार प्राप्त होतो. जर तिच्याकडे सामायिक घरात  राहण्याचा अधिकार असेल, तर  वैध आणि  अस्तित्वात असलेल्या  विवाहामुळे, ती कायद्याच्या कलम २ (च) च्या अर्थांतर्गत निश्चितच 'कौटुंबिक नातेसंबंधात' असते  आणि सामायिक घरातील तिच्या शारीरिक उपस्थिती किंवा अनुपस्थितीमुळे कौटुंबिक नात्याव्यतीरिक्त तिच्या नात्याचे महत्व  इतर कोणत्याही

गोष्टीप्रमाणे कमी होऊ शकत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार/ वादी दिनांक ७.२.२००७ नंतर प्रथम उत्तरवादी/ प्रथम प्रतिवादीच्या घरात कधी रहात होती की नाही, याची पर्वा न करता, दिनांक ७.२.२००७ रोजी प्रथम उत्तरवादी/ प्रथम प्रतिवादीशी झालेल्या विवाहाने तिला सामायिक घरात राहण्याचा अधिकार बहाल केला आहे. त्यामुळे दिनांक ०७.०२.२००७ ते १३.०६.२००७ या कालावधीत कोणत्याही वेळी अर्जदार/ वादी कधीतरी सामायिक घरात राहत होती की नाही, या प्रश्नाला फारसे महत्त्व नाही."

४०. वरील चर्चा लक्षात घेऊन, '*ज्यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत त्यांच्यासोबत पीडित व्यक्तीने राहणे बंधनकारक आहे का?*' या प्रश्न क्रमांक २ ला त्यानुसार उत्तर दिले जाते. असा निर्णय देण्यात आला आहे की, दिलासा मागताना ज्यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत, त्या व्यक्तींसोबत पीडित व्यक्तीने प्रत्यक्ष राहणे किंवा वास्तव्य करणे बंधनकारक नाही. जर एखाद्या महिलेला सामायिक घरात राहण्याचा अधिकार असेल तर, ती त्यानुसार डीव्ही कायद्याच्या कलम १७ (१) अन्वये तिच्या अधिकाराची अंमलबजावणी करू शकते. जर एखादी स्त्री पीडित व्यक्ती किंवा कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेली व्यक्ती बनली तर डी. व्ही. कायद्याच्या कलम १७ सह कलम १९ अंतर्गत सामायिक घरात राहण्याच्या किंवा वास्तव्य करण्याच्या हक्कासह ती डी. व्ही. कायद्याच्या तरतुदींनुसार दिलासा मागू शकते.

४१. म्हणून, येथे अपीलकर्तीला सामायिक घरात, म्हणजेच तिच्या सासरच्या घरात, राहण्याचा अधिकार होता आणि कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेली महिला डी. व्ही. कायद्यातील तरतुदींनुसार सामायिक घरात राहण्याचा किंवा वास्तव्याचा तिचा अधिकार लागू करू शकते आणि डी. व्ही. कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या इतर कोणत्याही योग्य दिलाशाची मागणी करू शकते, मग ती प्रत्यक्षात सामायिक घरात राहत असो वा नसो.

४२. यावरून '*पीडित व्यक्ती आणि ज्याच्याविरोधात दिलाशाची मागणी करण्यात आली आहे, त्या व्यक्तीमध्ये कौटुंबिक नातेसंबंध अस्तित्वात असावेत का*', या विचारार्थ उपस्थित करण्यात आलेल्या पुढील प्रश्नाकडे आपण जातो. आधीच नमूद केल्याप्रमाणे, 'कौटुंबिक नातेसंबंध' हा एक विस्तृत शब्दप्रयोग आहे आणि याचा अर्थ (i) रक्तसंबंधाने, (i) विवाहाद्वारे ; (iii ) किंवा विवाहसदृश नातेसंबंधाद्वारे ; (iv) दत्तक संबंधाद्वारे ; (v) संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या कुटुंबाचे सदस्य म्हणून सामाईक घरात एकत्र राहत असतील किंवा कोणत्याही वेळी एकत्र राहिले असतील अशा दोन व्यक्तींमधील नातेसंबंध असा आहे. 'रक्तसंबंध', 'विवाह' आणि 'दत्तक' या शब्दांचा विस्तार करण्याची आवश्यकता नाही कारण सर्वसाधारण कायद्यात तसेच पक्षकारांना लागू असलेल्या संबंधित वैयक्तिक कायद्यात त्या चांगल्या प्रकारे समजलेल्या संकल्पना आहेत. तथापि, हे लक्षात घेणे समर्पक आहे की 'विवाह' या अभिव्यक्तीमध्ये विवाहसदृश नात्याचाही समावेश होतो. दुसरं म्हणजे 'दत्तक' या

शब्दात संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या कुटुंबातील सदस्यांचाही विचार केला जातो. वरील बाबींचा तपशील देणे आवश्यक आहे.

विवाहसदृश नातेसंबंध विचारात घेतलेल्या या न्यायालयाच्या खालील न्यायनिर्णयांचा संदर्भ देणे उपयुक्त ठरेल :

1. (अ) **डी. वेलू सामी विरुद्ध डी. पचाईअम्मल - [(२०१०) १० एससीसी ४६९),** या प्रकरणात या न्यायालयाने डी. व्ही. कायद्याच्या संदर्भात "विवाहसदृश नातेसंबंध" या संकल्पनेवर चर्चा केली आणि असा निर्णय देण्यात आला की, ती सर्वसाधारण कायद्याच्या विवाहा प्रमाणे आहे. असा निर्णय देण्यात आला की, डी. व्ही. कायद्याच्या कलम २ (ध) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे पक्षकार 'सामायिक घरात' एकत्र राहिले पाहिजेत. असे मत व्यक्त करण्यात आले की, डी. व्ही. अधिनियमाचा लाभ घेण्यासाठी सर्व लिव्ह इन रिलेशनशीप हे विवाहसदृश नातेसंबंध ठरणार नाहीत, तर केवळ सर्वसाधारण कायदेशीर विवाह म्हणून पात्र असलेले नातेसंबंध हे विवाहसदृश नातेसंबंध ठरतील. एखादया नातेसंबंधाला सर्वसाधारण कायदेशीर विवाह म्हणून मान्यता मिळण्यासाठी कायद्याने विहित केलेल्या अटी खालीलप्रमाणे ठरविण्यात आल्या:

(i) जोडप्याने स्वत:ला पती-पत्नीसारखे म्हणून समाजासमोर मानले पाहिजे ;

(ii) लग्न करण्यासाठी त्यांचे कायदेशीर वय असणे आवश्यक आहे;

(३) अन्यथा ते कायदेशीर विवाह करण्यास पात्र असणे आवश्यक आहे;

(४) त्यांनी स्वेच्छेने सहवास केला असावा आणि स्वतःला बराच काळ पती-पत्नीसारखे म्हणून जगासमोर ठेवले पाहिजे.

(ब) **इंद्रा शर्मा विरुद्ध व्ही.के.व्ही.सरमा - [(२०१३) १५ एससीसी ७५५]** या प्रकरणात अशा नातेसंबंधात गुंतलेल्या स्त्रीला टिकवून ठेवण्यात अपयशी ठरल्याने लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये आलेला व्यत्यय हा डी. व्ही. कायद्याच्या कलम ३ च्या अर्थानुसार "कौटुंबिक हिंसाचार" आहे का, हा प्रश्न विचारात घेण्यात आला. असा निर्णय देण्यात आला की, हिंदू विवाह कायद्यानुसार किंवा विशेष विवाह कायद्यानुसार किंवा पक्षकारांना लागू असलेल्या इतर कोणत्याही वैयक्तिक कायद्याअंतर्गत विवाह करणे म्हणजे सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या नात्यात प्रवेश करणे होय, कारण विवाह ही सामाजिक संस्था असल्याने त्या नात्यातून अनेक हक्क आणि दायित्वे उद्भवतात. त्यामुळे विवाह ही संकल्पना नागरी हक्कांना जन्म देते. या न्यायालयाने खालील मार्गदर्शक तत्त्वांचा संदर्भ दिला, जे व्यक्तींमधील नातेसंबंध विवाहसदृश होते की नाही हे ठरवेल आणि अखेरीस असा निर्णय दिला की, विवाहसदृश नातेसंबंध असलेल्या जोडप्याला अंतर्भूत करण्यासाठी डी. व्ही. कायदा लागू करण्यात आला होता, जेणेकरून परिच्छेद ५६ नुसार विवाहसदृश नातेसंबंधातील स्त्रियांच्या संरक्षणासाठी दिवाणी कायद्यात उपाय उपलब्ध होईल, ज्यातील उतारा खालीलप्रमाणे आहे :

“५६. वरील चर्चेच्या आधारे लिव्ह इन रिलेशनशिप कोणत्या परिस्थितीत डी.व्ही.कायद्याच्या कलम २ (च) अन्वये "विवाहसदृश नातेसंबंध" या अभिव्यक्तीत येईल हे तपासण्यासाठी आम्ही काही मार्गदर्शक तत्त्वे ठरवू शकतो. मार्गदर्शक तत्त्वे अर्थातच परिपूर्ण नाहीत, परंतु अशा नातेसंबंधांबद्दल काही अंतर्दृष्टी नक्कीच देतील :

**५६.१ नातेसंबंधाचा कालावधी.** - डी. व्ही. कायद्याच्या कलम २ (च ) मध्ये "कोणत्याही वेळी" हा शब्द वापरला गेला आहे, ज्याचा अर्थ असा आहे की नातेसंबंध टिकवून ठेवण्यासाठी आणि सुरू ठेवण्यासाठी वाजवी कालावधी, जो वस्तुस्थितीनुसार प्रकरणपरत्वे बदलू शकतो.

**५६.२ सामाईक घर** - डी.व्ही. कायद्याच्या कलम २ (ध) अन्वये या अभिव्यक्तीची व्याख्या करण्यात आली आहे आणि म्हणूनच अधिक विस्ताराची आवश्यकता नाही.

**५६.३ साधनसंपत्तीचे एकत्रीकरण आणि आर्थिक व्यवस्था:-** एकमेकांना किंवा त्यांच्यापैकी कुणालाही आर्थिकदृष्ट्या आधार देणे, बँक खाती वाटून घेणे, संयुक्त नावे किंवा महिलेच्या नावे स्थावर मालमत्ता मिळविणे, व्यवसायात दीर्घकालीन गुंतवणूक, स्वतंत्र व संयुक्त नावाने शेअर्स, जेणेकरून दीर्घकालीन संबंध राहतील, हा मार्गदर्शक घटक असू शकतो.

**५६.४ कौटुंबिक व्यवस्था -** घर चालवण्याची जबाबदारी विशेषत: महिलेवर सोपविणे, घरातील साफसफाई, स्वयंपाक करणे, घराची देखभाल किंवा संगोपन करणे इत्यादी कामे करणे हे विवाहसदृश नातेसंबंधाचे द्योतक आहे.

**५६.५ लैंगिक नातेसंबंध** - विवाहसदृश नातेसंबंध म्हणजे केवळ आनंदासाठी नव्हेच, तर भावनिक आणि जिव्हाळ्याच्या नात्यासाठी, मुलांच्या उत्पत्तीसाठी लैंगिक संबंध, जेणेकरून भावनिक आधार, सहवास आणि भौतिक आपुलकी, काळजी इत्यादी देता येईल.

**५६.६ मुले.**- मुले होणे हे विवाहाच्या स्वरूपातील नात्याचा भक्कम संकेत आहे. त्यामुळे दीर्घकालीन संबंध ठेवण्याचा पक्षकारांचा मानस आहे. त्यांच्या संगोपनाची आणि त्यांना आधार देण्याची जबाबदारी वाटून घेणे हा देखील एक भक्कम संकेत आहे.

**५६.७ सार्वजनिक ठिकाणी समाजीकरण.** - लोकांशी संपर्क साधणे आणि मित्र, नातेवाईक व इतरांमध्ये जणू पती-पत्नी असल्यासारखे समाजात वावरणे, हे विवाहसदृश नातेसंबंध टिकवून ठेवण्याची भक्कम परिस्थिती आहे.

**५६.८ पक्षकारांचा हेतू व वर्तन**. - पक्षकारांचे नातेसंबंध कसे असावे व त्यात सहभागी व्हावे, तसेच आपापल्या भूमिका व जबाबदाऱ्या

याविषयी पक्षकारांचा सामाईक हेतू प्रामुख्याने त्या नात्याचे स्वरूप ठरवतो.

४३. शिवाय 'कुटुंबातील सदस्य संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहतात' हा शब्दप्रयोग केवळ रक्तसंबंध, विवाहाशी किंवा दत्तक घेण्याशी संबंधित नाही. वर म्हटल्याप्रमाणे 'संयुक्त कुटुंब' या शब्दाचा अर्थ हिंदू कायद्यात समजल्याप्रमाणे संयुक्त कुटुंब असा होत नाही. याचा अर्थ कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या व्यक्ती असतील. यात केवळ रक्तसंबंधादवारे, विवाहाद्वारे किंवा दत्तक संबंधाद्वारे एकत्र राहणाऱ्या कुटुंबातील सदस्यांचाच समावेश नाही, तर ज्या व्यक्ती एकत्र किंवा संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहत आहेत जसे की, दत्तक मुले जी इतर सदस्यांसोबत राहतात जे रक्तसंबंधादवारे, विवाहाद्वारे किंवा दत्तक संबंधाद्वारे नात्यात आहेत. त्यामुळे जेव्हा कोणतीही स्त्री वर चर्चा केल्याप्रमाणे कौटुंबिक नातेसंबंधात असेल, तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाला असेल आणि ती पीडित व्यक्ती बनते, तेव्हा तिला डी. व्ही. कायद्यांतर्गत उपायांचा लाभ घेण्याचा अधिकार आहे.

पुढचा प्रश्न असा आहे की, दिलाशाची मागणी करताना पीडित व्यक्ती आणि ज्याच्याविरोधात दिलासा मागण्यात आला आहे, त्यांच्यात असे कौटुंबिक नातेसंबंध अस्तित्वात असावेत का? याचे उत्तर देण्यापूर्वी डी.व्ही.कायद्यात नमूद केलेल्या नातेसंबंधांचे पुढीलप्रमाणे विश्लेषण करणे उपयुक्त ठरेल :

(अ) रक्तसंबंधाने असलेले नातेसंबंध हे आयुष्यभराचे नाते असते.

(ब) जोवर न्यायालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे विभक्त होण्याचा आदेश दिला नाही तोवर विवाह हे देखील आयुष्यभराचे नाते आहे.

(i) जर न्यायालयाने न्यायिक विभक्त होण्याचा आदेश दिला तर त्यामुळे विवाह संपुष्टात येत नाही आणि म्हणूनच पती-पत्नी प्रत्यक्षात एकत्र राहत नसले तरी त्यांच्यात कौटुंबिक नातेसंबंध सुरू राहतात.

(ii) घटस्फोट झाल्यास विवाह टिकणार नाही, पण लग्नादरम्यान किंवा घटस्फोटाचा हुकूमनामा पारित झाल्यानंतरही, परंतु कौटुंबिक नातेसंबंधांच्या कालावधीशी संबंधित असलेल्या कालावधीत, जर एखाद्या स्त्रीला (पत्नीला) कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागत असेल, तर या डी. व्ही. कायद्यातील तरतुदी अशा घटस्फोटित महिलेच्या मदतीलाही येतील.

(iii) म्हणूनच 'कौटुंबिक नातेसंबंध' या शब्दाची व्याख्या विस्तृत पद्धतीने करण्यात आली आहे, ज्याचा अर्थ विवाहाद्वारे नात्यात असताना सामायिक घरात एकत्र राहणाऱ्या किंवा कोणत्याही वेळी एकत्र राहिलेल्या दोन व्यक्तींमधील नातेसंबंध असा होतो. 'राहणे' किंवा ' राहिलेले' या शब्दाचा अर्थही आपण कलम १७ च्या उपकलम (१) मधील राहण्याच्या हक्कासंदर्भात लावला आहे., उदाहरणार्थ पतीच्या मृत्यूमुळे एखादी महिला विधवा झाली असेल तर कौटुंबिक संबंध तोडले गेले असले तरीही, सामायिक घरात राहण्याचा अधिकारामुळे तिला डीव्ही कायद्यांतर्गत उपाय मागण्याचा अधिकार आहे.

(iv) म्हणून, वैवाहिक संबंध संपुष्टात आले आणि पीडित स्त्री आणि ज्याच्या विरोधात दिलाशाची मागणी करण्यात आली आहे तो उत्तरवादी यांच्यात कौटुंबिक नातेसंबंध अस्तित्वात नसले तरीसुद्धा कौटुंबिक हिंसाचाराची कृत्ये कौटुंबिक नातेसंबंधांच्या कालावधीशी संबंधित आहेत, अशा परिस्थितीतही कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या पीडित महिलेला डी. व्ही. कायद्यांतर्गत उपाय योजना आहेत.

(क) विवाहसदृश नातेसंबंधांच्या बाबतीतही, ज्या काळात स्त्रीला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागले आणि अशा प्रकारे पीडित व्यक्ती संबंध संपुष्टात आल्यानंतर उपायाची मागणी करू शकते, त्यासाठी एकमेव पूर्वअट अशी आहे की कौटुंबिक हिंसाचाराचा आरोप विवाहसदृश नातेसंबंध अस्तित्वात असलेल्या कालावधीशी संबंधित असणे आवश्यक आहे.

(ड) त्याचप्रमाणे, जेव्हा एखाद्या मुलीचे संगोपन कुटुंबातील सदस्यांनी वर सांगितल्याप्रमाणे संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहून केले असेल किंवा ती सामायिक घरात एकत्र राहत असेल किंवा कोणत्याही वेळी सामायिक घरात राहिली असेल किंवा संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणारा सदस्य म्हणून तिला सामाईक घरात राहण्याचा हक्क असेल आणि कोणत्याही प्रकारे हद्दपार झाली असेल किंवा कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडली असेल, तर डी.व्ही. कायदयाप्रमाणे उपाय योजना आहेत.

आमच्या मते, पीडित व्यक्ती आणि ज्याच्याविरोधात दिलासा मागण्यात आला आहे ती व्यक्ती यांच्यातील कौटुंबिक नातेसंबंध अस्तित्वात असल्याबद्दल उपस्थित केलेल्या प्रश्नाचा व्यापक आणि विस्तृत पद्धतीने अर्थ लावला गेला पाहिजे, जेणेकरून केवळ वर्तमानातील कौटुंबिक नातेसंबंधच नव्हे तर भूतकाळातील कौटुंबिक नातेसंबंधदेखील समाविष्ट होतील. त्यामुळे संसदेने जाणीवपूर्वक 'कौटुंबिक नातेसंबंध' या शब्दाचा अर्थ केवळ सामायिक घरातच एकत्र राहणाऱ्या दोन व्यक्तींमधील नातेसंबंध नव्हे, तर सामायिक घरात 'कोणत्याही वेळी एकत्र राहणाऱ्या' दोन व्यक्तींमधील नातेसंबंध असा केला आहे.

४४. वरील चर्चा प्रस्तुत प्रकरणातील तथ्यास लागू करून, अपीलकर्त्याचा विवाह उत्तरवादीचा मुलगा कुलदीप त्यागी याच्याशी दिनांक १८ जून, २००५ रोजी झाला आणि त्यानंतर लगेचच दिनांक १५ जुलै, २००५ रोजी कार अपघातात त्याचा मृत्यू झाला. अपीलकर्त्याच्या म्हणण्यानुसार, उत्तरवादी आणि तिच्या कुटुंबातील सदस्यांनी अपीलकर्त्यास त्रास देण्यास सुरुवात केली आणि तिला सासरचे घर सोडण्यास भाग पाडले. स्वत:चा उदरनिर्वाह करण्यासाठी तिने डेहराडून येथे शिक्षिका म्हणून काम करण्यास सुरुवात केली. असे की, तिच्या लग्नाच्या वेळी स्त्रीधन देण्यात आले होते आणि ते उत्तरवादी आणि तिच्या कुटुंबियांनी वापरले होते आणि स्त्रीधनाच्या वस्तू परत करण्याची मागणी करणाऱ्या दिनांक २२ नोव्हेंबर २००६ रोजीच्या कायदेशीर नोटीशीला उत्तरवादी

आणि तिच्या कुटुंबीयांकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. डीव्ही कायद्याच्या कलम १२ अन्वये दंडाधिकाऱ्यांसमोर अर्ज दाखल करण्याच्या तारखेपर्यंत जरी अपीलकर्ती प्रत्यक्षात सामायिक घरात राहत नव्हती ; तरीही ती पतीसोबत कौटुंबिक नातेसंबंधात राहिली होती आणि पुढे तिला सून म्हणून सामायिक घरात राहण्याचा अधिकार होता. उत्तरवादी - सासू आणि तिच्या कुटुंबियांनी केलेल्या जाचामुळे आणि मानसिक छळामुळे अपीलकर्ती-पीडित व्यक्तीला सामायिक घर सोडावे लागले. तिला ते घर सोडून स्वत:चा उदरनिर्वाह करावा लागला. अशा प्रकारे, पीडित व्यक्ती म्हणून, अपीलकर्तीला सामायिक घरातून काढून टाकले जाऊ शकत नाही कारण तसे करण्याचे कोणतेही वैध कारण नव्हते. आपल्या पतीचा अपघातात मृत्यू होईपर्यंत तिच्याशी कौटुंबिक नातेसंबंध असल्याने आणि त्याच्यासोबत एकत्र राहत असल्याने अपीलकर्तीला सामायिक घरात राहण्याचा अधिकार असल्याने, पतीचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्यानंतरसुद्धा तिला सामायिक घरात राहण्याचा अधिकार होता. पीडित व्यक्तीचे तिच्या लग्नामुळे कौटुंबिक नातेसंबंध कायम राहिले आणि सून असल्याने तिला सामायिक घरात राहण्याचा अधिकार होता.

४५. यावरून आम्ही उपस्थित केलेल्या पहिल्या प्रश्नाकडे जातो, तो म्हणजे, *'डी. व्ही. कायद्याच्या कलम १८ ते २० आणि २२ मधील मूलभूत तरतुदी लागू करण्यासाठी डीव्ही कायद्यांतर्गत कार्यवाही सुरू करण्यापूर्वी कौटुंबिक घटना अहवाल विचारात घेणे बंधनकारक आहे का?'*

४६. कलम २ च्या खंड (ङ) मध्ये कौटुंबिक घटना अहवाल याचा अर्थ पीडित व्यक्तीकडून कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार मिळाल्यानंतर विहित नमुन्यात तयार केलेला अहवाल असा आहे. कलम १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, डी. व्ही. कायद्याच्या कलम १० च्या पोट-कलम (१) अन्वये सेवा प्रदात्यासह पीडित व्यक्ती किंवा संरक्षण अधिकारी किंवा पीडित व्यक्तीच्या वतीने इतर कोणतीही व्यक्ती दंडाधिकाऱ्याकडे डीव्ही कायद्यांतर्गत एका किंवा अधिक अनुतोषांकरिता अर्ज सादर करू शकते. कलम १२ च्या पोट- कलम (१) च्या परंतुकात असे नमूद करण्यात आले आहे की, अशा अर्जावर कोणताही आदेश काढण्यापूर्वी, दंडाधिकारी, त्याला संरक्षण अधिकाऱ्याकडून किंवा सेवा प्रदात्याकडून प्राप्त झालेल्या कोणत्याही कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनेचा अहवाल विचारात घेईल. कलम २ च्या खंड (ढ ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे संरक्षण अधिकारी याचा अर्थ राज्य शासनाकडून कलम ८ च्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असा आहे. कलम ८ च्या पोट-कलम (२) मध्ये म्हटले आहे की, संरक्षण अधिकारी या, शक्यतोवर महिला असतील आणि त्यांच्याकडे विहित करण्यात येतील अशा अर्हता आणि अनुभव असेल.

४७. वरील तरतुदींचे एकत्रित वाचन केल्यावर हे स्पष्ट होते की, पीडित व्यक्ती स्वत: किंवा पीडित व्यक्तीच्या वतीने इतर कोणतीही व्यक्ती दंडाधिकाऱ्यांकडे डीव्ही कायद्यांतर्गत एका किंवा अधिक अनुतोषांकरिता अर्ज सादर करू शकते. परंतु परंतुकात असे नमूद केले आहे की, जेव्हा एखाद्या

कौटुंबिक घटनेचा अहवाल संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याकडून दंडाधिकाऱ्यांना प्राप्त होते, त्या प्रकरणी तो विचारात घेतला जाईल. म्हणून, जेव्हा पीडित व्यक्ती, संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याच्या मदतीने नव्हे, तर स्वत: किंवा वकिलाच्या मदतीने अर्ज दाखल करते, तेव्हा अशा परिस्थितीत संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याच्या भूमिकेचा विचार केला जात नाही. साहजिकच, संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याकडून दंडाधिकाऱ्यांना कौटुंबिक घटनेचा अहवाल प्राप्त होणार नाही. कौटुंबिक घटना अहवालाअभावी, दंडाधिकारी डी. व्ही. कायद्यांतर्गत कोणताही आदेश देऊ शकत नाहीत, विशेषत: जेव्हा पीडित व्यक्तीने स्वत: किंवा कायदेशीर सल्लागारामार्फत दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल केला असेल, असे म्हणता येईल का? आमच्या मते परंतुकाचा हेतू तसा नाही. जरी, परंतुकामध्ये 'घेईल ' हा शब्द वापरण्यात आला असला तरी, तो केवळ अशा प्रकरणांपुरता मर्यादित आहे जिथे संरक्षण अधिकारी कोणताही कौटुंबिक घटना अहवाल दाखल करतो किंवा यथास्थिती सेवा प्रदाता असा अहवाल दाखल करतो. जेव्हा संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदाता कौटुंबिक घटना अहवाल दाखल करतो, तेव्हा अशा प्रकरणी दंडाधिकाऱ्याला त्याला प्राप्त झालेला असा अहवाल विचारात घेणे आवश्यक आहे. परंतु जर पीडित व्यक्तीच्या वतीने असा अहवाल दाखल करण्यात आला नसेल तर तो अशा कोणत्याही अहवालाचा विचार करण्यास बांधील नाही. त्यामुळे संरक्षण अधिकारी किंवा यथास्थिती सेवा प्रदात्याकडून दंडाधिकाऱ्यांना प्राप्त झालेल्या कौटुंबिक घटना

अहवालाच्या संदर्भात 'घेईल' हा शब्द वाचणे आवश्यक आहे, ज्या प्रकरणी दंडाधिकाऱ्यांना अहवाल विचारात घेणे बंधनकारक आहे. परंतु, जर असा कोणताही अहवाल दंडाधिकाऱ्यांना प्राप्त झाला नसेल तर दंडाधिकाऱ्यांनी अर्जावर कोणताही आदेश देण्यापूर्वी साहजिकच अशा कोणत्याही कौटुंबिक घटना अहवालाचा विचार करू नये. आधीच नमूद केल्याप्रमाणे, हे अशा प्रकरणात असू शकते जेव्हा पीडित व्यक्ती स्वत: दंडाधिकाऱ्यांकडे जाते किंवा डी. व्ही. कायद्यांतर्गत एक किंवा अधिक दिलासा मागण्यासाठी अर्ज सादर करण्यासाठी एखाद्या वकिलाची सेवा घेते किंवा वैध स्वीकारार्ह कारण / प्रयोजनासाठी संरक्षण अधिकारी किंवा यथास्थिती सेवा प्रदात्याने कौटुंबिक घटना अहवाल दाखल केला नाही.

४८. म्हणूनच आमचे असे मत आहे की, यातील अपीलकर्तीने दाखल केलेला अर्ज कौटुंबिक घटना अहवालासह नव्हता आणि म्हणूनच डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ च्या पोट-कलम (१ ) च्या तरतुदीनुसार दंडाधिकाऱ्याला अपीलकर्तीच्या बाजूने आदेश आणि निर्देश जारी करण्याचा अधिकार नव्हता असा निर्णय देण्यामध्ये उच्च न्यायालय योग्य नव्हते.

(i) उच्च न्यायालयांनी जेथे असे निर्णय दिले आहेत की, हा विद्वान दंडाधिकाऱ्यांद्वारे डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ अन्वये अर्जावर सुनावणी किंवा निर्णय घेण्यासाठी कौटुंबिक घटना अहवाल ही अपरिहार्य बाब नाही, ते खालीलप्रमाणे आहेत.

अ) **नयनकुमार विरुद्ध कर्नाटक राज्य - [आयएलआर २००९ कर ४२९५]** या प्रकरणात कर्नाटक उच्च न्यायालयाने (कलबुर्गी खंडपीठ) डीव्ही कायद्याच्या कलम १२ चा विचार करताना असे म्हटले आहे की, जर दंडाधिकाऱ्यांना संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याकडून कौटुंबिक घटनेचा अहवाल प्राप्त झाला असेल, तर पीडित पक्षाने दाखल केलेल्या अर्जावर आदेश पारित करण्यापूर्वी सदर कौटुंबिक घटना अहवालाची नोंद घेणे दंडाधिकाऱ्यांना बंधनकारक ठरते. पुढे असे स्पष्ट करण्यात आले की, डी. व्ही. अधिनियमाच्या योजनेत सेवा प्रदात्याकडे अथवा संरक्षण अधिकाऱ्याकडे किंवा डी. व्ही. अधिनियमाच्या कलम १२ अन्वये दंडाधिकाऱ्याकडे दाद मागणे हे पीडित व्यक्तीच्या निवडीवर सोडण्यात आले आहे.

ब) **अभिराम गोगोई विरुद्ध रश्मी रेखा गोगोई - [(२०११) ४ गुवाहाटी कायदा अहवाल २७६]** या प्रकरणात गुवाहाटी उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, डीव्ही कायद्याच्या कलम ९ (१) (ख) मध्ये हे स्पष्ट करण्यात आले आहे की, कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार प्राप्त झाल्यानंतर दंडाधिकाऱ्याकडे कौटुंबिक घटनेचा अहवाल पाठवणे आणि त्याच्या प्रती ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये, कौटुंबिक हिंसाचार घडून आल्याचा आरोप करण्यात आला आहे, अशा क्षेत्रातील पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस अधिकाऱ्याकडे आणि त्या क्षेत्रातील सेवा प्रदात्यांकडे पाठविणे हे संरक्षण अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे.

क) **मोहम्मद बासित विरुद्ध आसाम राज्य आणि इतर [(२०१२) १ गुवाहाटी**

**कायदा अहवाल ७४७]**, या प्रकरणात मध्य प्रदेश आणि झारखंड उच्च न्यायालयांनी व्यक्त केलेल्या मताशी गुवाहाटी उच्च न्यायालयाने असहमती दर्शविली आणि असा निर्णय दिला की, कलम १२ मध्ये, डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ अन्वये कोण तक्रार दाखल करू शकते, कोणता दिलासा मागितला जाऊ शकतो, तक्रारीतील मजकूर काय असला पाहिजे आणि तक्रारीची तपासणी कशी केली पाहिजे याचा केवळ विचार केला जातो. असे की, जर तक्रार सदर पूर्वअटींची पूर्तता करत असेल तर त्याची दखल घेतली जाऊ शकते. पीडित व्यक्ती स्वत: किंवा संरक्षण अधिकारी डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ (१) अन्वये अर्ज दाखल करू शकते, असे हायकोर्टाने नमूद केले. न्यायालयाने पुढे असा निर्णय दिला की, दंडाधिकाऱ्यांनी कौटुंबिक घटनेचा अहवाल विशिष्टरीत्या मागविणे असे तरतुदीनुसार आवश्यक नाही. असे की, जर संरक्षण अधिकाऱ्याने दंडाधिकाऱ्याकडे तसा अहवाल दाखल केला असेल तरच तो विचारात घेणे बंधनकारक आहे. मध्य प्रदेश आणि झारखंड उच्च न्यायालयांनी असे निरीक्षण नोंदविले होते की, संरक्षण अधिकाऱ्याने जरी कौटुंबिक घटना अहवाल दाखल केला होता तरी दंडाधिकारी तो विचारात घेण्यास बांधील नसतील या मध्य प्रदेश आणि झारखंड उच्च न्यायालयांनी नोंदविलेल्या निरीक्षणाच्या मर्यादेपर्यंत गुवाहाटी उच्च न्यायालयाने सदर न्यायालयांनी व्यक्त केलेल्या मताशी असहमती दर्शविली.

ड) याच मुद्द्याची चौकशी करताना, हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाने **राहुल सूरमा विरुद्ध हिमाचल प्रदेश राज्य [(२०१२) एससीसी ऑनलाइन हिप्र २५७४]** या प्रकरणात असा निर्णय दिला की, पीडित व्यक्तीला तात्काळ दिलासा देणे हा डीव्ही कायद्याचा उद्देश आहे; त्यामुळे संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याकडून कौटुंबिक घटनेचा अहवाल प्राप्त होण्यापूर्वी डीव्ही कायद्याच्या कलम १२ अन्वये अर्जाची दखल घेण्याचा अधिकार दंडाधिकाऱ्यांना नाही, असे सूचित करणे चुकीचे होते.

इ) शिवाय, **ए. विद्या सागर विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य - [२०१४ एससीसी ऑनलाइन हायड ७१५]** या प्रकरणात आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने त्यातील याचिकाकर्त्याचा असा युक्तिवाद फेटाळून लावला की कौटुंबिक हिंसाचाराचा खटला केवळ कौटुंबिक घटना अहवालाच्या आधारे दाखल केला जाऊ शकतो आणि त्याची दखल घेतली जाऊ शकते, अन्यथा नाही.

ई) **रवीकुमार बाजपेयी विरुद्ध रेणू अवस्थी बाजपेयी - [आयएलआर (२०१६) एमपी ३०२]** या प्रकरणाच्या न्यायनिर्णयात मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने के. माहेश्वरी, न्या. यांच्यामार्फत डीव्ही कायद्याच्या कायदेशीर हेतूवर चर्चा करताना असा निर्णय दिला की, पीडित व्यक्तीच्या तक्रारीवर कारवाई करण्यासाठी दंडाधिकाऱ्यांनी पूर्वअट म्हणून संरक्षण अधिकाऱ्याकडून अहवाल मागविण्याचा वैधानिक हेतू होता, तर मुख्य कलमांमधील शब्दांवर भर देऊन तो हेतू व्यक्त केला असता. उच्च न्यायालयाने एखाद्या तरतुदीचा

आणि त्यातील परंतुकाच्या अन्वयार्थ यांच्याशी संबंधित विविध न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

उ) **शंभूप्रसाद सिंह विरुद्ध मंजरी - [१९० (२०१२) डीएलटी ६४७]** या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने रवींद्र भट, न्या. यांच्यामार्फत बोलताना डीव्ही कायद्यांतर्गत पीडित व्यक्तीने केलेल्या तक्रारीवर दंडाधिकारी थेट कारवाई करू शकतो का, या प्रश्नावर दोन एकल न्यायाधीशांची परस्परविरोधी मते हाताळली. असा निर्णय देण्यात आला की, डी.व्ही. कायद्याच्या कलम १२ (१) नुसार या डीव्ही कायद्यांतर्गत दिलासा मागणाऱ्या अर्जासोबत कौटुंबिक घटनेचा अहवाल असणे किंवा तो संरक्षण अधिकाऱ्याने सादर करणेसुद्धा आवश्यक नाही. तसेच, दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज करण्याचा नमुना आणि पद्धत निश्चित करणाऱ्या नियम ६ मध्ये सुद्धा कलम १२ अन्वये दिलासा मिळण्यासाठी केलेल्या अर्जासोबत कौटुंबिक घटना अहवाल असणे आवश्यक केलेले नाही.

पुढे असा निर्णय देण्यात आला की, कौटुंबिक घटना अहवाल सादर करण्याचे बंधन डी. व्ही. अधिनियमाच्या कलम ९ अन्वये केवळ संरक्षण अधिकाऱ्यावर आणि डी. व्ही. अधिनियमाच्या कलम १० अन्वये सेवा प्रदात्यावर आहे आणि जर कौटुंबिक घटनेचा अहवाल दाखल केला, तर विद्वान दंडाधिकारी तो विचारात 'घेईल' आणि अन्यथा नाही.

ऊ) **राकेश चौधरी विरुद्ध वंदना चौधरी - [२०१९ एससीसी ऑनलाइन जम्मू आणि काश्मीर ५१२]** या प्रकरणात जम्मू आणि काश्मीर उच्च न्यायालयाने त्यातील याचिकाकर्त्याचा युक्तिवाद फेटाळून लावला की, डी. व्ही. अधिनियमाच्या कलम १२ अन्वये याचिकेमध्ये आदेशिका जारी करण्यासाठी संरक्षण अधिकाऱ्याचा अहवाल ही एक अपरिहार्य बाब आहे. न्यायालयाने असा निर्णय दिला की, डी.व्ही. कायद्याच्या कलम १२ (१) मधील परंतुकानुसार विद्वान दंडाधिकारी संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याने दाखल केलेला कौटुंबिक घटना अहवाल विचारात घेईल अशी तरतूद आहे, परंतु कोणताही दिलासा देण्यापूर्वी 'अहवाल मागविला जाईल', असे त्यात नमूद केलेले नाही.

ए) **विजय मारुती गायकवाड विरुद्ध सविता विजय गायकवार्ड - [२०१८ (१) एचएलआर २९५]** या प्रकरणातील फौजदारी रिट याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने असे निरीक्षण नोंदवले की, जर प्रकरण न्यायालयासमोर असेल आणि पत्नीने संरक्षण अधिकाऱ्याकडे न जाणे पसंत केले, तर न्यायालय संरक्षण अधिकाऱ्याचा अहवाल मागविण्यास बांधील नाही.

ऐ) अखेरीस, **सूरज शर्मा विरुद्ध भारती शर्मा - [२०१६ एससीसी ऑनलाइन छ १८२५]** या प्रकरणात, छत्तीसगढ उच्च न्यायालयाने डी.व्ही. कायद्याच्या कलम १२ वर आपले मत व्यक्त करताना असासुद्धा निर्णय दिला आहे की, कोणताही आदेश देण्यासाठी कौटुंबिक घरगुती घटना अहवाल हा निर्णायक सामग्री ठरणार नाही.

४९. याउलट उच्च न्यायालयांच्या खालील निर्णयात असे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे की, कलम १२ मधील तरतुदी बंधनकारक आहेत आणि संरक्षण अधिकाऱ्याचा अहवाल न घेता, विद्वान दंडाधिकाऱ्यांनी डी.व्ही. कायद्याच्या कलम १२ अन्वये अर्जावर पारित केलेला आदेश रद्दबातल होण्यास पात्र आहे.

अ) **रामासिंह विरुद्ध माया सिंग - [(२०१२) ४ एमपीएलजे ६१२],**[1] मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने सदर प्रकरणातील तथ्ये आणि वस्तुस्थिती पाहता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४८२ अन्वये याचिका रद्दबातल करताना असा निर्णय दिला आहे की, संरक्षण अधिकाऱ्याने तयार केलेला अहवाल विचारात न घेता, त्यातील आक्षेपित आदेश पारित करण्यात आला होता आणि डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ मधील परंतुकाकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. हे परंतुक सामान्यतः मुख्य तरतुदीत लागू केलेल्या सर्वसाधारण नियमाला अपवाद ठरते, असे न्यायालयाने म्हटले आहे. परंतुकामधील 'कोणताही' या शब्दाचा अर्थ एक किंवा अनेकांपैकी एक असा असेल आणि त्यात सर्वांचा आहे, यावर न्यायालयाने भर दिला. त्यामुळे नोटीस बजावण्याचे निर्देश देणारा वादकालीन आदेशसुद्धा या परंतुकाच्या कठोरतेतून वगळला जाणार नाही.

1 रवीकुमार बाजपेयी (उपरोल्लेखित) या प्रकरणातील न्यायनिर्णय स्पष्ट करण्यात आला.
२

ब ) रवी दत्ता वि. किरण दत्ता आणि अन्य एक - [२०८ (२०१४) डीएलटी ६१][2] या प्रकरणात, दिल्ली उच्च न्यायालयाने या बाबीचा पुनरुच्चार केला की, डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ अंतर्गत अर्जावर निर्णय देताना न्यायचौकशी न्यायालयाने कौटुंबिक घटना अहवाल विचारात न घेण्यामुळे सदर तरतुदीच्या आदेशाचे उल्लंघन होते आणि म्हणूनच न्यायचौकशी न्यायालयाने पारित केलेला आदेश टिकू शकत नसल्याचा निर्णय देण्यात आला.

विविध उच्च न्यायालयांच्या वरील न्यायनिर्णयांचे विश्लेषण केल्यावर आम्हांला असे आढळले आहे की, संरक्षण अधिकाऱ्याकडून किंवा सेवा प्रदात्याकडून कौटुंबिक घटना अहवाल प्राप्त झाला तर पीडित व्यक्तीने दाखल केलेल्या अर्जावर कोणताही आदेश पारित करण्यापूर्वी, दंडाधिकाऱ्याने सदर अहवालाची नोंद घेणे बंधनकारक आहे, पण जर संरक्षण अधिकाऱ्याकडून किंवा सेवा प्रदात्याकडून दंडाधिकाऱ्यांना कोणतीही तक्रार किंवा कौटुंबिक हिंसाचाराचा अर्ज प्राप्त झाला नाही, तर असा अहवाल विचारात घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असा निर्णय देण्यात आंध्र प्रदेश, मुंबई, दिल्ली, गुवाहाटी, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, कर्नाटक आणि मध्य प्रदेश उच्च न्यायालय योग्य आहेत. आधीच चर्चा केल्याप्रमाणे, डीव्ही कायद्यानुसार पीडित व्यक्तीने केवळ संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्यामार्फत दंडाधिकाऱ्यांसमोर अर्ज करणे बंधनकारक नाही.

2 शंभूप्रसाद सिंह (उपरोल्लेखित) या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयानेच दिलेल्या आधीच्या न्यायनिर्णयाचा या न्यायनिर्णयात विचार करण्यात आला नाही.

पीडित व्यक्ती स्वत: किंवा वकिलाची सेवा घेऊन थेट न्यायदंडाधिकाऱ्यांकडे अर्ज करू शकते. अशा परिस्थितीत, संरक्षण अधिकाऱ्याकडून किंवा सेवा प्रदात्याकडून कौटुंबिक घटना अहवाल दाखल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. अशा परिस्थितीत, डी.व्ही.कायद्यातील तरतुदींनुसार, पीडित व्यक्तींना दिलासा देणारा कोणताही अंतरिम किंवा अंतिम आदेश देण्याचा अधिकार दंडाधिकाऱ्यांना नाही, असे म्हणता येणार नाही. पीडित व्यक्तीने दाखल केलेल्या तक्रारीची किंवा अर्जाची दखल दंडाधिकारी घेऊ शकतात आणि नियम ५ अन्वये कौटुंबिक घटना अहवाल नसतानाही डीव्ही कायद्याच्या कलम १२ अन्वये उत्तरवादीला नोटीस बजावू शकतात. अशा प्रकारे, पीडित व्यक्तीच्या वतीने संरक्षण अधिकाऱ्यामार्फत किंवा सेवा प्रदात्यामार्फत तक्रार दाखल न केल्यास, नियम ५ अन्वये कौटुंबिक घटनेचा अहवाल नसताना, डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ अन्वये तक्रारीची दखल घेण्याचे अधिकार दंडाधिकाऱ्यांना आहेत. पीडित व्यक्तीला तात्काळ दिलासा द्यावा लागेल हे लक्षात घेऊन असे हेतूपूर्ण विवेचन करणे आवश्यक आहे आणि म्हणूनच या तरतुदीचा अशा पद्धतीने अर्थ लावला जाऊ शकत नाही, जी डीव्ही कायद्याच्या उद्देशाच्या विरुद्ध असेल, ज्यामुळे कलम १२ चा हेतू आणि उद्देश हिरावून घेतला जातो.

५०. या संदर्भात मुख्य तरतुदीच्या संदर्भातील परंतुकाच्या विवेचनावर नियंत्रण ठेवणारी तत्त्वे मांडणे उपयुक्त ठरेल.

(अ) परंतुकाचे सर्वसाधारण कार्य म्हणजे तरतुदीबाहेर एखादया गोष्टीला अपवाद करणे किंवा त्यामध्ये लागू केलेली एखादी गोष्ट पात्र ठरविणे, परंतु जे परंतुकासाठी तरतुदीच्या कक्षेत असेल. एक सामान्य नियम म्हणून, कायद्यात जे आहे त्यास पात्र ठरविण्यासाठी किंवा अपवाद निर्माण करण्यासाठी कायद्यात एखादे परंतुक अंतर्भूत केले जाते आणि सामान्यत: परंतुकाचा अर्थ सामान्य नियम सांगण्यासाठी केला जात नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, परंतुक हे अपवादाची तरतूद करून मुख्य कायदयाच्या सर्वसाधारणतेस पात्र ठरते आणि मुख्य कायद्यातून तो जसा होता तसा भाग काढून टाकतो, जो तरतुदीसाठी, परंतु परंतुकासाठी तो मुख्य तरतुदीत समाविष्ट होतो. तसेच, परंतुकाचा अर्थ तरतूद रद्दबातल करणे किंवा कायद्याने दिलेला अधिकार पूर्णपणे हिरावून घेणे असा लावता येऊ शकत नाही.

(ब) या संदर्भात विद्वान लेखक न्यायमूर्ती जी. पी. सिंग यांनी 'प्रिन्सिपल्स ऑफ स्टॅच्युटरी इंटरप्रिटेशन' च्या १५ व्या आवृत्तीत न्यायालयीन पूर्वोदाहरणांमधून संकलित केलेले काही नियम मांडले आहेत. पहिली गोष्ट म्हणजे, परंतुकाचा अर्थ असा होऊ नये की एखादी गोष्ट ध्वनित अर्थाने वगळणे किंवा अंतर्भूत करणे, म्हणजेच योग्य रचना केल्यावर जेव्हा मुख्य तरतूद स्पष्ट असते, तेव्हा परंतुक तिचा विस्तार करू शकत नाही किंवा तिला मर्यादित करू शकत नाही. दुसरं म्हणजे, ज्या तरतुदीशी परंतुक जोडले गेले आहे, त्या संदर्भात त्याचा अर्थ समजावून घेणे आवश्यक आहे, म्हणजेच सामान्यत: एखादे परंतुक हे ज्या तरतुदीला ते परंतुक आहे, त्यापलीकडे जात नाही. अन्य तरतुदीला नव्हे तर, ज्या मुख्य तरतुदीला ते

परंतुक म्हणून लागू करण्यात आले आहे, त्या तरतुदीला ते अपवाद आखून देते. परंतु, जर एखाद्या कायद्यातील परंतुक एखाद्या कलमाचा भाग बनत नसेल, तर ते स्वत:च एक स्वतंत्र कलम म्हणून लागू केले गेले असेल, तर अपवाद म्हणून किंवा पात्र होण्यासाठी, परंतुक कोणत्या कलमासाठी करण्यात आले आहे ते निश्चित करणे आवश्यक ठरते. कधीकधी, मुख्य कलमाच्या रचनेसाठी मार्गदर्शक म्हणून परंतुकाचा वापर केला जातो. तिसरे म्हणजे, जेव्हा कलमात शब्दांची दोन संभाव्य रचना आढळते, तेव्हा मुख्य कलमाचा अर्थ लावण्यासाठी परंतुकाचा विचार केला जाऊ शकतो. मात्र, जेव्हा मुख्य तरतूद स्पष्ट असते, तेव्हा परंतुकाद्वारे तिला कमकुवत करता येऊ शकत नाही. अशा प्रकारे, जेथे मुख्य कलम स्पष्ट नसते, तेथे मुख्य तरतुदीचा अर्थ आणि व्याप्ती निश्चित करण्यासाठी परंतुकाचा विचार करता येऊ शकतो.

(क्) विद्वान लेखक न्यायमूर्ती जी. पी. सिंग यांच्या मते, एखाद्या परंतुकाचा असा अर्थ काढू नये की, जेणे करून ते निरर्थक ठरेल. काही प्रकरणांमध्ये, "वगळण्याचे कायदेविषयक साधन पूर्ण भागातून केवळ एक भाग वगळण्यासाठी स्वीकारले जाते, जे वगळण्यासाठी त्याचा एक भाग म्हणून राहते ", आणि वगळण्याच्या शब्दांना काही अर्थ आहे असे मानले जाते आणि ते केवळ अधिशेष म्हणून सहजपणे ओळखले जात नाहीत. परिणामी, मुख्य कायदा आणि परंतुक निरर्थक किंवा परिणामशून्य होऊ नयेत अशा प्रकारे परंतुकाचा अर्थ लावला पाहिजे, असे नमूद करण्यात आले आहे. हे विशेषतः तेव्हा असते, जिथे

परंतुकाचा उद्देश कधीकधी केवळ खूप सावधगिरीद्वारे असतो, विशेषत: जेव्हा कायद्याचे कार्यात्मक शब्द अतिशय स्पष्ट असतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, अशा प्रकरणात परंतुकाचा उद्देश कोणतीही शंका दूर करणे असा असतो. अशी ही उदाहरणे आहेत जेथे एखादे परंतुक हे, केवळ अपवाद किंवा आधी नमूद केलेल्या गोष्टींना पात्र म्हणून नव्हे तर, स्वतंत्र कायद्याच्या स्वरूपात असते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, जर मूळ कायदा परंतुकाच्या स्वरूपात शब्दबद्ध केला असेल, तर ते आधी शब्दबद्ध केलेल्या किंवा आधी सांगितलेल्या गोष्टींपेक्षा भिन्न परिस्थितींबद्दल एक स्वतंत्र वैधानिक तरतूद असेल. कधीकधी, एखादे परंतुक म्हणजे विशेष प्रकरणांत सर्वसाधारण कायद्यापेक्षा विशेष फरक करणे आणि त्यासाठी विशेषतः तरतूद करणे होय.

(ड) या टप्प्यावर, या न्यायालयाच्या विविध न्यायनिर्णयांमधून संकलित केल्याप्रमाणे एखाद्या परंतुकाच्या रचनेवर किंवा अर्थउकलीवर चर्चा केली जाऊ शकते.

(i) **ईश्वरलाल ठाकोरलाल अलमौला विरुद्ध मोतीभाई नागजीभाई – [एआयआर १९६६ एससी ४५९]**, या प्रकरणात, मुंबई भाडेकरू व शेतजमीन कायदा, १९४८ हाताळताना या न्यायालयाने असा निर्णय दिला की, परंतुकाचे योग्य कार्य म्हणजे मूळ खंडात लागू केलेली एखादी गोष्ट वगळणे किंवा पात्र ठरविणे, जे परंतुकासाठी त्या खंडात अंतर्भूत असेल.

(ii) **कविराज पंडित दुर्गा दत्त शर्मा वि. नवरत्न फार्मास्युटिकल लॅबोरेटरीज - [एआयआर १९६५ एससी ९८०]** या प्रकरणात, ट्रेड मार्क्स कायदा, १९४० मधील कलम ६ चे परंतुक विचारात घेताना, असे निरीक्षण नोंदविण्यात आले की, कोणत्याही कायद्यासाठी ते वाजवी रचना ठरणार नाही, जर एखाद्या परंतुकाला अपवाद निर्माण करणे अभिप्रेत असेल आणि त्यात समाविष्ट प्रकरणांच्या विशिष्ट वर्गाला काही विशेष अधिकार प्रदान करण्याचा प्रयत्न असेल, तर ते निरर्थक आणि काहीही साध्य केले नाही असे मानले जावे.

(iii) **केदारनाथ जूट मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. वि. वाणिज्य कर अधिकारी आणि इतर, [एआयआर १९६६ एससी १२]** या प्रकरणात असे निरीक्षण नोंदविण्यात आले की, "रचनेच्या सर्वसाधारण नियमांनुसार, परंतुकाच्या अपवादाचा किंवा पात्रतेचा परिणाम हा कायद्याच्या मागील भागामधून अपवाद करणे किंवा त्यामध्ये लागू केलेल्या एखाद्या गोष्टीस पात्र करणे असा आहे, जे परंतु तरतुदीसाठी त्यात अंतर्भूत असेल". [पाहा संविधी कायद्यावरील "क्रेस" ६ वी आवृत्ती - पृ. २१७]. या प्रकरणात, न्यायालय, बंगाल फायनान्स सेल्स टॅक्स कायदा, १९४१ मधील कलम ५ (२) (अ) (२) आणि बंगाल सेल्स टॅक्स नियम मधील नियम २७-अ विचारात घेत होते.

(iv) **दत्तात्रय गोविंद महाजन व इतर वि. महाराष्ट्र राज्य आणि अन्य एक – [एआयआर १९७७ एससी ९१५]** या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने, राज्यघटनेच्या अनुच्छेद ३१ ख आणि त्यातील दुसऱ्या परंतुकाच्या

अनुषंगाने, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मध्ये केलेल्या सुधारणा विचारात घेताना, ईश्वरलाल यांच्या प्रकरणात नमूद केलेल्या गोष्टींचा पुनरुच्चार केला.

(v) **एस. सुंदरम पिल्लई इ. वि. व्ही. आर. पट्टाबिरमन - [एआयआर १९८५ एससी ५८२]** या प्रकरणात, तामिळनाडू इमारत (भाडेपट्टा आणि भाडे नियंत्रण) अधिनियम, १९६० च्या कलम १० च्या पोट- कलम (२) मधील परंतुक आणि स्पष्टीकरणाची व्याप्ती हाताळताना या न्यायालयाने असा निर्णय दिला की, एखाद्या परंतुकाची तीन स्वतंत्र कार्ये असू शकतात. सर्वसाधारणपणे, एखादे परंतुक हे मुख्य कायद्यातील एखाद्या गोष्टीला अपवाद असणे किंवा त्यामध्ये लागू केलेल्या एखाद्या गोष्टीस पात्र ठरविणे होय, पण जे परंतुकासाठी, कायद्याच्या कक्षेत असेल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, एखाद्या परंतुकाला मुख्य कायद्यापासून वेगळे केले जाऊ शकत नाही किंवा मुख्य कायद्याचा खरा हेतू रद्द करण्यासाठी किंवा निरर्थक करण्यासाठी त्याचा वापर केला जाऊ शकत नाही. कधीकधी, अपवादात्मकरीत्या एखाद्या परंतुकावर मूळ कायद्याचा प्रभाव असू शकतो.

(इ) विविध लेख आणि न्यायनिर्णय यांचा संदर्भ दिल्यानंतर, या न्यायालयाने वरील न्यायनिर्णयात खालीलप्रमाणे निर्णय दिला :-

“४३.    या मुद्द्यावर  अनेक प्रामाण्ये देण्याची गरज नाही कारण कायदेशीर स्थिती स्पष्टपणे आणि उघडपणे प्रस्थापित झालेली दिसते. थोडक्यात, एखादे परंतुक  चार भिन्न हेतू पूर्ण करू शकते :

(१) मुख्य कायद्यातील काही तरतुदींना  पात्र ठरवणे किंवा वगळणे;

(२) कायदा कार्यक्षम होण्यासाठी काही अनिवार्य अटींची पूर्तता करण्याचा आग्रह धरून कायद्याच्या हेतूचीच  संकल्पना पूर्णपणे बदलू शकते;

(३) ते कायद्यातच इतके अंतर्भूत होऊ शकते  की, ते  कायद्याचा अविभाज्य भाग बनू शकते  आणि अशा प्रकारे मूळ कायद्याचेच  स्वरूप आणि रंगरूप  प्राप्त करू शकते ; आणि

(४) वैधानिक तरतुदीचा खरा हेतु स्पष्ट करण्याच्या एकमेव उद्देशाने कायद्यात पर्यायी परिशिष्ट म्हणून केवळ  कार्य करण्यासाठी याचा वापर केला जाऊ शकतो.

(ई) परंतुकाच्या रचनेचा  व विवेचनाचा दृष्टिकोन खालील प्रकरणांमध्ये स्पष्ट केला आहे :-

(i)  **एम. पेंटिया विरुद्ध मुदल्ला वीरमल्लप्पा - [एआयआर १९६१ एससी ११०७]** या प्रकरणात असे निरीक्षण नोंदविण्यात आले  की, एखादया कलमाची  किंवा तरतुदीची  अर्थउकल करताना,  जर निवड दोन

व्याख्यांपैकी एकीची निवड करायची असेल, आणि ज्याचा संकुचित भाग कायद्याचा प्रकट हेतू साध्य करण्यात अपयशी ठरेल, तर ज्यामुळे कायद्याची निरर्थकता कमी होईल, अशी रचना टाळणे आवश्यक आहे आणि त्याऐवजी, संसद परिणामकारक निष्पत्ती घडवून आणण्याच्याच हेतूने कायदा करते या दृष्टिकोना आधारे, धाडसी रचना स्वीकारणे आवश्यक आहे.

(ii) **अधिक्षक व विधी परामर्शी, पश्चिम बंगाल सरकार वि. अबनी मैती [एआयआर १९७९ एससी १०२९]** या प्रकरणात, या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, कायद्याचा अर्थ केवळ शब्दकोशकाराच्या नजरेतून काढता कामा नये. कायद्याचा उद्देश आणि योजना आणि त्यात वापरली जाणारी भाषा यावरून स्पष्ट होणारी विधिमंडळाची इच्छाशक्ती आणि अंतर्निहित धोरण न्यायालयाने अंमलात आणले पाहिजे. कायद्यामधील मधील शब्दांचा अर्थ हे पूर्णपणे कायदयासंदर्भात घेणे आवश्यक आहे. म्हणूनच अलगपणे त्यांचा अर्थ लावण्यात येऊ नये.

५१. तात्कालिक प्रकरणात, जेव्हा परंतुक हे मुख्य तरतुदीच्या संदर्भात वाचण्यात येते, ज्याची सुरुवात 'डी. व्ही. अधिनियमान्वये एका किंवा अधिक अनुतोषची मागणी करण्याकरिता पीडित व्यक्ती किंवा संरक्षण अधिकारी किंवा पीडित व्यक्तीच्या वतीने इतर कोणतीही व्यक्ती, यांना दंडाधिकाऱ्याकडे अर्ज

सादर करता येईल.' या शब्दांनी होते आणि त्यातून स्पष्टपणे असे सूचित होते की पीडित व्यक्ती स्वत: किंवा तिच्या वकिलाद्वारे दंडाधिकाऱ्यांकडे डी. व्ही. अधिनियमान्वये कोणत्याही दिलाशाची मागणी करू शकते. अशा परिस्थितीत कौटुंबिक घटनेचा अहवाल दाखल करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतुकामधील 'घेईल' हा शब्द संदर्भानुसार वाचला पाहिजे म्हणजेच, जेथे संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्यामार्फत पीडित व्यक्तीच्या वतीने दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज करण्यात आला असेल, तेथे संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदाता यांनी कोणताही कौटुंबिक घटना अहवाल दाखल केल्यास, तो विचारात घेणे दंडाधिकाऱ्यांना बंधनकारक आहे. संरक्षण अधिकाऱ्याने अहवाल दाखल करणे ही, पीडित व्यक्तीने जरी स्वत:च दाखल केलेल्या किंवा तिच्या वकिलामार्फत दाखल केलेल्या तक्रारीवर दंडाधिकाऱ्यांनी कार्यवाही करण्यासाठी पूर्वअट आहे, असा जर संसदेचा हेतू असता, तर तसे व्यक्त करण्यात आले असते. परंतु कलम १२ चे पोट- कलम (१) हे परंतुकासह एकत्रित वाचले असता, तसा हेतू दिसून येत नाही. अशा प्रकारे, डी.व्ही. अधिनियमाच्या कलम १२ अन्वये असलेल्या मुबलक अधिकाराची त्यानुसार अर्थउकल करण्यात येते आणि संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याच्या मदतीशिवाय पीडित व्यक्तीने दाखल केलेल्या अर्जावर उत्तरवादीला नोटीस बजावण्यासाठी पूर्व अट आणि त्यामुळे कौटुंबिक घटना अहवालाचा अभाव या बाबी उद्भवत नाहीत. जर विपरीत अर्थ लावायचा असेल तर कलम १२ च्या पोट- कलम (१) मधील सुरुवातीचे शब्द परिणामशून्य ठरतील

आणि प्रत्येक पीडित व्यक्तीला प्रथम संरक्षण अधिकारी किंवा यथास्थिती सेवा प्रदात्याशी संपर्क साधावा लागेल आणि कौटुंबिक घटनेचा अहवाल तयार करून त्यानंतर डी. व्ही. कायद्यांतर्गत दिलासा मिळावा म्हणून दंडाधिकाऱ्यांकडे जावे लागेल, जो संसदेचा हेतू नाही. म्हणूनच, आमच्या मते, **रमा सिंग वि. माया सिंग - [(२०१२) ४ एमपीएलजे ६१२]** या प्रकरणात मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने आणि **रवी दत्ता विरुद्ध किरण दत्ता आणि इतर - [२०१८ (२०१४) डीएलटी ६१]** या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेले न्यायनिर्णय योग्य कायदा आखून देत नाहीत आणि ते नामंजूर करण्यात येत आहेत, तर उपरोल्लेखित इतर सर्व न्यायनिर्णय, जे वर नमूद केलेल्या अर्थउकलीशी सुसंगत आहेत, ते आम्ही कायम करतो.

५२. वरील चर्चा लक्षात घेता, या अपीलात उपस्थित करण्यात आलेल्या तीन प्रश्नांची उत्तरे पुढीलप्रमाणे आहेत :

> “(१) कौटुंबिक हिंसाचार अधिनियम, २००५ अन्वये कार्यवाही सुरू करण्यापूर्वी कौटुंबिक घटना अहवाल विचारात घेणे बंधनकारक आहे का, जेणेकरून या कायद्याच्या कलम १८ ते २० आणि २२ मधील मूलभूत तरतुदी लागू होतील?”

असा निर्णय देण्यात येतो की, कलम १२ नुसार, दंडाधिकाऱ्याला डीव्ही कायद्यांतर्गत कोणताही आदेश देण्यापूर्वी संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदात्याने दाखल केलेल्या कौटुंबिक घटना अहवाल विचारात घेणे बंधनकारक नाही. हे

स्पष्ट केले जाते की, कौटुंबिक घटना अहवाल नसतानासुद्धा, डीव्ही कायद्यातील तरतुदींनुसार एकतर्फी किंवा अंतरिम तसेच अंतिम आदेश देण्याचा अधिकार दंडाधिकाऱ्याला आहे.

"(२) हिंसाचाराच्या वेळेस ज्यांच्यावर आरोप लावण्यात आले आहेत, त्या व्यक्तींसोबत पीडित व्यक्तीने राहणे बंधनकारक आहे का?"

असा निर्णय देण्यात येतो की, पीडित व्यक्ती, जेव्हा रक्ततसंबंधाद्वारे, विवाहाद्वारे किंवा विवाहसदृश नातेसंबंधाद्वारे, दत्तक संबंधादवारे किंवा संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या कुटुंबाचे सदस्य म्हणून एकत्र राहत असतील, तेव्हा कौटुंबिक हिंसाचाराच्या वेळेस ज्या व्यक्तींविरूद्ध आरोप करण्यात आले आहेत, त्या व्यक्तींबरोबर प्रत्यक्षात राहणे बंधनकारक नाही. डी.व्ही. कायद्याच्या कलम १७ अन्वये एखाद्या महिलेला सामायिक घरात राहण्याचा अधिकार असेल आणि अशी स्त्री पीडित व्यक्ती किंवा कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडली असेल, तर ती सामायिक घरात राहण्याच्या अधिकाराच्या अंमलबजावणीसह डी. व्ही. कायद्यातील तरतुदींनुसार दिलासा मागू शकते.

"(३) पीडित व्यक्ती आणि ज्याच्याविरोधात दिलासा मागण्यात आला आहे, त्या व्यक्तीमध्ये कौटुंबिक नातेसंबंध अस्तित्वात असावेत का?"

असा निर्णय देण्यात येतो की, पीडित व्यक्ती आणि कौटुंबिक हिंसाचाराचा आरोप लक्षात घेता, ज्याच्याविरुद्ध दिलासा मागण्यात आला आहे त्या व्यक्तीमध्ये

टिकलेले कौटुंबिक नातेसंबंध असावेत. परंतु, पीडित व्यक्तीने अर्ज दाखल करते वेळेस कौटुंबिक नातेसंबंध अस्तित्वात असावेत असे नाही. दुसऱ्या शब्दांत, डीव्ही कायद्याच्या कलम १२ अंतर्गत अर्ज दाखल करताना पीडित व्यक्ती सामायिक घरात उत्तरवादीशी कौटुंबिक नातेसंबंधात राहत नसली तरीही, परंतु कोणत्याही वेळी तशी राहिली असेल किंवा राहण्याचा तिला हक्क होता आणि ती कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडली असेल किंवा नंतर कौटुंबिक नातेसंबंधांमुळे तिला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागले असेल, तर तिला डी. व्ही. कायद्याच्या कलम १२ अन्वये अर्ज दाखल करण्याचा अधिकार आहे.

५३ परिणामी, उत्तराखंड उच्च न्यायालयाने फौजदारी पुनरीक्षण क्र. १८६/२०१४ मध्ये पारित केलेल्या दिनांक २३ जुलै २०१९ रोजीचा न्यायनिर्णय तसेच फौजदारी अपील क्र. ५३/२०११ मध्ये पाचवे अतिरिक्त सत्र न्यायाधीश, डेहराडून यांनी दिनांक ११ जुलै २०१४ रोजी पारित केलेला न्यायनिर्णय रद्द बातल ठरवण्यात येत आहेत आणि किरकोळ अर्ज क्र. ७८/२००७ मध्ये विशेष न्यायदंडाधिकारी-१, डेहराडून यांनी पारित केलेल्या आदेश कायम करण्यात येत आहे.

५४. वरील अटींनुसार अपील मंजूर करण्यात येत आहे.

५५. पक्षकारांनी आपापला खर्च सोसावा.

५६. या प्रकरणातून बाहेर पडण्यापूर्वी, आम्ही विद्वान न्यायमित्र श्री गौरव अग्रवाल यांनी केलेल्या बहुमूल्य सेवेची प्रशंसा करतो, ज्यांनी या प्रकरणात उपस्थित झालेल्या प्रश्नांवर विविध उच्च न्यायालयांच्या सर्व संबंधित न्यायनिर्णयांचे परिश्रमपूर्वक संशोधन केले आहे आणि प्रकरणातील तथ्ये आणि डीव्ही कायद्यातील सर्व संबंधित तरतुदींच्या विशेष संदर्भासह आपले योजनपूर्वक निवेदन मांडले आहे.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

***x-x-x-x***